ग्रं. सं. ठाणें
निबंध
५८

पुनर्जन्मा स्त्रियांची गुलामगिरीपासून सुटका भाग-१
लेखक - बोलीणकर, ना० गु०
कि० १रु०

REFBK-0001516

# Introduction.

This little book is intended rather to stimulate the thought and awaken the conscience of those to whom it is addressed than to prescribe definite methods of reform. Its author is the son of an earnest reformer who devoted his entire life to the sacred cause of Social and Religious reform,—a man who at great sacrifice to himself practised the precepts he preached and who thus suffered life-long martyrdom.

I am very glad to see that the noble zeal of the father burns in the son. This essay which is his first literary effort, shows that he is animated by a lofty ideal of Social Progress. He has seen the vision of the Society founded on the eternal principles of justice and righteousness.

The path of the Social Reformer is beset with the most perplexing difficulties, and the practical problems of the earnest social Reformer are, perhaps, the hardest that human wisdom can be required to solve. There is not, therefore, the least doubt that many difficulties—very real and seri-
lie in the way of the reforms
ever in no way we
author. A

या काय
मुख्य तत्वावर पात्राचीं व नें केलीं
आहेत याचा विचार आजपर्यंत कोणी
केल्याचें आमच्या माहितींत नाहीं. त्या तत्वां
पैकीं, ह्मणजे कवीस ज्या गोष्टींवर विशेष
जोर देऊन त्यासंबंधीं त्याचे विचार लोकांस
सांगावयाचे आहेत, त्या गोष्टींपैकीं जी
आमच्या मतें सर्वांत महत्वाची गोष्ट तिचा
( या पुस्तकाच्या विषयाशीं संबंध अस-
ल्यानें फक्त तिचाच ) येथें उल्लेख करतों.
ती गोष्ट ह्मणजे नवऱ्याच्या सा कवृत्तीनें
बायकोच्या गुणांची अवहेलना व तिचे वाईट
परिणाम, ही होय; व ही राम व सीता या

व पराक्रम यांनीं भरलेलें काव्य त्याच्याच
चुकीनें कसें शोकपर्यवसायी झालें, याचें
(कदाचित् नव्यानें) दिग्दर्शन केवळ वाल्मिकी
रामायणांतून उतारे देऊन पुढें केलें आहे.
सीता चोरीस गेल्यानें रामास वेड लागलें,
व त्यानें तिला परत आणण्याची प्रतिज्ञा
केली. वानरसेनेची मदत मिळाली, व
हनुमानानें सीतेचा शोध लावून आपण रामा-
कडूनच आला अशी तिची खात्री केली, व
' पहारेकऱ्याचा डोळा चुकवून मी तुला
एकदम परत नेऊं शकतों ' असें सांगितलें.
येथें कवीनें विशेषतः बायकांच्या स्वभावांतील
एक दोष दाखविला आहे तो हा कीं,
वेळप्रसंगाचा विचार न करितां आपला

# प्रस्तावना.

या लहानशा पुस्तकांत समाजसुधारणेच्या केवळ नियमित दिशा ठरविण्याचा उद्देश नसून, लोकांमध्यें विचारजागृति व्हावी व त्यांचें अंतर्याम पाजळावें एवढाच आहे. लेखक एका आस्थेवाईक सुधारकाचे चिरंजीव आहेत. त्यांच्या वडिलांनीं धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या पवित्र कार्यास आपलें सर्व आयुष्य वाहिलें होतें व यांनीं मोठा स्वार्थत्याग करून आपल्या बोलण्याप्रमाणें कृति राखिली आणि आमरण धर्मकार्यास स्वतःची आहुति दिली.

पित्याच्या थोर उत्साहाची उज्वळ ज्योत पुत्राच्या अंतःकरणांत जळत असलेली पाहून मला आनंद वाटतो. हा पुस्तककर्त्याचा पहिलाच प्रयत्न आहे व त्यावरून याला सामाजिक सुधारणेच्या अत्युच्च आदर्शानें घेरलें आहे, हें उघड दिसत आहे. न्याय व सात्विकपणाच्या सनातन पायावर उभारलेल्या समाजाचें त्याला स्वप्न पडलें आहे. सामाजिक सुधारकाच्या मार्गांत अगदीं घोंटाळ्यांत पाडणाऱ्या अनेक अडचणी आहेत, आणि आस्थेवाईक सुधारकापुढें जे प्रश्न येतात ते सोडविणें तर मनुष्यबुद्धीला दुःसाध्य होतें. ह्मणून या पुस्तकांत प्रतिपादलेल्या सुधारणांच्या मार्गांत अत्यंत महत्वाच्या अडचणी असंख्य आहेत यांत शंका नाहीं. तथापि त्यामुळें पुस्तककर्त्याच्या म्हणण्याच्या सत्यतेस बाध येत नाहीं. बऱ्याच गोष्टी वस्तुतः नीचतेच्या व अन्यायाच्या ... [illegible]त करून हल्लींच्या काळीं त्या लोकांत ... तरुणाच्या अंतःकरणांत अत्युच्च आ... अत्यंत कष्टसाध्य असण...

REFBK-0001516

सं. नि ८८

# स्त्रियांची गुलामगिरीपासून सुटका.

REFBK-0001516

## भाग १.

—:*:—

## प्रकरण १.

### रामायणाचें रहस्य.

आद्यकवि ब्रह्मर्षि वाल्मिकी यांचें हें काव्य आतां सर्व जगास माहीत झालें आहे. त्यांतलि वानरांच्या व राक्षसांच्या गोष्टींनीं तें बालगोपाल मंडळीस प्रिय आहे; सीता आदिकरून स्त्रियांच्या सद्गुणांच्या वर्णनानें तें स्त्रीजातीस आवडतें; व रामावताराची साद्यंत हकीकत या दृष्टीनें तें एक धर्मपुस्तक आहे असें सर्व हिंदु लोक मानतात. याप्रमाणें हें आबालवृद्ध स्त्रीपुरुषास इतकें आवडतें पुस्तक असूनही, कथापुराणांच्या द्वारें त्याचें इतकें पठण होत आहे, तरी तें कवीचें काव्य या दृष्टीनें पाहून, त्यांत कवीनें काय काय मुख्य तत्वांवर सर्व पात्रांचीं वर्णनें केलीं आहेत याचा विचार आजपर्यंत कोणी केल्याचें आमच्या माहितींत नाहीं. त्या तत्वांपैकीं, ह्मणजे कवीस ज्या गोष्टींवर विशेष जोर देऊन त्यासंबंधीं त्याचे विचार लोकांस सांगावयाचे आहेत, त्या गोष्टींपैकीं जी आमच्या मतें सर्वांत महत्वाची गोष्ट तिचा (या पुस्तकाच्या विषयाशीं संबंध असल्यानें फक्त तिचाच) येथें उल्लेख करतों. ती गोष्ट ह्मणजे नवऱ्याच्या साशंकवृत्तीनें बायकोच्या गुणांची अवहेलना व तिचे वाईट परिणाम, ही होय; व ही राम व सीता या मुख्य जोडप्याच्या वर्णनांतच कवीनें दाखविली आहे.

रामायणाचा कथाभाग प्रसिद्ध असल्यानें येथें देण्याची गरज नाहीं. राम व सीता यांचें परस्परांवर आधीं किती निःसीम प्रेम होतें हेंही नव्यानें सांगण्यास नकोच. परंतु रावणानें सीतेस पळविल्यापासून सीतेचें प्रेम वाढणें शक्य असल्यास वाढत जाऊन, उलटपक्षीं रामाच्या मनांत निराधार शंका इळूहळू कायम होत गेल्यानें या सुखी जोडप्याचें सुख नाहींसें होऊन, रामाचे अनंत गुण व पराक्रम यांनीं भरलेलें काव्य त्याच्याच चुकीनें कसें शोकपर्यवसायी झालें, याचें (कदाचित् नव्यानें) दिग्दर्शन केवळ वाल्मिकी रामायणांतून उतारे देऊन पुढें केलें आहे.

सीता चोरीस गेल्यानें रामास वेड लागलें, व त्यानें तिला परत आणण्याची प्रतिज्ञा केली. वानरसेनेची मदत मिळाली, व हनुमानानें सीतेचा शोध लावून आपण रामाकडूनच आलों अशी तिची खात्री केली, व 'पहारेकऱ्याचा डोळा चुकवून मी तुला एकदम परत नेऊं शकतों' असें सांगितलें. येथें कवीनें विशेषतः बायकांच्या स्वभावांतील एक दोष दाखविला आहे तो हा कीं, वेळप्रसंगाचा विचार न करितां आपला

हेका होईल तितका चालवायचा. सीतेला रामाची घमेंड, तेव्हां ती ह्मणाली, " छे, छे, पळणें शक्य असलें तरी मी येणार नाहीं; कारण रामाच्या बायकोस दुसऱ्यानें सोडवणें त्याच्या नांवास शोभत नाहीं. तेव्हां त्याला असें सांग कीं, मी तूं येऊन सोडविण्याची वाट पाहात आहें." वानर–राक्षसांचें व राम–रावणाचें इतकें भयंकर युद्ध यामुळें झालें! रावणानें तिला पळविली तशी हनुमानानें परत आणिली असती तर कदाचित् लढाई टळली असती. व जरी रावण संतापून लढाईस आला असता तरी लढाईच्या दृष्टीनें तें या पक्षास जास्त सोयीचें होतें; सेतू बांधण्याची गरज नव्हती, व शिवाय या पक्षास आपल्या देशांत राहून लढण्याचा फायदा मिळाला असता. या लढाईच्या गोष्टीशिवाय, आमच्या मतें दुसरा मोठा फायदा हा झाला असता कीं, सर्व युद्ध संपेपर्यंत सीता राक्षसांचे हातीं असल्यानें रामाच्या मनांत जो तिच्यासबंधीं ग्रह हात चालला होता, तो झाला नसता. परंतु ही गोष्ट झाली नसती तर रामायणच झालें नसतें! सारांश, कवीच्या पुढील उद्देशास सीतेच्या या दोषाची मदत होते. सीतेची ही चूकच झाली असें अशानें दिसतें कीं, राम जरी मोठा पराक्रमी असला तरी त्याच्या त्या वेळच्या स्थितीचा तिनें विचार केला नाहीं. महाभारतांत ज्या प्रमाणें उठतां बसतां अद्भुत चमत्कार वर्णिले आहेत तसे रामायणांत फारसे नाहींत. रामास जरी विष्णूच्या अर्ध्या अंशाचा अवतार ह्मटलें आहे तरी त्याच्या स्वतःच्या तोंडीं 'मनुष्याच्या पराक्रमानें जें कांहीं शक्य तें मीं केलें' असे शब्द आहेत. तेव्हां तो कांहीं तरी अद्भूत चमत्कार करून आपल्यास सोडविल अशी सीतेसही आशा नसावी. केवळ दोघां भावांशिवाय त्यांच्या लोकांपैकीं कोणी जवळ नसतांही, एवढ्या मोठ्या रामाची बायको एका अर्धवट रानटी माणसानें परत आणण्यानें रामाची अब्रू जाते इतकाच विचार तिच्या मनांत असला पाहिजे. याचेंच पुष्टीकरण पुढें असें होतें कीं, लढाई आटपल्यावर हनुमान जेव्हां पुन्हा सीतेस सर्वांचे आधीं भेटला तेव्हां त्याच्या बोलण्यांत, 'माझ्या हातून सेतू तयार झाल्यानें ही प्रतिज्ञा शेवटास गेली आहे,' असें त्यानें ह्मटलें आहे; व पुन्हा रामही सीतेस पहिल्यानें हेंच सांगतो कीं, 'समुद्रांचें उलंघन व लंकेचें मर्दन हें हनुमानाचें काम आज सफळ झालें.' एकंदर लढाईंतील हनुमानाचें काम पाहिलें ह्मणजे त्याच्याशिवाय जय मिळणें अशक्य होतें असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं. असो.

रावण मेला व लढाई संपली. पण येथूनच सुखाचें पारडें फिरत चाललें. आतां सीतेस भेटावयाचें ह्मणून आधीं हनुमानास तिला हें जयाचें वर्तमान कळवून तिचा निरोप आणण्यास पाठविलें. येथपर्यंत रामांत झालेल्या फरकाचा उल्लेख नाहीं पण जय झाल्याचें ऐकून सीतेच्या आनंदास पार राहत नाहीं, व 'आपणांस भेटण्याची इच्छा आहे' असा तिचा निरोप ऐकतांच रामास अश्रू लोटतात, व तो ध्यानस्थ होतो नंतर 'स्नान करून व नटवून' सीतेस आणण्यास बिभीषणास पाठविलें, व पुन रामाची समाधि लागली. (कारण आत डोकें फिरत चालल होतें.) स्नान केल्य शिवायच रामास भेटण्याची तिची इच्छ असतांही, बिभीषणानें "तुझ्या नवऱ्या

सांगितलें आहे ' असें ह्मणून नवऱ्याच्या हुकूमाची आठवण करून दिल्यानंतर ती त्याप्रमाणें सजून आली. स्नान केल्याशिवाय भेटण्यानें आजपर्यंत आपण कसे दिवस काढले हें दाखविण्याचें तिच्या मनांत असलें पाहिजे तिची पालखी जवळ आली, व ती रामापर्यंत आणण्यासाठीं बिभीषणानें रामाभोंवतीं जमलेल्या वानर व राक्षस सेनेस बाजूस करण्याचा प्रयत्न केला. रस्त्यावर खेळ करणाऱ्या गारुड्यांस आपणांस हव्या तेवढ्या जागेच्या पलीकडे मुलांमाणसांस ठेवतांना कोण त्रास पडतो, मग त्या गराड्यांतून रस्ता काढतांना थोडी गडबड झाल्यास काय नवल? पण त्या गडबडीनें नुकत्याच अभिषेक केलेल्या बिभीषणावरही राम रागावला, व ' पालखीची गरज नाहीं; सर्वांसमक्ष तिला पायींच आण ' असें ह्मणाला. येथें कवीनें रामाच्या मनांत या वेळीं जी खळबळ चालली होती ती दाखविली आहे. सीतेनें विस्मयानें, आनंदानें, व प्रेमानें रामाकडे पाहिलें, ' व राम आपलें हृद्गत याप्रमाणें बोलूं लागला:

" हे कल्याणि, संग्राममध्यें शत्रूचा पराजय करून तुला मी जिंकून आणलें आहे. पुरुषप्रयत्नानें जें कांहीं शक्य तें हें मीं केलें आहे. आज क्रोधाची समाप्ति होऊन, शत्रूनें केलेल्या स्त्रीहरणरूपी अपमानाचीही मी फेड केली आहे. आज माझा पराक्रम लोकांस दिसला; आज माझ्या श्रमाचें सार्थक झालें; आज मीं आपली प्रतिज्ञा शेवटास नेली आणि आज मी स्वतंत्र झालों. राक्षसानें-तुला नेली हा अनर्थ दैवानें घडला, व तो मी मनुष्यपराक्रमानें नाहींसा केला." याप्रमाणें भाषण ऐकून सीता अश्रूंनीं भरून गेली, व रामाचें हृदय लोकापवादाच्या भीतीनें द्विधा झालें, असा रामाच्या अर्ध्या भाषणांत कवीचा उद्गार आहे, व यावरून त्यानें लोकांनीं ब्रही काढला नसतां केवळ रामाच्या साशंकवृत्तीसच त्याच्या कल्पनेनें लोकापवादाचें स्वरूप आलें असें सुचविलें आहे. पुढें राम ह्मणतो—" तुझें कल्याण असो. **हा जो युद्धाचा खटाटोप मीं केला व मित्रांच्या सामर्थ्यानें ज्यांतून मी पार पडलों, तो मी तुझ्यासाठीं केला नाहीं.** अपवाद टाळण्यासाठीं, व वंशाचा कमीपणा नाहींसा करण्यासाठीं हे मीं केलें. परंतु नेत्ररोग्यास जसा दिव्यानें त्रास होतो तशी तूं तुझ्या वर्तनाबद्दल संदेह उत्पन्न झाल्यानें माझ्या दृष्टीस अति प्रतिकूल झाली आहेस. तस्मात् हे जनककन्ये, मी तुला अनुज्ञा देतों. तूं आज वाटेल तिकडे चालती हो. या दहा दिशा तुला मोकळ्या आहेत. **तुझ्याशीं मला आतां कांहीं एक कर्तव्य नाहीं.** रावणाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या व त्यानें दोषदृष्टीनें पाहिलेल्या तुला, **कुलीन ह्मणविणारा मी** कसा स्वीकार करूं? ज्याकरितां मीं तुला जिंकिलें तो माझा उद्देश सिद्धीस गेला आहे. आतां तुझ्या ठिकाणीं माझी आसक्ती नाहीं. तुला वाटेल तेथें तूं रहा. **मन चा निश्चय करून ही गोष्ट मीं तुला सांगितली आहे.** हे सीते, दिव्यकांतीनें युक्त व मनोहर अशा तुझी रावण स्वगृहीं एक क्षणभरही उपेक्षा करणार नाहीं." ( युद्धकांड, सर्ग ११५ )

या शेवटच्या वाक्यांत आर्यांची शंका उघड उघड आरोपाच रूपांत दाखविली आहे सीतेच्या दृष्टानें पाहिलें ह्मणजे रावणानें पळविण्याचें आर्यांचें रामाचें वर्तन व त्यानंतर इतक्या भयंकर संकटांतून सुटून

तीं अति आनंदानें भेटण्यास आली असतां सर्वांसमक्ष रामानें हा खोटा आरोप करणें म्हणजे इंद्रपदावरून रौरव नरकांत ढकलण्याप्रमाणें आहे. मग त्याचा सीतेवर काय परिणाम झाला असेल याची सहज कल्पना होईल. पतिव्रतेवर नवऱ्याचा असा आरोप; मग तिच्या अंगाचा भडका होऊन तिनें जीव देण्यास तैयार व्हावें यांत काय आश्चर्य ? सर्व लोकांसमक्ष तावडतोब तिनें पुढील भाषण केलें. "हे वीरा एखाद्या यःकश्चित् पुरुषानें क्षुद्र स्त्रीला बोलावें असें हें कर्णकटु व अयोग्य भाषण आपण मला कां करीत आहां ? आपण जशी मला समजतां तशी मी नाहीं याचा आपणांला प्रत्यय येईल, हें मी आपल्या सदाचरणाच्या शपथेवर सांगतें. **सामान्य स्त्रीचें आचरण पाहून संपूर्ण स्त्रीजातिविषयीं आपण शंका घेत आहां.** पण आपणांस जर माझी परीक्षा झाली असेल तर ही शंका सोडून द्या. पराधीन झाल्यानें जो मला परपुरुषाचा स्पर्श झाला तो माझ्या इच्छेनें झाला नाही. माझ्या आधीन जें माझें हृदय तें तर आपल्यापाशींच आहे. **परस्परांचें परस्परांवर प्रेम वृद्धिंगत झालें असून, आणि पुष्कळ दिवस आपलें एकत्र वास्तव्य झालें असूनही जर आपणांस माझी परीक्षा झाली नसेल तर मात्र मी कायमची बुडालें.** आपण पहिल्यानेंच हनुमानाबरोबर असा निरोप पाठविला असता तर मीं त्याच वेळीं प्राण सोडला असता, व तुम्हांला व तुमच्या मित्रांस हा लढाईचा त्रास करावा लागला नसता. माझ्या अद्वितीय चरित्राचा विचार न करितां, क्रोधाच्या आधीन होऊन आपण क्षुद्र मनुष्याप्रमाणें सामान्य स्त्रियांप्रमाणें माझा विचार केला आहे. बाल्यावस्थेमध्यें आपण ज्या उद्देशानें माझें पाणिग्रहण केलेंत त्याचीही आपण पर्वा केली नाहीं, व माझी भक्ति व शील या सर्वांकडेही कानाडोळा केला आहे." ( सर्ग ११६ )

अशा रीतीनें स्वतः सीतेनें सर्वांसमक्ष 'पति हा देव' हा विचार एकीकडे करून रामाची कानउघाडणी केली ! पण इतक्या दिवसांत हळूहळू दृढ झालेलें रामाचें मत एकदम पाघळलें नाहीं यांत काय आश्चर्य ? रामावर या भाषणाचा परिणाम न झालेला पाहून ती लक्ष्मणास म्हणाली, "माझ्यासाठीं चिता तयार कर. कारण **मिथ्यापवादानें ग्रस्त झालेल्या मला जिवंत राहण्याची इच्छा नाहीं.** गुणांनीं संतुष्ट न झालेल्या नवऱ्यानें लोकांसमक्ष टाकलेल्या मला मरणाचेंच अवलंबन करणें योग्य असल्यानें मी आगींत प्रवेश करितें." ज्या कोणास या ठिकाणीं सीतेनें दिव्य करून दाखवून आपली शुद्धि सिद्ध केला असें वाटत असेल त्यांस इतकेंच सांगणें आहे कीं, जरी पुढें ती आगीनें जळली नाहीं असें कवीस सांगणें आहे, तरी सीतेनें हें दिव्य करण्यासाठीं नाहीं तर रामासमक्ष जीव देण्याच्याच हेतूनें अग्नींत प्रवेश करण्याचा निश्चय केला, हेंच येथें कवीनें स्पष्ट शब्दांनीं दाखविलें आहे. दिव्यासंबंधीं पुढें विचार येईल. पुढें लक्ष्मणानें रामाची मुद्रा अजून बदलत नाहींसें पाहून, प्रत्यक्ष आगींत उडी घेतांना पाहून तरी त्याचें मन बदलेल अशा विचारानें चिता तयार केली. 'माझें वर्तन शुद्ध असून राम मला दुष्ट समजत आहे, हें जर खरें असेल तर अग्नि माझें रक्षण करो,' असें म्हणून सीता पेटलेल्या चितेवर चढली. देवापासून तों राक्षसापर्यंत हाहाकार सुरू झाला; पण खिन्न

झालेला, डोळ्यांत अश्रु आलेला राम मुहूर्तभर विचार करूं लागला! लहानसहान देवांनां कांहीं वळत नाहीं असें पाहून सर्व मोठाल्या देवांसकट स्वतः ब्रह्मदेव खालीं उतरला, व 'तूं साक्षात् ईश्वर असून प्राकृत मनुष्याप्रमाण अग्नात उडी घालीत असलेल्या सीतेची कशी उपेक्षा करीत आहेस' असें ह्मणाला. **परंतु स्त्रियांची योग्यता समजण्यास लागणारा ईश्वरी अंश रामांत असूनही त्याची अजून त्यास जागृति झाली नव्हती!** तो ह्मणाला, "मी स्वतः दशरथपुत्र मनुष्य असल्याचं समजत आहे." याप्रमाणें सर्वांचें सांगणें पालथ्या घड्यावर पाण्याप्रमाणें झालें, तेव्हां अग्निदेवानें मध्यस्थी केली. त्यानें ती चिता उडवून देऊन सीतेस बाहेर आणलें व ती रामास अर्पण करून ह्मणाला, 'रावणानें जरी हिला पाहऱ्यांत ठेवून राक्षसिणींकडून अनेक मोह दाखविले, तरी हिचें मन तुझ्यावरच असल्यानें त्या राक्षसाचें हिला स्मरणही झालें नाहीं. तेव्हां या निष्पाप सीतेचा तूं स्वीकार कर. हिला उद्देशून तूं कांहीं एक भाषण करूं नकोस अशी माझी तुला आज्ञा आहे.' आतां मात्र रामाचा उपाय हरला. त्यानें हंसतमुख केलें, व 'सीता शुद्ध आहे, व रावणानेंही तिच्या इच्छेविरुद्ध तिला हात लावणें शक्य नाहीं (कारण पतिव्रतेला हात लावल्यास रावणास मरण येण्याचा शाप होता.) हें माहीत असतांही लोकांसमक्ष तिची शुद्धी होणें अवश्य होतें, कारण नाहीं तर त्यांनीं मला विषयलंपट ह्मटलें असतें; त्रैलोक्यामध्यें शुद्ध ठरलेल्या सीतेचा माझ्या हातून त्याग होणें शक्य नाहीं, तुह्मां सर्वांच्या उपदेशाप्रमाणें मला वागलें पाहिजे,' इत्यादि वरवर गोड भाषण केलें. (सर्ग ११८)

हें भाषण वरवरचें आहे हें कवीस पुढील संविधानासाठीं दाखवावयाचें आहे, व ह्मणून पूर्वीच्या सर्व भाषणांचा विचार केला ह्मणजे स्पष्ट वरवरचें भाषण दिसेल असे शब्द घातले आहेत. लोकांनीं कोणी गोष्ट काढली नाहीं इतकेंच नाहीं,' तर ब्रह्मदेवापासून राक्षसांपर्यंत जरी हाहाकार होत होता तरी रामानें सीतेस चितेतून बाहेर येण्यास आज्ञा दिली नाहीं, ही गोष्ट महत्वाची आहे. अग्नीनें मध्यस्थी करून जेव्हां आज्ञा केली, तेव्हां वेळ मारून नेण्यास रामास गोड भाषण करावें लागलें. याचाच जास्त विचार केला तर कवीनें हा विशेषतः पुरुषांत दिसणारा दोष दाखविला आहे असें दिसतें. आपला हेतु सफल होत नाहीं, पण उलट दोषच स्पष्ट दिसतात असें झालें ह्मणजे आपल्या वागण्यांत लोक ह्मणतात तो हेतु नसून दुसराच होता असा 'खुलासा' करून आपली चुकी दाबून टाकण्याचा प्रयत्न पुष्कळ वेळां पाहण्यांत येतो. पण या प्रयत्नानें ती चुकीच लोकांच्या मनांत जास्त भिनते! त्याचप्रमाणें येथें कवीस इतकें सुचवावयाचें आहे कीं, रामाचें मन अजून पूर्ण शुद्ध झालें नसतां लोकांनीं सीता शुद्ध ठरवून त्याच्या गळ्यांत बांधली; व यामुळें पुढें याहूनही भयंकर प्रसंग घडून आला असो. येथें या शोकपर्यवसायी नाटकाचा एक अंक संपला.

सुंभ जळलें पण पीळ जळला नाहीं. मारून मुटकून सीता गळ्यांत बांधल्यानें लोकापवादाच्या पिशाचानें रामास पूर्णपणें सोडणें शक्य नव्हतें. अजून त्याचें मन अस्वस्थ होतें, ह्मणून बिभीषणाचा आग्रह

मोहून रामानें तावडतोब अयोध्येचा रस्ता धरला. तेथें त्यास राज्याभिषेक झाला, व त्यांची गडबड आटपून पाहुणे मंडळींनें निरोप घेतला. आणखी कांहीं महिने गेले, व सीतेस अपत्यलाभ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तिनें एकदां गंगातीरींच्या ऋषींचे आश्रम पाहून येण्याची इच्छा दर्शविली, व 'ठीक आहे, उद्यांच पाठवितों,' असें राम ह्मणाला. ( उत्तरकांड, सर्ग ४२ )

परंतु हे सीतेचे डोहाळे त्याच दिवशीं घडणाऱ्या अनर्थाचे सूचक होते. त्याच दिवशीं दुपारीं आपल्या खुषमस्कऱ्यांशीं गोष्टी सांगत बसला असतां रामानें एकास ह्मटलें, ' लोक राजांना सदां नांवें ठेवीतच असतात; तेव्हां हल्लीं माझ्याविषयीं व माझ्या नातलगांविषयीं **लोक काय बोलतात** तें सांग.' तेव्हां तो ह्मणाला, ' लोक आपल्या पराक्रमाच्या गोष्टी बोलतात. ' इतक्यानें तृप्ति न होऊन, रामानें पुनः आपणांस काय मुद्यावर मुख्यतः माहिती पाहिजे तें सांगितलें. तो ह्मणाला, 'माझ्यासंबंधीं जीं कांहीं बरीं वाईट भाषणें होत असतील तीं तूं सर्व सांग. ह्मणजे मी त्यांस शुभ अशींच कृत्यें करीन व अशुभ करणार नाहीं. तरी तूं कांहीं भीति न धरतां **कुटाळ, पापी लोक** माझ्याविषयीं काय ह्मणतात तें मला सांग.' तेव्हां तो नोकर ह्मणाला, 'लोक ह्मणतात कीं, रामानें अलौकिक पराक्रम करून सीता परत मिळविली, व क्रोध मागें सारून त्यानें तिला परत घरांत घेतली; परंतु तिच्यापासून त्याला काय सुख होत असेल ? रावणानें अंकावर घेतलेल्या व राक्षसांच्या आधीन राहिलेल्या सीतेस तो दोष कसा देत नाहीं ? राजाच्या अशा वागण्यानें आतां लोकांसही असला भ्रष्टाकार सहन होऊं लागेल.' ( सर्ग ४३ )

ही दुसऱ्या अंकाची सुरुवात होय. या संवादानें लोकापवाद ऐकण्याचे आधींच रामाच्या मनांतील पिशाच्चानें उलट खाली होती, हें कवीनें स्पष्ट केलें आहे. एरव्हीं, लंकेंत एकदां दिव्य करून शुद्ध झाली असतां या पापी व हलकटांच्या बोलण्याचा त्याच्या मनावर फारच थोडा परिणाम झाला असता. पण उलट मला अमुक गोष्ट कशी तरी सिद्ध करावयाची आहे,तेव्हां कुटाळांच्या कुटाळकीचा जरी त्यास आधार मिळाला तरी पुरे असें ठरवून त्यानें मुद्दाम प्रश्न केला आहे. आधींच आग भडकलेली, त्यांत या टवाळीचा भक्कम पुरावा ! मग ब्राह्मणानें मारलेल्या कुत्र्यासही न्याय देऊन त्यानेंच सांगितलेली शिक्षा ब्राह्मणास देणाऱ्या रामानें जास्त एक शब्दही न ऐकतां, कोणाचीही सल्ला न घेतां, व प्रत्यक्ष अपराध्याचें तोंडही न पाहतां, सीतेस काय शिक्षा द्यावयाची हें तावडतोब ठरविलें. वास्तविकपणें सीतेस घरांत घेतली ही रामाची चूक, पण त्याबद्दल शिक्षा भोगावयाची सीतेनें ! स्त्रियांचा पुरुष कसा न्याय करतात याचा हा अप्रतिम दाखला आहे ! तरी अजून पुरा न्याय संपला नाहीं. एकदम लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांस बोलावलें, व त्यांच्यापुढें अश्रु ढाळून राम बोलूं लागलाः—" नगरांतील लोकांचा फारच मोठा अपवाद आहे; ते माझी निंदा करीत आहेत, व त्यानें माझ्या मर्माचा भेद होत आहे. सीतेस इकडे कसें आणतां येईल ही शंका मला लंकेंतच आली होती, पण ती अग्नींत प्रविष्ट झाल्यानें व सर्व देवांनीं ती निष्पाप आहे असें सांगितल्यानें मी तिला घेऊन आलों. पण आतां हा अपवाद

व निंदा सुरू झाल्यानें माझी अपकीर्ति होईल. पण सर्व महात्मे कीर्तिसंपादनाचीच खटपट करितात. लोकापवादभयानें मी जीविताचा, व तुमचाही त्याग करीन, मग सीतेची काय गोष्ट ! यापेक्षां अधिक दुःखदायक अशी कोणतीही गोष्ट प्राप्त झाल्याचें दिसत नाहीं. ( सीतेसंबंधीं मात्र हें खरें आहे ! ) तस्मात् हे लक्ष्मणा .उद्यां सकाळीं तिला गंगेच्या पलीकडे **निर्जनप्रदेशांत,** या देशाच्या हद्दीपलीकडे सोडून दे. सीतेसंबंधीं तूं याचे उलट मला कांहीं एक सांगूं नकोस. ( नाहीं तर एकतर्फी न्याय कसा होईल ? ) मी आपल्या पायाची व जीवाची तुह्मांस शपथ घालतो. माझ्या भाषणाविरुद्ध जे कोणी माझी समजूत घालण्यासाठीं कांहींही बोलतील त्यानें **मला इष्ट असलेल्या गोष्टीचा विघात होत असल्यानें** ते माझे शत्रु समजले जातील. तुह्मांस जर माझी आज्ञा ऐकणें असेल तर तिला तिकडे सोडून या. तिनें तेथले आश्रम पाहण्याची इच्छा आधींच दाखविली आहे. तेव्हां तिची ही इच्छा पूर्ण होऊं दे." ( सर्ग ४५ )

आश्रम पहाण्यास निर्जनप्रदेशांत सोडणें! **काय अकांडतांडव, कोण अन्याय, व कसला राक्षसी जुलूम हा !** पण अन्यायाची अंमलबजावणी जुलुमाशिवाय होणें शक्यच नाहीं, हें देशकालानें अबाधित असें एक सत्य आहे.

रामाची ही आज्ञा पाळतांना व त्यानें शेवटीं सुचविलेली रीत अंमलांत आणतांना लक्ष्मणास बरेच वेळां कांहीं तरी सांगून वळ मारून न्यावी लागली. सकाळीं तो तिला ह्मणतो, 'तुझ्या इच्छेप्रमाणें तुला गंगातीरीं नेण्यास आलों.' रथांत बसतांना तिचा उजवा डोळा लवूं लागला व इतर अपशकून होऊं लागले, तेव्हां तिनें 'सर्व बरे आहेत ना ?' असें विचारलें, तेव्हां 'वरवर आनंद दाखवून' सर्व ठीक आहेत असें तो ह्मणाला. गंगा दुरून दिसतांच त्यास रडें कोसळलें, पण सीतेनें त्याचें कारण विचारलें, त्यास उत्तरच नाहीं. ( सर्ग ४६. )

शेवटीं गंगेच्या पलीकडे उतरल्यावर 'लोकनिंदेस पात्र अशा या कार्यावर माझी योजना होण्यापेक्षां मला मरण आलेलें चांगलें' असें ह्मणून रडतां रडतां तो खालीं पडला. तेव्हां सीतेनें राजाची शपथ घालून सर्व सांगण्यास आज्ञा केली. व त्यानें एकदाचें गुप्त वर्तमान सांगितलें, व सीतेस क्षणभर देहभान नाहींसें झालें! ( सर्ग ४७, ४८. )

वाचकहो ! या वेळीं तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची थोडा वेळ स्वतःस तिच्या स्थितींत समजून नंतर कल्पना कराल काय ? पुरुष वाचकहो, थोडा तरी प्रयत्न कराच, कारण त्याशिवाय अशा अन्यायांचा स्त्रियांच्या कोमल मनास केवढा धक्का बसतो याची एरव्हीं तुह्मांस कल्पना होणें शक्य नाहीं. आतां कवीनें हा परिणाम कसा वर्णिला आहे पहा. सीता ह्मणते, "ही माझी तनु खरोखर विधात्यानें दुःखाचाच उपभोग घेण्यास निर्माण केली आहे ! पूर्वी जरी मी दुःखांत लोळत होतें तरी रामचरणांचा सेवा घडत होती. परंतु आतां मी एकटी कशी राहूं ? खरोखर गंगेंत आजच मला प्राणत्याग करतां येत नाहीं, कारण त्यानें राजसंतानाचा नाश होईल." जिला लंकेंत प्राणत्यागच बरा वाटला तिला आतां पूर्ण निराश झाली

मोडून रामानें ताबडतोब अयोध्येचा रस्ता धरला. तेथें त्यास राज्याभिषेक झाला, व त्याची गडबड आटपून पाहुणे मंडळींनें निरोप घेतला. आणखी कांहीं महिने गेले, व सीतेस अपत्यलाभ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तिनें एकदां गंगातीरींच्या ऋषींचे आश्रम पाहून येण्याची इच्छा दर्शविली, व 'ठीक आहे, उद्यांच पाठवितों,' असें राम ह्मणाला. ( उत्तरकांड, सर्ग ४२ )

परंतु हे सीतेचे डोहाळे त्याच दिवशीं घडणाऱ्या अनर्थांचे सूचक होते. त्याच दिवशीं दुपारीं आपल्या खुषमस्कऱ्यांशीं गोष्टी सांगत बसला असतां रामानें एकास ह्मटलें, ' लोक राजांना सदां नांवें ठेवीतच असतात; तेव्हां हल्लीं माझ्याविषयीं व माझ्या नातलगांविषयीं **लोक काय बोलतात** तें सांग.' तेव्हां तो ह्मणाला, ' लोक आपल्या पराक्रमाच्या गोष्टी बोलतात. ' इतक्यानें तृप्ति न होऊन, रामानें पुनः आपणांस काय मुद्यावर मुख्यतः माहिती पाहिजे तें सांगितलें. तो ह्मणाला, 'माझ्यासंबंधीं जीं कांहीं बरीं वाईट भाषणें होत असतील तीं तूं सर्व सांग. ह्मणजे मी त्यांस शुभ अशींच कृत्यें करीन व अशुभ करणार नाहीं. तरी तूं कांहीं भीति न धरतां कुटाळ, पापी लोक माझ्याविषयीं काय ह्मणतात तें मला सांग.' तेव्हां तो नोकर ह्मणाला, 'लोक ह्मणतात कीं, रामानें अलौकिक पराक्रम करून सीता परत मिळविली, व क्रोध मागें सारून त्यानें तिला परत घरांत घेतली; परंतु तिच्यापासून त्याला काय सुख होत असेल ? रावणानें अंकावर घेतलेल्या व राक्षसांच्या आधीन राहिलेल्या सीतेस तो दोष कसा देत नाहीं ? राजाच्या अशा वागण्यानें आतां लोकांसही असला भ्रष्टाकार सहन होऊं लागेल.' ( सर्ग ४३ )

ही दुसऱ्या अंकाची सुरुवात होय. या संवादानें लोकापवाद ऐकण्याचे आधींच रामाच्या मनांतील पिशाच्च उलट खाली होती, हें कवीनें स्पष्ट केलें आहे. एरव्हीं, लंकेंत एकदां दिव्य करून शुद्ध झाली असतां या पापी व हलकटांच्या बोलण्याचा त्याच्या मनावर फारच थोडा परिणाम झाला असता. पण उलट मला अमुक गोष्ट कशी तरी सिद्ध करावयाची आहे,तेव्हां कुटाळांच्या कुटाळकीचा जरी त्यास आधार मिळाला तरी पुरे असे ठरवून त्यानें मुद्दाम प्रश्न केला आहे. आधींच आग भडकलेली, त्यांत या टवाळीचा भक्कम पुरावा ! मग ब्राह्मणानें मारलेल्या कुत्र्यासही न्याय देऊन त्यानेंच सांगितलेली शिक्षा ब्राह्मणास देणाऱ्या रामानें जास्त एक शब्दही न ऐकतां, कोणाचीही सल्ला न घेतां, व प्रत्यक्ष अपराध्याचें तोंडही न पाहतां, सीतेस काय शिक्षा द्यावयाची हें ताबडतोब ठरविलें. वास्तविकपणें सीतेस घरांत घेतली ही रामाची चूक, पण त्याबद्दल शिक्षा भोगावयाची सीतेनें ! स्त्रियांचा पुरुष कसा न्याय करतात याचा हा अप्रतिम दाखला आहे ! तरी अजून पुरा न्याय संपला नाहीं. एकदम लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांस बोलावलें, व त्यांच्यापुढें अश्रु ढाळून राम बोलूं लागला:—" नगरांतील लोकांचा फारच मोठा अपवाद आहे; ते माझी निंदा करीत आहेत, व त्यानें माझ्या मर्माचा भेद होत आहे. सीतेस इकडे कसें आणतां येईल ही शंका मला लंकेंतच आली होती, पण ती अग्नींत प्रविष्ट झाल्यानें व सर्व देवांनीं ती निष्पाप आहे असें सांगितल्यानें मी तिला घेऊन आलों. पण आतां हा अपवाद

व निंदा सुरू झाल्यानें माझी अपकीर्ति होईल. पण सर्व महात्मे कीर्तिसंपादनाचीच खटपट करितात. लोकापवादभयानें मी जीविताचा, व तुमचाही त्याग करीन, मग सीतेची काय गोष्ट ! यापेक्षां अधिक दुःखदायक अशी कोणतीही गोष्ट प्राप्त झाल्याचें दिसत नाहीं. ( सीतेसंबंधीं मात्र हें खरें आहे ! ) तस्मात् हे लक्ष्मणा उद्यां सकाळीं तिला गंगेच्या पलीकडे **निर्जनप्रदेशांत,** या देशाच्या हद्दीपलीकडे सोडून दे. सीतेसंबंधीं तूं याचे उलट मला कांहीं एक सांगूं नकोस. ( नाहीं तर एकतर्फी न्याय कसा होईल ! ) मी आपल्या पायाची व जीवाची तुह्मांस शपथ घालतो. माझ्या भाषणाविरुद्ध जे कोणी माझी समजूत घालण्यासाठीं कांहीही बोलतील त्यानें **मला इष्ट असलेल्या गोष्टीचा विघात होत असल्यानें** ते माझे शत्रु समजले जातील. तुह्मांस जर माझी आज्ञा ऐकणें असेल तर तिला तिकडे सोडून या. तिनें तेथले आश्रम पाहण्याची इच्छा आधींच दाखविली आहे. तेव्हां तिची ही इच्छा पूर्ण होऊं दे. " ( सर्ग ४५ )

आश्रम पहाण्यास निर्जनप्रदेशांत सोडणें! **काय अकांडतांडव, कोण अन्याय, व कसला राक्षसी जुलूम हा !** पण अन्यायाची अंमलबजावणी जुलुमाशिवाय होणें शक्यच नाहीं, हें देशकालानें अबाधित असें एक सत्य आहे.

रामाची ही आज्ञा पाळतांना व त्यानें शेवटीं सुचविलेली रीत अंमलांत आणतांना लक्ष्मणास बरेच वेळां कांहीं तरी सांगून वेळ मारून न्यावी लागली. सकाळीं तो तिला ह्मणतो, 'तुझ्या इच्छेप्रमाणें तुला गंगातीरीं नेण्यास आलों.' रथांत बसतांना तिचा उजवा डोळा लवूं लागला व इतर अपशकून होऊं लागले, तेव्हां तिनें 'सर्व बरे आहेत ना ?' असें विचारलें, तेव्हां 'वरवर आनंद दाखवून' सर्व ठीक आहेत असें तो ह्मणाला. गंगा दुरून दिसतांच त्यास रडें कोसळलें, पण सीतेनें त्याचें कारण विचारलें, त्यास उत्तरच नाहीं. ( सर्ग ४६. )

शेवटीं गंगेच्या पलीकडे उतरल्यावर 'लोकनिंदेस पात्र अशा या कार्यावर माझी योजना होण्यापेक्षां मला मरण आलेलें चांगलें' असें ह्मणून रडतां रडतां तो खालीं पडला. तेव्हां सीतेनें राजाची शपथ घालून सर्व सांगण्यास आज्ञा केली. व त्यानें एकदाचें गुप्त वर्तमान सांगितलें, व सीतेस क्षणभर देहभान नाहींसें झालें! ( सर्ग ४७, ४८. )

वाचकहो ! या वेळीं तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची थोडा वेळ स्वतःस तिच्या स्थितींत समजून नंतर कल्पना कराल काय ? पुरुष वाचकहो, थोडा तरी प्रयत्न कराच, कारण त्याशिवाय अशा अन्यायांचा स्त्रियांच्या कोमल मनास केवढा धक्का बसतो याची एरव्हीं तुह्मांस कल्पना होणें शक्य नाहीं. आतां कवीनें हा परिणाम कसा वर्णिला आहे पहा. सीता ह्मणते, " ही माझी तनु खरोखर विधात्यानें दुःखाचाच उपभोग घेण्यास निर्माण केली आहे ! पूर्वीं जरी मी दुःखांत लोळत होतें तरी रामचरणांचा सेवा घडत होती. परंतु आतां मी एकटी कशी राहूं ? खरोखर गंगेंत आजच मला प्राणत्याग करतां येत नाहीं, कारण त्यानें राजसंतानाचा नाश होईल. " जिला लंकेंत प्राणत्यागच बरा वाटला तिला आतां पूर्ण निराश झाली

असतांही राजाच्या मुलासाठीं जीवंत राह-ण्यास किती धैर्य व आत्मसंयमनाची जरूरी आहे ! हे दोन्ही गुण तिच्यांत होते हेंच यावरून दिसतें. नंतर लक्ष्मणास तिनतिनदां बजावून रामास व सर्वांस सांगण्यास तिनें एक निरोप सांगितला. हा निरोप एका करुणर-साच्या चालीच्या पद्यांत एकानें गोंविला आहे. त्यांत मूळचा अर्थ संस्कृत श्लोकांतील बरेच शब्द घेऊनच आणिला आहे.

पद ( माझा कृष्ण देखिला काय० या चा. )

माझा निरोप रामाला। वंदुनि सांगा हो ॥ध्रु.॥
जरि ही तव मनिं मी अतिशुद्ध । परमाभक्तीनें पदिं बद्ध । वीरा, भिउनी बोल अबुद्ध । अपकीर्तिभयें टाकियली ॥ १ ॥ परि या दुःखें मज नच त्रास । दुःखी देहावरि मी उदास । तवकीर्तिची धरुनी आस । सादर आज्ञा शिरिं धरितें ॥ २ ॥ पौरां बंधूसम करुनी । परमाधर्मा आचरुनी । अपवाद पुन्हा परतोनी । नच ये ऐसा वागत जा ॥ ३ ॥

( उत्तरकांड, सर्ग ४८ ).

'पति ह्मणणे देव' 'पति ह्मणजे देव' असा जप करणाऱ्या सतीकडून कवीनें उघड उघड मर्मभेद करणारा निरोप पाठविला आहे. 'धर्मकृत्याविषयां अतिशयच दक्ष अशा राजाला कळीव कीं, ' असा उपक्रम करून, 'मी शुद्ध आहें असें माहीत असतांही मला टाकलीस याच मला कांहीं वाटत नाहीं; पण आतां सर्व लोकांस गळ्यांत बांधून, ते सांगतील अशा मोठ्या धार्मिक रीतीनें वागून पुनः कधीं अपकीर्तीचें वारेंही लाग-णार नाहीं, असा वाग ह्मणजे मला त्यांतच आनंद आहे.' या निरोपानें मर्मभेद न होईल तो पाषाणहृदयीच समजला पाहिजे. व हेंच वाल्मिकीनें दाखविलें आहे. त्यानें रामावर धरलेलें शस्त्र अजून खालीं ठेविलें नाहीं, तर रामास या निरोपानें कांहींही वाटल नाहीं असें दाखवून, पुढें एकाहून एक जास्त जोराचे प्रहार केले आहेत. 'मला दिवस गेले आहेत हें तूं पाहून खात्री करून घेऊन जा' असें ह्मणून सीतेनें लक्ष्मणास निरोप दिला, व यावरून संतापाचा कळस दिसत आहे !

लक्ष्मण परत येत असतां वाटेंत ह्मातान्या सुमंत सारथ्यानें लहानपणीं ऐकलेलें व दशरथानें जें कोणासही सांगूं नको असें त्यास सांगितलें होतें, असें रामाविषयीं एक भविष्य लक्ष्मणास सांगितलें. तें हें कीं, भृगूनें विष्णूस अनेक संवत्सर लोटेपर्यंत पत्नी-विरह होईल असा शाप दिला आहे, तो सध्यां त्यास भोगण्याची पाळी आहे. परंतु हा शाप खरा होण्याची वेळ अजून आली नाहीं असें दाखविण्यास कवीनें रामाचें कसें वर्णन केलें आहे पहा. लक्ष्मण परत रामाकडे आला व तो खिन्न पाहून त्याचें समाधान करूं लागला कीं, 'सर्व संचय नश्वर आहेत, सर्व योगांचा परिणाम वियोगच होतो; जेव्हां पुत्र, स्त्रिया, मित्र व धन यांवि-षयीं शोक करूं नये. तुझ्यासारखे पुरुषश्रेष्ठ अशा प्रसंगांत गोंधळून जात नाहींत. परंतु तूं जर शोक करूं लागलास तर खरोखर तुझी निंदा मात्र होईल, व ज्या लोकापवा-दाच्या भीतीनें तूं सीतेचा त्याग केलास तो अपवाद नगरांत कायम राहील. तस्मात् तूं शोक करूं नको.' त्याबरोबर रामानें शोक टाकून ह्मटलें, 'या तुझ्या भाषणानें माझा संताप व दुःख नाहींसें होऊन, प्रजा-पालनाचें माझें कार्य करण्यास मला उमेद आली.' ( सर्ग ५२. )

यावरून त्यास पत्नीविरह झाला नाहीं, तर उलट ती सीते-ला गंगातीरीं पोंचवल्याची खबर कळ-

ळण्यास उत्कंठित झाला होता व ती खबर कळल्यानें त्याचें मन स्वस्थ झालें, व शिवाय शोक केला तर अपवाद कायम राहील या ह्मणण्यांतही अजून शापाप्रमाणें होणाऱ्या पत्नीविरहाची वेळ आली नव्हती, असेंच दिसतें. येथ या नाटकाचा दुसरा अंक संपला.

पुढें लवणासुराचा वध करण्यास शत्रुघ्न जात असतां ज्या रात्रीं वाल्मिकीच्या आश्रमांत उतरला होता, त्या रात्रीं सीतेस दोन मुलगे झाले, व ही गोष्ट तेव्हांच शत्रुघ्नास कळली असें ६६ व्या सर्गांत ह्मटलें आहे. परंतु हें वर्तमान त्यानें त्याच वेळीं नोकर पाठवून रामास कळविलें नाहीं, व तो स्वतः बारा वर्षांनीं रामास भेटण्यास आला त्या-वेळींही त्यानें त्याचा उल्लेख केला नाहीं. यावरून सीतेसंबंधा कांहींही गोष्ट कानावर येऊं नये अशी रामानें ताकीद दिली असावीसें वाटत, व शिवाय त्यास आपल्या मुलांबद्दलही किती काळजी होती हेंही यावरून दिसतें.

पुढें अश्वमेध-यज्ञ सुरू झाला. लक्ष्मण अश्वाबरोबर गेला व भरत, शत्रुघ्न पाहुण्यांची व्यवस्था ठेवीत होते. सुप्रसिद्ध कुशलवा-ख्यान वाल्मिकीरामायणांत नाहीं. यज्ञ चा-लला असतां वाल्मिकीनें आपल्या दोघां शिष्यांस ह्मणजे कुश व लव यांस रामायण-काव्य गाण्यास सांगितलें, व ते रोज थोड-थोडें गाऊं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं जेव्हां त्या गाण्यावरून हे कुश व लव सीतेचे मुलगे आहेत असें रामास कळलें, तेव्हां सीता परत आली तर बरें असें वाटून त्यानें वाल्मिकीस निरोप पाठविला कीं, " सीता जर आर्धीपासूनच शुद्ध असेल **किंवा आश्रमांत राहून निर्दोष झाली असेल** तर महर्षींची आज्ञा घेऊन तिनें उद्यां स-काळीं येथें आपल्या शुद्धीविषयीं शपथ करावी." ( सर्ग ९५ )

आश्रमांत राहून शुद्ध होणें, यावरून त्यानें तिला टाकली त्यावेळीं जरी तो वरवर ह्मणाला कीं, 'ती शुद्ध आहे अशी माझी खात्री आहे,' तरी तें खोटें असून स्वतः त्यासच सीता शुद्ध नाहीं असें मनांत वाटत होतें, हें कवीनें स्पष्ट केलें आहे. हा त्याचा निरोप वाल्मिकीस आवडला नाहीं असें वाटतें, कारण त्यावरून त्याची घमेंड, व सीता जर दिव्य करून दाखवील तर तिला तो शुद्ध समजणार या अटीनें मनाची अजून अर्धवट साशंक स्थिति दिसते. ह्मणून त्यांनीं असें ठरविलें कीं, आपण स्वतः सीता शुद्ध आहे असें सांगून जर राम ऐकेल तर ठीक, नाहींतर सीतेनें यापुढें त्याजकडे जाऊं नये.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चवदा भुवनां-तील लोक व देव सीतेचें दिव्य पहाण्यास जमले. वाल्मिकी सीतेस घेऊन सभेंत आला व रामास ह्मणाला, " ही पहा पतिव्रता सीता, **लोकापवादाची भीति बाळगणाऱ्या तुझी** खात्री करण्यास तयार आहे. हिला झा-लेले मुलगे तुझेच आहेत, हें मी तुला सत्य सांगतों मी कधीं खोटें बोललों नाहीं व मी तुला सांगतों कीं, हे पुत्र तुझे आहेत! सीता जर दोषी असेल तर माझ्या सर्व तपाचें फळ मला मिळणार नाहीं. तिचें आचरण शुद्ध आहे, व पती हेंच तिचें दैवत आहे, हें **लोकापवादाला भ्यालेल्या तुला** ती सिद्ध करून दाखवील. सारांश, सीता अंतः-करणानेंही शुद्ध आहे असें मला दिव्यज्ञानानें कळलें आहे, व ही शुद्ध आहे असें तुला समजलें असूनही **लोकापवादामुळें तुझें**

अंतःकरण कलुषित झाल्यानें तूं हिचा त्याग केलास." ( सर्ग ९६ )

यावर राम ह्मणाला, 'या अपराधाबद्दल मला क्षमा करा; जगांत शुद्ध ठरलेल्या सीतेचे ठायीं माझें प्रेम असा.' तरी पण आतां दिव्य करण्याची जरूर नाहीं असें त्याच्या तोंडून निघेना ! तेव्हां सीतेनें काय दिव्य केलें पहा. रामाच्या साशंकवृत्तीनें त्यास देव मानणाऱ्या सीतेस यापुढें त्याचें दर्शनही नकोसें झालें मग पुन्हा त्याच्याजवळ राहण्याची गोष्ट कशाला ! तिनें पूर्वीचा जीव देण्याचा विचार कायम केला, व 'रामाशिवाय जर इतर पुरुष मी मनांतही आणिला नसेल तर भूदेवीनें मला आंत घ्यावें' असें तिनदां ह्मटलें. जमीन दुभंगून भूदेवी वर आली, तिनें सीतेस उचललें, तिचें अभिनंदन केलें व तिच्यासकट आंत परत गेली, व बाहेर शाबास, धन्य, असे सर्व बाजूस उद्गार निघाले. ( सर्ग ९७ )

सीतेस पुन्हा रामाजवळ पाठविण्याइतकी त्याची योग्यता नाहीं, म्हणून कवीनें सीतेकडून असें उलटें दिव्य करविलें आहे. 'शुद्ध नसले तर आंत जावो' असे म्हटल्यान तिला रामाजवळ रहावें लागलें असतें पण नाहीं; सीता शुद्ध आहे, हें सिद्ध करूनही तिला नवऱ्यापासून सोडविलेंच पाहिजे, असा कवीचा स्पष्ट उद्देश आहे.

आतां रामाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडून त्याचे डोळे उघडले; करायला गेलों एक व झालें भलतेंच असें त्यास वाटूं लागलें; आता पत्नीवियोग भासू लागून, ती असावी असें वाटूं लागलें ! त्यास क्रोधही आला, व आपल्या पराक्रमाची व नवऱ्याचा बायकोवर जो कायदेशीर हक्क आहे, त्याची आठवण झाली व त्यानें (Restitution of coujugal Rights या ) कायद्याप्रमाणें भूदेवीवर सीतेस परत आणून देण्याविषयीं फिर्याद केली. तो ह्मणतो, "पूर्वी जर मी लंकेहूनही सीता परत आणली तर भूतलापासून तिला आणणें मला काय कठीण आहे ! हे भूदेवि, माझी सीता तूं परत दे, नाहींतर मी तुला क्रोध दाखवीन. तूं माझी सासू आहेस, तेव्हां सीता तरी परत दे, नाहींतर मला तरी तिच्याजवळ घेऊन जा. माझी होती तशी सीता जर तूं परत न देशील तर पर्वत व वनें या तुझ्या रूपाला मी पीडा देईन, भूमीचा नाश करीन, व सर्व ठिकाणीं पाणीच पाणी करून टाकीन." ( सर्ग ९८ )

सीतेच्या शब्दानें जी जमीन दुभंग झाली ती रामाच्या बरळण्यानें उघडली नाहीं! अजून रामाची शिक्षा पुरी झालेली नाहीं. ब्रह्मदेव रामाचें सांत्वन करून ह्मणाला, 'आतां शोक करूं नको, तर तुझें पुढचेंही चरित्र वाल्मिकीनें आधींच लिहिलें आहे तें ऐक व त्याप्रमाणें वाग.' व अशा रीतीनें अजून त्यास जरी दहा हजार वर्षें राज्य करावयाचें होतें, तरी 'नंतर त्यानें दुसरी बायको केली नाहीं' असें त्यास ऐकवून, **त्यास पुन्हा लग्न करण्याची बंदी केली आहे** ( सर्ग ९९ ) अशा रीतीनें हें शोकपर्यवसायी नाटक संपत.

हें रामायणाचें रहस्य आहे. रामाची एकपत्नीव्रताबद्दल जी ख्याति आहे ती असमंजस लोकांनीं रामायणाचें गुह्य न कळल्यामुळें उठविलेली आहे; तिला रामायणांत आधार नाहीं जेथें कवि प्रत्यक्ष सर्व हिंदुशास्त्राच्या साधारण नियमाच्या उलट, ज्यानें पहिल्या बायकोस याप्रमाणें वागविली त्यास

दुसरी बायको करण्याची योग्यताच नाहीं, ह्मणून त्यास दुसरें लग्न करूं देत नाहीं, तो कवि त्याच्या एकपत्नीव्रताच काय गोडवे गाईल? या काव्यांत त्यास स्त्रियांचे स्वाभाविक वाटणारे अलौकिक गुण दाखवून, त्यांची पुरुषसत्तान्यायानें कशी माती होते हें दाखवावयाचें होतें, व ह्मणून हें पुरें होतांच रामाचें पुढलें दहा हजार वर्षांचें आयुष्य दहापांच श्लोकांत आटपलें आहे. कवि एकदां काव्य करूं लागला ह्मणजे एकदोन आख्यानांबरोबर शेंकडों उपाख्यानें व बारीकसारीक गोष्टी चटकदार रीतीनें वर्णिल्यावांचून त्याच्यानें राहवतच नाहीं. हल्लीच्या काळच्या पुस्तकांच्या रीतीप्रमाणें 'स्त्रियांची योग्यता व पुरुषांचा जुलूम' या विषयावरील आपलीं मतें त्यानें मिल्प्रमाणें सिद्ध केलीं नाहींत. फार कशाला, असें म्हटलें तरी चालेल कीं, इतर उपाख्यानांचें भारूड इतकें वाढलें आहे कीं, आम्ही दाखविलेलें रहस्य प्रथमदर्शनीं ध्यानांत येणें कठीण आहे. परंतु काव्याचें रहस्य तें करण्याच्या उद्देशावरून दिसतें. रामायण हें काव्य राम जन्मण्याचें पूर्वीं लिहिलें, यावरून हें केवळ कवीचें काव्य आहे. तेव्हां हें काव्य रचण्याच्या उद्देशांविषयीं विचार केला तर वरील तत्व मुख्य तत्वांपैकीं दिसतें, व याचसाठीं वरील तीनही अंकांतील सर्व गोष्टी या तत्वास परिपोषक अशा वर्णिल्या आहेत. युद्धकांड व उत्तरकांड यांतील वरील भाग वाचतां वाचतां उघडे असलेले डोळे अश्रूंनीं बंद होतात. प्रत्यक्ष कैकयी—जिला या असमंजस लोकांनीं शुद्ध डाकीण ठरविलें आहे,-तीही आधीं चांगली होती, व नंतरही पश्चात्तापानें तिनें आपलें वर्तन सुधारलें, व 'हजारों वर्षें धर्माचरण करून यशस्विनी कैकयी स्वर्गास गेली' असें शेवटीं वर्णन आहे. सारांश, अद्याप कोणास कवीच्या या मतांबद्दल शंका असल्यास त्यांनीं हे भाग स्वतः मुळांतून वाचून त्यांचा विचार करावा, इतकीच त्यांस विनंति आहे.

यावर एका जुन्या हिंदु गृहस्थांशीं बोलतां, त्यांनीं असें सुचविलें कीं, रामाच्या मनांत ही शंका उत्पन्न होण्याचें कारण, सीतेसारखी चांगली बायको आपणांसच असावी हा त्याचा हेवा (Jealousy) होय, व हा एक मानसिक रोग होय. अशा रीतीनें अलीकडील मानसिक रोगांच्या ज्ञानानें जरी याचें निराकरण होत असलें, व बायकोविषयीं असा भाव असला ह्मणजे तिच्या वर्तनाकडे नवऱ्याचें विशेष बारीक लक्ष असतें ही गोष्ट जरी खरी आहे, तरी पुढील सर्व परिणाम वाईट आहेत हें त्यांनींही कबूल केलें. यावर आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, कामक्रोधादि विकारांस रोग ह्मणण्याप्रमाणें स्त्रियांस हलकें मानणें हाही एक पुरुषांच्या मनाचा रोग असें म्हटलें तरी या रोगापासून सुटून आरोग्याची स्थिति लवकर येईल असा प्रयत्न झाला पाहिजे. याच गृहस्थांनीं एक उदाहरण असें सांगितलें कीं, एका बायकोस आपल्या नवऱ्याचें आचरण वाईट आहे असा (साधार) संशय आला; त्यामुळें तिला सर्व वेळ नवऱ्याचे मागें हिंडून त्याचें वर्तन पाहण्याचें वेड लागलें, व पुढें ती जास्त वेडी होऊन मेली. बायकोस छळून नंतर टाकणाऱ्या एका सुशिक्षित (!) गृहस्थाचेंही एक उदाहरण त्यांनीं सांगितलें. पण कांहींना कांहीं कारणानें बायकोस टाकलेलीं उदाहरणें मोजतां

मोजतां थकून जाऊं इतकीं असल्यानें येथें त्यासंबंधीं जास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

---

## प्रकरण २.

—:o:—

### 'अबलोन्नतिलेखमाला' पुस्तकाचें परीक्षण.

ही एकंदर आठ लेखांची माला रा. ब. चिंतामण विनायक वैद्य, एम. ए. एल. एल. बी. (माजी प्रमुख न्यायाधीश, ग्वाल्हेर) यांनीं (मुख्यतः १८९० पासून ९५ या वर्षांत) लिहिलेली आहे. आधीं एकेक लेख स्वतंत्र प्रसिद्ध केला होता; ते सर्व लेख एके ठिकाणीं छापून १९०६ सालीं दुसरी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे. ही माला लिहिण्याचें कारण त्यांनीं पहिल्या लेखाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत असें दिलें आहे कीं, त्यांच्या बहुगुणसंपन्न पत्नीचा त्यांस अल्पकाळांत वियोग झाल्यानें हिंदु लग्नपद्धतींत सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता त्यांस वाटूं लागली, व तिच्याच स्मरणानें त्यांस हा उपदेश लोकांस करण्याची बुद्धि झाली. प्रस्तावनेंत त्यांचा एक उद्गार आहे-'खरेंच, स्त्रिया ह्या स्वर्गाचें सुख भूतलावर देणाऱ्या आहेत आणि त्यांचें सौख्य आणि उन्नति यांपासून प्रत्येकाचें सुखांत भर पडेल इतकेंच नाहीं, तर सर्व राष्ट्राचें कल्याण होण्यास त्याच कारणीभूत आहेत.' सुदैवानें बहुगुणी पत्नी मिळाल्यानें स्त्रियांचे स्वाभाविक गुण ज्यांच्या विशेष नजरेस आले, व ज्यांनीं वरील उद्गार काढला, त्यांनीं या लेखांत खरोखरी त्यांची उन्नति व्हावी, त्यांचें सौख्य वाढावें असेच कांहीं उपाय सुचविले असतील असें आह्मांस प्रथम वाटलें. परंतु एकेक लेख वाचतांना हा ग्रह कमी होत जाऊन, 'प्रस्तुत कोणती सुधारणा शक्य आहे' हा ७ वा लेख वाचून आमचा हा ग्रह अगदीं बदलला, व इतक्या कळकळीचा शेवट असा झालेला पाहून वाईटही वाटलें! अशा या मालेचें साधारण स्वरूप काय आहे हें त्यांतील मुख्य लेखांचा विचार करून दाखविलें आहे.

लेख १. 'सामाजिक सुधारणारूपी खडकावर आजपर्यंत कित्येक धाडशी सुधारकांचीं गलबतें आपटून चक्काचूर झालीं आहेत,' अशी सुरुवात करून प्रथम सामाजिक सुधारणेचा इतिहास दिला आहे, व तो चटकदार करण्यासाठीं कीं काय, मधून मधून सुधारकांची पूजा केली आहे. हा लेख केसरी ता. ४-११-१८९० या अंकाची पुरवणी ह्मणून प्रसिद्ध झाला होता; यावरून त्याचें धोरण कळेल. इंग्रजी शिक्षणाचा परिणाम असा वर्णन केला आहे:—'नवीन शोधांतील असे चमत्कार पाहून आपल्या लोकांचीं मतें सानंदाश्चर्यानें थक्क होऊन नव्या विचारांत गढून गेलीं. पहिल्या हर्षलहरींत तर प्रत्येक पाश्चात्य तऱ्हा प्रिय वाटूं लागली, इतकेंच नाहीं तर त्यांचा अंगिकार करण्यांतही आह्मांस भूषण वाटूं लागलें. निराकार ईश्वर आणि निसर्गप्रधान धर्म लोकांस प्रिय वाटूं लागले, व जिकडे तिकडे लोक धर्मसुधारणेच्या मार्गे लागले. विचारशून्य लोकांनीं बाप्तिस्मा घेतला; धाडशी आणि हिंमतवान लोकांनीं नवीन धर्मपंथ काढले; व विचारशील आणि दूरदर्शी लोकांनीं आपल्या वडिलोपार्जित धर्माचीच

सुधारणा करण्याचें मनांत आणलें. स्त्रियांच्या दुर्दशेची लोकांस कींव आली व त्यांचें दुःख व पराधीनता विपरीत वाटूं लागून तीं नाहींशीं करण्याकडे लोकांचें चित्त वेधलें. एकीकडे कांहीं अरण्यपंडित मंडळी फार दिवस अंधारकोठडींत कोंडलेल्या आपल्या बायकामुलींस घेऊन हवा खाण्यास जाऊं लागली; कांहीं स्त्री-शिक्षणांत गुंतली, व कांहीं त्यांच्या लग्नाच्या चालींत फेरफार करण्यांत गुंतली. '

ते पुढें ह्मणतात कीं, बंगालप्रांतील सुधारकांनीं लोकमत अनुकूल नसतां एकदम पुनर्विवाहाचा कायदा करून घेतला ही मोठी चूक केली. यावर आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, पुनर्विवाह हा कांहीं पोरखेळ नाहीं; जें लग्न कायदेशीर ठरण्यावर पुढील वारसदारांचा हक्क ठरणार तें लग्न जर हिंदुधर्माप्रमाणें कायदेशीर ठरत नाहीं, तर जुन्या ग्रंथांचा व लोकमताचा त्यास आधार असून काय उपयोग? जोंपर्यंत एका माणसास तरी तें लग्न कायदेशीर नाहीं असें ह्मणतां येतें, तोंपर्यंत लोकमत असो वा नसो, अगदीं पहिल्या पुनर्विवाहाच्या आधींच हा कायदा पास करून घेण्याशिवाय गत्यंतर नाहीं हें कायदेपंडित लोकास कळूं नये हें आश्चर्य आहे. तो कायदा सुधारकांनीं आपणांसाठीं मागितला; त्यामुळें जुन्या हिंदुधर्मांत कांहींच ढवळाढवळ झाली नाहीं. मग सुधारकांनीं सर्व हिंदुस्थानच्या लोकांची धोंड गळ्यांत बांधून तें अनुकूल होईपर्यंत एकही पुनर्विवाह करतां येऊं नये अशा स्थितींत कां थांबावें? पुढें दुसरी चूक अशी आहे:—ते ह्मणतात कीं, त्या कायद्याच्या वेळीं बहुजनसमाज प्रतिकूल असल्यानें त्यांनीं त्यास जे भयंकर अडथळे आणिले, त्यामुळें त्यांत विधवांस सामाजिक हक्क जसे सुधारकांस हवे होते तसे मिळाले नाहींत. ' मनुष्यमात्रास अति प्रिय ज्या दोन वस्तु संतति व संपत्ति त्यांस बिचाऱ्या पुनर्विवाह करणाऱ्या विधवा मुकतात इतर देशांत संतति व संपत्तीवरील हक्काच्या अडचणी विधवांस अनुकूल रीतीनें दूर केलेल्या आढळतील; पण या कायद्यांत हिंदुधर्माचे मूळतत्वांस अनुसरून आणि विधवास फार प्रतिकूल रीतीनें वरील प्रश्नाचा निकाल केला आहे ही जी उणीव राहिली तिचा परिणाम जुन्या लोकांस फायदेशीर होऊन सुधारणेचें काम कित्येक वर्षें मागें पडलें '. यावरून त्यांचें ह्मणणें असें दिसतें कीं, इतर देशांत विधवांसच जास्त हक्क दिले आहेत. पण हें चूक आहे. इतर देशांत विधवांचे हक्क स्त्रियांच्या साधारण हक्कांवरून ठरविले आहेत. व त्याचप्रमाणें हिंदु विधवंचे हक्क हिंदुलॉप्रमाणें जे स्त्रियांचे हक्क आहेत त्यांवरून ठरविले असले पाहिजेत. तेव्हां या उणीवेचें खापर वास्तविक हिंदुधर्मावरच फुटतें. त्यांनींच दुसऱ्या लेखांत हिंदु स्त्रियापेक्षां युरोपांतील स्त्रियांस सामाजिक हक्क किती जास्त आहेत हें सांगितलें आहे; व वर ' हिंदुधर्माचे मूळतत्वांस अनुसरून ' विधवांचे हक्क ठरविले असेही ह्मटलें आहे. इतकें सर्व लक्षांत असूनही वरील व्यर्थ विधान करणें ह्मणजे साध्या—भोळ्या लोकांस शब्दजंजालांत गुरफटविणें नाहीं काय?

याच लेखांत पुढें ३०—४० पानें भरून असें प्रतिपादन केलें आहे कीं, एखादा सुधारणा साधारण लोकांना बहुमतानें सुरू केली ह्मणजे तिला पुन्हा शास्त्री लोक जा अडथळा आणितात तो नाहींसा करण्यास कायद्याचीच मदत आवश्यक आहे; व तरच तीं सुधारणा

कायम टिकते. परंतु लोक मताविरुद्ध कायदा केल्यानें उलट तो सुधारणेस प्रतिकूल होतो. पुढें ७ व्या लेखांत त्यांनीं एक कायदा सध्यां शक्य नसलेल्या सुधारणेसाठीं मागितला आहे तो असा:—' बालविवाहाचा बालवैधव्य हा दोषकारक परिणाम टाळण्यास विचारी धर्मास धरून चालणारे सुधारक असा उपाय सुचवितात कीं, सप्तपदीपर्यंतचा विधि आधी करून वधूस बापाच्या घरींच राहूं द्यावी, व ऋतुप्राप्तीनंतर सप्तपदी करून विधि पूर्ण करावा. हा उपाय चांगला आहे, व शक्य आहे. परंतु आधींच्या विधीनें वाग्दानापेक्षां जास्त बंधन लोकांनीं समजलें पाहिजे; व तें न समजतां जर कोणी मध्येंच दुसऱ्याशीं सप्तपदीसकट जरी लग्न लाविलें तरी तें कायद्यानें रद्द समजून, शिवाय तें करणारांस शिक्षा असावी. असा कायदा करण्यास सरकारास कांहीं हरकत असूं नये.' परंतु या ठिकाणीं या कायद्यास किती लोक अनुकूल आहेत हें दिलें नाहीं. उलट ' पण लोकमतानें किंवा कायद्यानें सप्तपदीपर्यंतच्या लग्नास वाग्दानापेक्षां जास्त महत्व देण्यांत येईल अशी आशा दिसत नाहीं,' असें स्पष्ट ह्मटलें आहे. मग लोकमताविरुद्ध कायदा मागूं नये हा नियम कोठें राहिला? आपला तो बाळ्या व दुसऱ्याचें तें कारटं! असो. पुनर्विवाहाच्या कायद्यानें सुधारणा मागें न पडता थोडे तरी पुनर्विवाह नेहमीं होत आहेत. परंतु असल्या लेखांनीच सुधारणा कित्येक दशकांनीं कशी मागें पडते हें सर्व लेखांचा विचार झाल्यावर दिसून येईल.

आतां ठिकठिकाणीं सुधारकांच्या नाकांत काड्या घालण्याचा जो यत्न झाला आहे, क्षुल्लक प्रश्नासंबंधाही ' वाचकांचें मनरंजन होऊन भाषेस 'सौंदर्य यावें' यासाठीं सर्व जगाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांतील भाराभर उदाहरणें देऊन जें अवडंबर माजविलें आहे, तें एकीकडे ठेवून, या मालेच्या प्रस्तावनेदाखल जो हा मोठासा पहिला लेख त्यांतील मुख्य मुद्दे पाहूं. सामाजिक सुधारणेचा इतिहास दिल्यानंतर सुधारकांच्या प्रयत्नांत काय दोष आहेत ते सांगितले आहेत. ते असे:—(१) हिंदु लोकांत सर्व सामाजिक गोष्टी धर्मांत गोवल्यानें सामाजिक सुधारणा लोकांस धर्मसुधारणा वाटते. परंतु धर्मसुधारणा करणें लोकांस विशेष जड वाटतें ह्मणून ते सामाजिक सुधारणेच्या उलट असतात. ह्मणूस त्यांस सुधारणेकडे वळवण्यास त्यांचे धर्मसंबंधीं दोष घालविले पाहिजेत. पुढें हेच ह्मणतात, कीं 'सुधारणेकडे लोकांचें लक्ष न वेधण्याचें कारण सुधारक पक्षांत आणखीही एक व्यंग आहे. तें हें कीं, जे सामाजिक सुधारक आहेत तेच धर्मसुधारक असल्यानें सामाजिक व धर्मसुधारणेंत काय फरक आहे हें लोकांस कळत नाहीं. जो उपदेशक लोकांस पुनर्विवाह स्वीकारण्याचा उपदेश करून लागलीच वेद पौरुष आहेत, मद्यपान स्तुत्य आहे हींही मतें स्थापित करण्याच्या हेतूनें त्यांचें आचरणही करतो त्याचें बोलणें एकाही हिंदूला रुचणार नाहीं. धार्मिक सुधारणा जरी झाली पाहिजे तरी ती एकदम होणार नाहीं. परंतु तशी गोष्ट सामाजिक सुधारणेची नाहीं. ती बहुतेक लोकांस मान्य होण्यासारखी आहे. (!) ह्मणून दोन्ही सुधारणा एकदम करूं जाण्यानें कांहीं वर्षें दोहोंचाही 'निराशा होण्याचा संभव आहे.' यांतील परस्पर

विरोध लेखकाच्या ध्यानांत आला होता काय ? दोन्हीं विधानांचें जोरदार मंडण केलेलें पाहून. मनरंजन होतें यांत शंका नाहीं ! पहिल्या विधानाच्या मंडणांत धर्म-सुधारणेस स्त्रियांचें मत त्या बाजूस वळविल्यानें ती लवकर कशी पसरते हें खिस्ती, बौद्ध इत्यादि धर्मांच्या इतिहासावरून दाखविलें आहे; व स्त्रीशिक्षणानें त्यांचीं मनें सुधारणेकडे लवकर वळविण्याचा प्रयत्न केल्यास होण्यासारखा आहे, आणि सुधारणेंत हेंच कृत्य अत्यंत महत्वाचें आहे असेंही दाखविलें आहे. व आतांपर्यंत इकडे सुधारकांनीं लक्ष दिलें नाहीं, स्त्रियांचीं मनें सुधारणेकडे वळविण्याचा प्रयत्न केला नाहीं, ही त्यांची एक मोठी चूक झाली असें ह्मटलें आहे. ही चूक कबूल केली पाहिजे असें आह्मांस वाटतें. परंतु त्यांच्या ऐतिहासिक उदाहरणांत खिस्तीधर्माचा प्रसार होण्यास स्त्रियांचीच मुख्य मदत झाली ही गोष्ट जरी खरी असली तरी ती बौद्धधर्मास लागू पडत नाहीं. त्याचा प्रसार सुरवातीस पुरुषांमध्यें जास्त झाला असें बौद्धग्रंथांतील हकीकतीवरून स्पष्ट दिसतें. हा ऐतिहासिक मुद्दा आहे ह्मणून मुद्दाम खोडावा लागला. हल्लीं बौद्धधर्मासंबंधीं प्रमाण असे प्रो. धर्मानंद कोसंबी यांचेंही हेंच मत आहे. ( २ ) सामाजिक सुधारकांची दुसरी यापेक्षांही मोठी चूक ह्मणजे ' त्यांनीं मध्यम व हलक्या स्थितींतील लोकांकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं, इतकेंच नाहीं, तर ते अडाणी ह्मणून त्यांच्या मताची पर्वा केली नाहीं. त्यास उपदेश करून त्यांचें मत वळविलें नाहीं, व ह्मणून ते सुधारकांचा द्वेष करतात. पुढें अज्ञ बहुजनसमाजावर सुधारणेच्या उदाहरणाचा कसा परिणाम होतो तें सांगितलें आहे:—' जेव्हां एखादा लोकसमाज आपल्या आसपासच्या लोकांपेक्षां जास्त सुधारलेला असतो, तेव्हां त्यांच्या सुधारलेल्या धर्माचा व रीतींचा त्याच्या सहवासास असलेल्या कमी सुधारलेल्या लोकांवर कांहीं तरी परिणाम घडतोच; आणि त्यांचें उदाहरण पाहून तीच रीत किंवा तो धर्म आपणही स्वीकारावा असें त्यांस वाटूं लागतें. ' ' एकंदरीनें शिक्षणाचा प्रसार व इंग्रजांच्या सद्वर्तनाचें उदाहरण यांमुळें लोकांचीं मनें हळूहळू सुधारतच चालली असून, लवकरच या चालीच्या ( बालविवाह व असंमत वैधव्य ) संबंधानं चांगला किंवा वाईट कांहीं तरी परिणाम होईल असें दिसतें. सुधारणा ही राष्ट्रांतील सर्व लोकांच्या खुषीवर अवलंबून आहे, व त्यांचें मन वळविण्यास कोणाचें तरी उदाहरण त्यांच्यापुढें असलें पाहिजे, किंवा या वाईट चालींच्या परिणामांची चर्चा त्यांस समजली पाहिजे. ' यावरून या दोषाचें मोठेपण तरी कमी होतें; कारण बहुजनसमाजाचें मत वळण्यास कोरड्या चर्चेपेक्षां उदाहरणाचा जास्त उपयोग आहे हें त्यांनीं कबूल केलें आहे.

( ३ ) तिसरी चूक—लोकमताविरुद्ध कायदा मागितला.

( ४ ) चवथी चूक—' शास्त्री लोकांशीं वाद करण्यांत अर्थ नाहीं, कारण ते नेहमीं जुन्या मतांस चिकटून राहिल्यानें निःपक्षपाताचा न्याय करण्यास योग्य नाहींत. ह्मणून कोणती सुधारणा करावयाची हें लोकांनींच ठरवावें ह्मणजे हेच शास्त्री आपलीं शास्त्रें धरून सुधारणेस अनुकूल होतील. ' हा उपाय मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्यास सांगण्याप्रमाणें सांगणें फार सोपें आहे.

ह्राच उपाय सुधारकांनीं आजपर्यंत केला आहे, ह्मणजे अमुक सुधारणेस शंकराचार्यांची परवानगी आहे कीं नाहीं हें न पाहतां सुधारणा केली, व ह्मणूनच थोडी तरी सुधारणा झाली आहे. परंतु सुशिक्षित ह्मणविणारे बहुतेक हिंदु लोक रा. ब. वैद्यांप्रमाणें अजून दूर राहण्याचें कारण त्यांस या सुधारणा नकोत हें नसून, अजून लोकमत नाहीं, शंकराचार्यांची आज्ञा नाहीं हें आहे. हिंदुधर्माप्रमाणें कोणतीही सुधारणा करणें हा धर्माधिकाऱ्यांचा हक्क आहे, व तो लोकांनीं घेणें ह्मणजे फार मोठी धर्मसुधारणा होते, व ती करण्यास रा. ब. वैद्यही तयार नाहींत. तेव्हां ही चूक सुधारकांची नसून हिंदु लोकांची आहे.

याप्रमाणें मोठे दोष झाल्यावर 'सुधारकांचीं स्वतःचीं लहानसहान व्यंगें' दाखविलीं आहेत; तीं अशीं:–(१) 'बालविवाह व असंमत वैधव्य यांमुळें फायदे व तोटे काय आहेत, व सुधारलेल्या ज्या रीति सुचविल्या आहेत, त्यांत फायदे जास्त व तोटे कमी आहेत कीं काय यासंबंधा अजून पूर्ण उहापोह झाला नाहीं; उलट यांतील निरनिराळ्या मुद्यांसंबंधीं विचारी लोकांचीही इतकीं भिन्न मतें आहेत कीं, या बाबतींत सुधारणा करणें लोकांस भयंकर वाटतें. यासाठीं या विचारी लोकांनीं (यांसच पुढें वितंडवादी ह्मटलें आहे.) आपसांत वादविवाद केला पाहिजे; व जरी त्यांच्यांत समेट झाला नाहीं तरी यांशिवाय बहुतेक देश ज्या **स्वतः विचार न करणाऱ्या** लोकांनीं भरला आहे, त्यांनीं या वादापासून आपणांस इष्ट असा निर्णय ठरविला ह्मणजे पुरे' या विधानावर लिहिण्याचें आधीं त्याचें हसूंच येतें! विचारी ऊर्फ वितंडवादी लोक ह्मणजे जुन्या पक्षांतिल पुढारी व सुधारकांचे पुढारी; यांच्या वादानें जर सुधारणा करावी असें ठरणार नाहीं, मग स्वतः विचार न करणारे सर्वसामान्य लोक स्वतःस इष्ट असा एकच व तोही सुधारणा करण्याचा निर्णय ठरवितील हें त्यांस सहज वाटतें! व ह्मणून ते पुढें ह्मणतात, 'हें झालें ह्मणजे ती सुधारणा कशी प्रचारांत आणावी, निरनिराळ्या मतांनीं भरलेल्या शास्त्रांशीं तिचा मेळ कसा घालावा, किंवा तीस कोणता शास्त्रार्थ लागूं करावा इतकेंच काम उरेल.' हें पहिल्या आवृत्तींतलें वाक्य दुसऱ्या आवृत्तींत गाळलें आहे, ही त्यांच्या मतांत सुधारणा झाली असें पहिल्यानें वाटतें; पण सुधारणा जुन्या मतास धरून पाहिजे हें पुढें दिलेलें मत अजून कायम आहे. तेव्हां हें वाक्य गाळल्यानें त्यांचें मत बदललें असें सिद्ध होत नाहीं. स्वतः विचार न करणाऱ्या लोकांनीं एकदां सुधारणा करण्याचें ठरवून पुन्हा शास्त्रांशीं मेळ घालीत बसणें ह्मणजे एक पाऊल मागेंच घेणें आहे. तरी जोंपर्यंत थोडक्याशा सुधारक पुढाऱ्यांशीं वाद करणारे जुने लोक शेकडों आहेत, तोंपर्यंत सामान्य लोकांस 'सुधारकांची चांगली फजिती झाली' इतकाच बोध होतो. हा परिणाम आपल्याकडे १८७० सालच्या वादाचा झाला. व कलकत्यांतील १८५५ सालच्या पं. ईश्वरचंद्रांच्या दोन जंगी वादाचा हाच परिणाम झाला. तिकडच्या दोन्ही वादांत कांहींच निर्णय झाला नाहीं, व पुण्यास पंचांच्या बहुमतानें उलट निर्णय झाला. मग सामान्य लोकांनीं सुधारणेस अनुकूल असा एकच निर्णय ठरविणें रा. ब. वैद्यांस शक्य कसें वाटतें? त्यांच्या या विधानास पुष्टीकर-

णार्थ मिलमन् या इतिहासकाराचें ह्मणणें त्यांनीं दिलें आहे, तें असें:—' सुधारणेसंबंधानें जितके फेरफार आजपर्यंत जगांत झाले आहेत, ते असे झाले आहेत कीं, एखाद्या चालीनें लोकांस मोठी गैरसोय उत्पन्न होऊन तिचा मध्य व कनिष्ठस्थितींतील लोकांनीं विचार करावा, व सर्वांस मोठा उद्वेग यावा; नंतर सर्वांस स्फूर्ति होऊन त्यांनीं जुनी चाल एकदम रद्द करून नवी स्थापावी.' हे शब्द त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें जरी सोन्याच्या अक्षरांनीं लिहिण्यायोग्य असले तरी ते हिंदुस्थानास लागू होत नाहींत. त्यांत वर्णिलेली सुधारणा ज्यास क्रांति (Revolution) ह्मणतात ती आहे; व रा. ब. वैद्यांस लोकांस न कळत होणारी सामाजिक सुधारणा हवी आहे! शिवाय हिंदु लोकांस अजून प्रचलित वाईट चालींनीं 'मोठी गैरसोय उत्पन्न होऊन' उद्वेग आलेला दिसत नाहीं. सुधारकांनीं बालविवाहाचे तोटे दाखवितांच हिंदुधर्माभिमानी पुढें येऊन, त्यामुळें स्त्रियांची नीति बिघडत नाहीं, नवऱ्यावर जास्त प्रेम जडतें, व त्याच्या विचारांप्रमाणें बायकोचे विचार होतात, इत्यादि फायदे दाखवितात; व बालवैधव्याची गोष्ट काढली कीं, 'जगणें मरणें कोणाच्या हातचें आहे? पोरीचें नशीबच फुटकें!' असा निर्लज्जपणें जबाब मिळतो! मग मिल्मनचे हे शब्द पुन्हा पुन्हा उतरवून त्याप्रमाणें झालेलीं इतिहासांतील भाराभर उदाहरणें देऊन काय फळ? त्या सर्व उदाहरणांच्या उलट आह्मी एकच उदाहरण देतों; तें हुंड्याचें. (बहुतेकांच्या शक्तीबाहेर) हुंडा देण्याच्या चालीनें कित्येक लोक कर्जांत पडून धुळीस मिळाले; कित्येक लग्नें कायमचीं तहकूब राहूं लागलीं, व त्यामुळें बालहत्येसारखी राक्षसी चाल प्रचारांत आली; मुलीचा जन्म झाला कीं, आईबापांपासून नोकरांपर्यंत सर्व लोकांनीं नाकें मुरडून, वर तिला शिव्याशाप देऊन तिचें स्वागत करण्याची प्रवृत्ति रूढ झाली! उलटपक्षीं आतां सुधारणेस सुरुवात झाल्यापासून वर्षोंवर्षीं त्याच्या उलट ठराव पास होत आहेत, सर्व लोकांस त्यापासून 'गैरसोय' झाली आहे, कित्येकांस 'उद्वेग' येऊन त्यांनीं कंठशोष करून उपदेशही केला असेल. परंतु जोंपर्यंत 'संतति संपत्ति मनासारिखी' असूनही सुधारक ह्मणविणाऱ्यांसही २५–३० तोळे सोन्याचा लोभ सुटत नाहीं, मग सर्वांस एकदम स्फूर्ति काय मिलमनचे शब्द सर्वांच्या घरावर चिकटवून येणार आहे?

(२) सुधारकांचें दुसरें व्यंग असें आहे. 'हल्लींच्या चालींचें वाईटपण दाखविणें इष्ट आहे, व त्याप्रमाणें बहुतेकांचा ग्रहही या चाली वाईट असा झाला आहे; पण त्यांच्या बदलीं कोणच्या चाली आणाव्या हें सांगण्याची वेळ आतां आली असून तशी लोकमान्य सुधारणा अजून सुधारकांकडून सुचविण्यांत आली नाहीं. नवी सुधारणा जुन्या चालीस अगदींच सोडून नसून, जुन्या चालीपासूनचे फायदे कायम राखणारी अशी तर असलीच पाहिजे; परंतु शिवाय ती सुधारलेल्या मतांसही अनुसरून असून तींत सर्व इच्छित हेतु साधतलि अशी असावी. परंतु ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, सुधारकांनीं ज्या चाली सुचविल्या त्यांत सर्वप्रकारें दोषरहित आणि लोकमान्य अशी एकही नव्हती. त्यांनीं मोठ्या

थोडसानें बालविवाह व पुनर्विवाह यांसंबंधीं सुधारणा एकदम अत्युच्चस्थितीस पोंचाव्या अशा सूचना केल्या आहेत, पण त्या अमलांत आणण्याचे उपाय केवळ भित्रेपणाचे, अप्रशस्त व द्राविडीप्राणायामासारखे आहेत.' ह्मणजे रा. ब. वैद्यांस थोडें खाणारी, थोडया जागेंत राहणारी, वासरूं नसलेली, पण पुष्कळ दूध देणारी अशी ह्मैस थोडया किंमतींत हवी आहे असें वाटतें; तरी कोणाच्या पहाण्यांत अशी ह्मैस किंवा गाय असल्यास त्यांनीं त्यांस कळवावें अशी आह्मी विनंति करतों. आह्मी त्यांस इतकेंच विचारतों कीं, जर बहुतेकांस या चाली वाईट असें वाटत आहे, मग त्यांच्या बदलीं कोणती सर्वमान्य चाल आणावी हें सुधारकांनीं सुचविण्याची वाट कशास पाहिली पाहिजे? सुधारकांच्या सुधारणा लोकमान्य नाहींत हें सुधारकांचें व्यंग कोठलें? यावरून अशीही शंका येते कीं, रा. ब. वैद्यांनीं पुढें ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्यांस वरील सर्व विशेषणें लागतात असा त्यांचा समज असावा. तो कितपत खरा ठरतो हें त्या सुधारणा पाहिल्यानें कळून येईल.

पुढें सुधारक बोलण्याप्रमाणें वागत नाहींत; सर्व सुधारणा एकदम घडून याव्यात असा त्यांचा प्रयत्न आहे; हिंदुधर्माची निंदा करून आपलें मत सिद्ध करतात; १८७० सालच्या वादांत तडजोड होण्यासारखी होती असें ह्मणतात, ह्मणजे एकंदरींत विधवाविवाह जरी शास्त्रसंमत नाहीं, तरी बालविधवांचे पुनर्विवाह व्हावेत अशी सर्वानुमतें तोड पडण्यासारखी होती असें सांगतात; परंतु अशी अर्धवट सुधारणा कामाची नाहीं, पाहिजे त्या विधवेस लग्नाची मोकळीक पाहिजे, असा सुधारकांनीं दुराग्रह धरल्यानें तेंही ठरलें नाहीं; परमेश्वराच्या घरीं बायका व पुरुष सारखे आहेत, व ह्मणून बायकांसही वाटेल तेंव्हां लग्न करण्याची मोकळीक असावी, अशा खोल विचारांत गर्क झाल्यानें 'समाजाच्या सर्व रीति इतक्या कडकडीत न्यायशास्त्राच्या आधारावर कधींही बसविलेल्या नसतात, व **त्या तशा बसविणें शक्यही नाहीं**, हें तत्व सुधारकांच्या लक्ष्यांत आलें नाहीं,' इत्यादि व्यंगें दाखविलीं आहेत. याप्रमाणें न्यायाधीश लोक उघड व स्पष्ट न्यायाचें प्रतिपादन करूं लागले, तेंव्हां त्यांच्या तोंडास कोणी लागावें? हा संगतीचा दोष तर त्यांस नसेल लागला? असो. जर वरील तडजोड होण्यासारखी होती तर जुन्या लोकांनीं ती आपणांसाठीं कां करून घेतली नाहीं? काय विधवा फक्त सुधारकांचेच घरीं आहेत? कीं जुन्या लोकांच्या घरच्या विधवांचे पुनर्विवाह करण्याचाही मक्ता सुधारकांनींच घेतला आहे? दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत विधवाविवाहासंबंधीं अजून पाऊल विशेष पुढें पडलें नाहीं याचें हेंच कारण आहे असें त्यांनीं पुन्हा ह्मटलें आहे. व त्यांचा ५ वा लेख (ज्यांत बालविधवाविवाह कलिवर्ज्य प्रकरणाशिवाय सशास्त्र दाखविला आहे!) त्यावेळीं लोकांपुढें असता तर कदाचित् सुधारणेस ही दिशा लागली असती असें त्यांस 'स्वमतप्रशंसेच्या भरांत कधीं कधीं वाटतें' असेंही ह्मटलें आहे. याच भरांत असतां आपणास ईश्वरानें मुद्दाम ही सुधारणास्मृति लिहिण्यास पाठविलें असेंही वाटून त्यांनीं ही लेखमाला लिहिली असावी असें आह्मांस वाटतें. पण जर तो लेख प्रसिद्ध होऊन 'दहा वर्षांनींही जुन्या

लोकांनीं मान्य केला नाहीं, मग त्यावेळीं तो कितपत मान्य झाला असता याची कल्पना होते. शिवाय ७ व्या लेखांत ही तडजोडही सध्यां अशक्य आहे असें त्यांनींच ह्मटलें आहे! जर त्यांचें हृदय बालविधवांबद्दल इतकें कळवळत आहे तर नसते दोष सुधारकांवर लादण्याच्या खटाटोपांत न पडतां, त्यांनींच पुढाकार घेऊन, शंकराचार्यांशीं शास्त्रार्थ करून त्यांचें आज्ञापत्र मिळविलें असतें तर त्यांस जास्त पुण्य लागलें नसतें काय? असो.

या पुस्तकांत रा. ब. वैद्यांच्या लेखांवर टीका करण्याचाच उद्देश नसल्यानें पुढील लेखांतील मुख्य मुद्यांचाच विचार केला आहे. पहिला लेख प्रस्तावनेपर असला तरी महत्वाचा असल्यानें त्याचा जास्त विचार करणें भाग पडलें.

लेख—२. याचा विषय 'लग्नाच्या चालीचा इतिहास, तिचे खरे उद्देश, व त्यांचें परस्पर महत्व' हा आहे. यांत इतिहासाच्या भागांत असें सांगितलें आहे कीं, हिंदुस्थानांत (सर्व देशांप्रमाणें) 'प्रथम स्त्री-पुरुषांचा अनियमित व्यवहार, नंतर लग्नसंस्था व स्त्रियांचें दास्यत्व; नंतर त्यांविषयीं उदारबुद्धि व प्रीति व त्यापासून स्त्रियांची उन्नति व स्वयंवराचे अधिकार; नंतर धर्माचें प्राबल्य व त्यापासून झालेली एकपक्षीं नीतिमत्ता व इतरपक्षीं स्त्रियांची अवनति,' येथपर्यंतच मजल आली आहे. परंतु पाश्चात्य देशांत धर्मबंधनें शिथिल होऊन विवाहास केवळ कराराचें रूप आणण्याकडे स्त्रियांचा व त्यांचा पक्ष धरून भांडणाऱ्यांचा कल आहे. ही या इतिहासांतील चवथी पायरी होय, व ही अवनति होय. 'सुधारणेच्या प्रसारानें किंवा जगामध्यें जो एकसारखा ज्ञानविकास होत आहे, त्यामुळें स्त्रियांचे अंगीं उद्योग करण्याचें सामर्थ्य व योग्यता येत चालली असल्यामुळें पुरुषांचें आपल्यावरील जोकड अजीबात फेंकून देऊन आपण अगदीं स्वतंत्र व्हावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली आहे. परंतु यामुळें मानवी स्थिति चांगली होईल कीं सर्व घोंटाळा होऊन निकृष्ट होईल याचा परमेश्वराशिवाय आज कोणास निर्णय करतां येणें अशक्य आहे.' 'शारीरिक व मानसिक शिक्षण सर्वांस मिळूं लागल्यापासून तर स्त्रियांनीं असें दाखविलें आहे कीं, पुरुषांस कलानैपुण्याची व ज्ञानाची जी घमेंड आहे ती फुकट असून त्यांस वर्चस्व येण्याचें कारण केवळ त्यांचें शिक्षण व अनुकूल स्थिति होय. व जर स्त्रियांसही त्या सवडी दिल्या तर त्या प्रत्येक कामांत त्यांची बरोबरी करतील.' 'लग्न ह्मणजे केवळ करार असें स्वरूप अद्याप तिकडे आलें नाहीं. पुरुषांचे अंगीं अधिक बळ व अक्कल असल्यानें कायद्यानें व लोकमतानें त्यांस वर्चस्व मिळालें आहे. परंतु स्त्रियांचे अभिमानी लोक असें ह्मणतात कीं, जर बायकोच नवऱ्यापेक्षां शहाणी असली तर तिला हे हक्क कां असूं नयेत? सारांश, त्यांचा यत्न ह्मणजे लग्नास केवळ कराराचें रूप देण्याकडे आहे. परंतु लग्नाची गोष्ट कोठेंच अशी नाहीं. लग्नाचा अर्थ करार हा इतक्याचपुरता पाश्चात्य देशांत समजला जातो कीं, आपल्यांत जसा व्यापारांत करार होतो, तसा त्यांच्यांत प्रत्यक्ष नवरा—बायकोंत होतो. परंतु मनास वाटेल तो हक्क ठरविण्याचा अधिकार स्त्री—पुरुषांस असावा असा संप्रदाय सुरू करण्याकडे

स्त्रियांचे अभिमानी लोकांची प्रवृत्ति आहे. व या यत्नास अनुकूल स्त्रियांचें शिक्षण व बरोबरीचे शारीरिक व मानसिक गुण व मिळकत मिळण्याचे व उपभोगण्याचे स्वतंत्र हक्क या गोष्टी झाल्या आहेत.'

वरील लांब उतारे देण्याचें कारण रा. ब. वैद्यांच्या डोळ्यांपुढें सुदैवानें सुधारणेचा व ज्ञानाचा लख्ख प्रकाश असतांही त्यांच्यानें त्याकडे न पाहवून ह्मणा किंवा मुद्दाम डोळे झांकून तो बाजूस सारून, ह्याडीं खिळलेल्या हिंदु कल्पनांचें श्रेष्ठत्व कसें तरी स्थापण्याचा त्यांनीं कसा प्रयत्न केला हें दाखविणें आहे. लग्नास शुद्ध कराराचें रूप देणें ह्मणजे वाईट व त्यामुळें जास्त घोंटाळाच होईल असें शंभरदां ह्मटल्यानें त्यांचें ह्मणणें खरें ठरत नाहीं. रा. यशवंतराव आठले, एम. ए. एल. एल. बी., ज्यांस रा. ब. वैद्यांनीं ४ थ्या लेखांत विद्वद्रत्न ह्मटलें आहे, यांनींही १८८७ सालीं हेमंतव्याख्यानमालेंतील आपल्या 'हिंदुधर्मांतील विवाहकाल' या व्याख्यानांत 'विवाह हा करार नाहीं, तर (सोळा संस्कारांपैकीं) एक धार्मिक संस्कार आहे'असें मोठ्या अभिमानानें ह्मटलें आहे. तेव्हां यासंबंधीं थोडा विचार केला पाहिजे. संस्कार ह्मणजे काय? उपनयन हा एक संस्कार आहे, ह्मणजे तो केल्यानें द्विजांच्या मुलांस द्विजत्व व अध्ययनाचा अधिकार प्राप्त होतो; त्यांत त्या मुलास आपल्या जबाबदारीवर कांहींही प्रतिज्ञा घ्यावयाच्या नसतात, तर केवळ अध्ययनास आरंभ करण्याचा तो एक विधि आहे, ह्मणून त्यास संस्कार ह्मणतां येईल; तो करार नाहीं. परंतु लग्न ह्मणजे हिंदुधर्माप्रमाणें तरी फक्त संस्कार आहे काय? ह्मणजे नवरा—बायको यांनीं मिळून गृहस्थाश्रमाप्रमाणें राहण्यास सुरुवात करण्याचे वेळीं एक कांहीं विधि करावयाचा ह्मणून लग्नविधि करतात काय? नाहीं. लग्न ह्मणजे केवळ चार भटांनीं मिळून मंगलाष्टकांत समुद्रमंथनांतून निघालेलीं रत्नें व हिंदुस्थानांतील नद्या यांचीं नांवानिशी घोकून व तसेच इतर कांहीं मंत्र ह्मणून करावयाचा संस्कार नाहीं. लग्न ठरतांना व्याह्यांच्यामध्यें देण्याघेण्याचे करार ठरतात ते वगळले तरी विधींत ठिकठिकाणीं करार दृष्टीस पडतात. कन्यादानांत दाता वरास ह्मणतो कीं, 'धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थांत आपण हिला सोडून वागूं नये,' व वर प्रतिज्ञा घेतो कीं, 'हिला सोडून मी वागणार नाहीं.' पुढें पाणिग्रहण करतांना 'सौभाग्यासाठीं मी तुझ्या हस्ताचें ग्रहण करितों' इत्यादि ह्मणावें लागतें. लाजाहोमाचे वेळीं वर ह्मणतो, 'तूं व मी एक झालों, तेव्हां त्याप्रमाणें सर्व व्यवहार करूं, व परस्परांस प्रिय व आनंदित करणारी व परपस्परांशीं संतुष्ट अशीं आपण होऊं.' सप्तपदीचीं सात पावलें चालल्यानें 'आपण उभयतां सखे झालों' असें वरास ह्मणावें लागतें. ईश्वरास व आप्तइष्टांस साक्षी ठेवून उच्चारलेल्या या वाक्यांचा अर्थ केवळ संस्कार असाच होतो काय? ज्या वधूवरांस त्यांचा अर्थ कळत नाहीं, त्यांस सर्व विधि ह्मणजे रूढीपेक्षां अधिक कांहीं वाटणार नाहीं व वधूस लग्न ठरण्यापासून तो विधि संपेपर्यंत एक शब्दही बोलण्याचें प्रयोजन नसल्यानें तिच्यावर हा एक संस्कार होतो असें ह्मटलें तरी चालेल. पण या प्रतिज्ञांचा अर्थ वरास कळावा असें रा. ब. वैद्यांनीं ७ व्या लेखांत ह्मटलें आहे. तेव्हां वरानें प्रतिज्ञांचा अर्थ समजून

त्याप्रमाणें वागणें ह्मणजेच लग्न हा पवित्र करार होय. चाकरी पतकरतांना ज्याप्रमाणें काम व पगाराचे करार होतात, त्याप्रमाणें प्रत्येक लग्नाचे आधीं सर्व बारीकसारीक कामांची नवरा—बायकोनीं वाटणी करून घ्यावी असें स्त्रियांच्या अभिमानी लोकांचें ह्मणणें आहे, असें रा. ब. वैद्यांसारख्यांस वाटतें. पण त्यांचें असें ह्मणणें मुळींच नाहीं. लग्नविधींत 'आपण सखे झालों' इतकेंच ठरवावें, त्याच्याचबरोबर नवऱ्याची आज्ञा पाळण्याची शपथ बायकोसच मुद्दाम घेण्यास लावूं नये, **लग्न झाल्याबरोबर कायद्याचे दृष्टीनें बायको नवऱ्याची गुलाम समजली जाऊं नये,** अशासाठीं स्त्रिया व त्यांचे कैवारी झटत आहेत. व जे लोक ज्ञानानें खरे सुसंस्कृत झाले असतील, आपला नीच स्वार्थ एकीकडे ठेवून **सत्य, न्याय व दया या गुणांचें आचरण करीत असतील,** ते कोठेंही असले तरी या कार्यास मदतच करितील. हल्लीं हिंदु लोकांस नोकरीचा तरी जो करार ठरवावा लागतो त्याऐवजीं कोणी अधिकारी पंडित नोकरीचाही संस्कार काढून त्यांस कराराच्या अपमानांतून सोडवितील अशी आह्मी आशा करतों.

एका वेळीं एकच बायको करणें हें लग्नाचा मुख्य उद्देश जो समाजाचा उत्कर्ष त्यास अत्यंत हितावह आहे, असें हर्बर्ट स्पेन्सर यांचें मत वाचल्याबरोबर ते ह्मणतात; 'हिंदुस्थानांतील लोकांची रीत व समजूत प्रायः अशीच आहे कीं, एक स्त्री करणें चांगलें. आमच्या शास्त्रांतही असेंच लिहिलें असून, कांहीं विशेष कारणांसाठीं मात्र अधिक बायका करण्याची सवड ठेविली आहे. तत्रापि कित्येक राजे व श्रीमंत लोक त्या कारणांचा विचार न करतां त्या सवडीचा फायदा घेतात. यासाठीं चैनीखातर जास्त बायका करूं नयेत ही शास्त्राज्ञा [कोणच्या शास्त्रांतली तें मात्र दिलें नाहीं!] कडक रीतीनें अमलांत आणण्याची सुधारणा होणें अवश्य आहे. या पलीकडे आपल्या लग्नपद्धतींत दुसरी सुधारणा करण्यासारखी दिसत नाहीं. हिंदुस्थानचे विशेष स्थितीकडे लक्ष देऊन एकच बायको करण्याच्या नियमाला कांहीं अपवाद शास्त्रकारांनीं करून ठेविले आहेत ते अवश्य आहेत.' एक बायको निपुत्रिक, मुलीच होणारी, किंवा जास्त खर्चिक असली तर दुसरी करावी या मनूनें दिलेल्या सवडी हिंदुस्थानच्या विशेष स्थितीसाठीं आहेत काय? एकच बायको करणें चांगलें अशी प्रायः समजूत असून काय उपयोग? चैनीखातर दोन बायका करणारांस पाप लागून त्याबद्दल प्रायश्चित्त आहे काय? एकपत्नीव्रताची गोष्ट निघाली कीं येऊन जाऊन श्रीरामचंद्राकडे सर्वांची धाव आहे, व ह्मणून आह्मी त्याच्या एकपत्नीव्रताचा पूर्ण खुलासा आधींच केला आहे. याज्ञवल्क्यास दोन बायका होत्या, दशरथास तीन होत्या, व कृष्णाच्या राज्यांत तर संख्येचा धरबंद राहिला नाहीं, इतकेंच नाहीं तर सर्वांचे लग्नविधि करण्यास न होऊन त्याशिवाय बायका होऊं लागल्या! कृष्णाची स्वतःची गोष्ट सोडली तरी (कारण तो बोलून चालून बालब्रह्मचारीच!) धर्माकरितां नांवाजलेले पांडवही एकपत्नीव्रत नव्हते, तर वर दिलेल्या लग्नसंस्थेच्या इतिहासावरून ते अनियमित व्यवहाराची मूळ रानटी स्थिति व लग्नसंस्थेची स्थिति अशा

दोन्ही स्थितींत होते असें प्रत्येकास निराळ्या बायका असून शिवाय द्रौपदी सर्वांस होती यावरून दिसतें. आतां हिंदु लोक शास्त्राप्रमाणें त्यांत थोडेंसें पाप समजत असलेच तर, येशूच्या मरण्यानें ज्याप्रमाणें सर्व ख्रिस्त्यांचें पाप जातें, त्याप्रमाणें रामाच्या एकपत्नीव्रताच्या पुण्यानें कृष्णाचें सोळा हजार बायका करण्याचें पाप व त्याच्या अनुयायांचें थोड्या बायका करण्याचें पाप, व शिवाय कृष्णाचें गोपींशीं वर्तन व तसेंच इतरांचें वर्तन यांचेंही सर्व पाप धुवून जातें असेंही ते समजत असले पाहिजेत. याचा अर्थ हा कीं, इतर देशांत जेथें दुसरी बायको करण्याची बंदी आहे त्याच्याच जोडीस व्यभिचार करणाऱ्या नवऱ्यापासून बायकोस काडी मोडून घेतां येते; व **हिंदुधर्मांत एकपत्नी करणें चांगलें अशी प्राय: समजूत नाहीं, इतकेंच नाहीं तर धर्माच्या नांवाखालीं प्रत्यक्ष देवळांतून प्रतिष्ठितपणें व्यभिचार चालत आहे !!** सुशिक्षित हिंदु लोक बाजारबसव्यांच्या चरणीं लोटांगण घालून लग्नासारख्या मंगलप्रसंगीं वैधव्य टाळण्यासाठीं नवरीचें मंगळसूत्र बांधण्यास त्या अखंडसौभाग्यवतींस बोलावीत आहेत; व हे त्यांचे उपकार फेडण्यासाठीं नवरदेवांचें त्यांच्याशीं जास्त दळणवळण सुरू होतें ! सारांश, रा. ब. वैद्यांसारख्या पदवीधर व हुद्याच्या माणसांनीं हिंदुधर्मशास्त्रें गळ्याशीं बांधून, इतक्या महत्वाच्या मुद्यावर जास्त सुधारणा दिसत नाहीं असें उघडपणें पुन्हा पुन्हा प्रतिपादन करावें, यापेक्षां हिंदुस्थानाचें जास्त दुर्भाग्य काय शक्य आहे ? या मुद्याचा दुसऱ्या भागांत जास्त विचार केला आहे.

लेख—३. याचा विषय 'बालविवाहाचे दुष्परिणाम व इतिहास' हा आहे. 'स्मृत्या केव्हां झाल्या याचा कालनिर्णय करतां येत नाहीं, व तो करणें ह्मणजे हिंदुधर्माच्या मूळस्तंभास धक्का बसविणें आहे. रा. ब. रानडे यांनीं फार सुरस रीतीनें स्मृतींचा काल क्रमानुसार लावून बालविवाहाची चाल कशी उत्पन्न झाली हें दाखविलें आहे; परंतु त्यावरून बालविवाहाचा पक्का कालनिर्णय होत नाहीं, व स्मृतिशास्त्राची कालभेदानें व्यवस्था लावणें किंवा त्याचा ऐतिहासिकरीत्या विचार करणें बरोबर नाहीं. किंबहुना त्यास ऐतिहासिक साधनच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.' वेदार्थयत्नाच्या विद्वान् संपादकांनीं एकाजवळ एकदां असा उद्गार काढला होता कीं, 'आज जर हे सर्व वेद समुद्रांत टाकले तर हिंदुस्थानचें कांहींही नुकसान होणार नाहीं.' इतकी ज्या ग्रंथांची किंमत त्यांच्या कालाच्या वादांत येथें पडण्याची गरज नाहीं, कारण तें काम युरोपियन पंडितांनीं केलें आहे. आतां या लेखांतील त्यांची जी एक अतिउच्च कोटी (Grand theory) आहे तिचा विचार करूं.

'शंकराचार्य होण्याचे आधीं हिंदु व बौद्ध लोक सलोख्यानें वागत असत; पण त्यानें सर्व हिंदुस्थानभर फिरून बौद्धधर्माचा उच्छेद केला, त्याच्या मूळतत्वांचें खंडण केलें, व हिंदुधर्माचा विजयध्वज उभारला, परंतु लाखों बुद्ध लोकांस हिंदु करतांना त्यास ज्या अडचणी उत्पन्न झाल्या, त्यामुळें त्यांच्या हाडींमासीं खिळलेल्या कांहीं बुद्धमतांचा स्वीकार करून त्यांस त्यानें आत्मवश केलें. यामुळें कांहीं वाईट गोष्टी हिंदुधर्मांत शिरल्या व जाति-

निर्बंध, शाकान्नभक्षण व बालविवाह यांस पूर्वींपेक्षां विशेष जोर मिळाला.' 'ज्या गोष्टींस हिंदुधर्मांत हरकत नव्हती त्या बौद्धधर्मीशीं समेट झाल्यानें निषिद्ध ठरल्या व त्यासाठीं कलिवर्ज्य प्रकरणें करून त्यांत त्या घातल्या, व अशा रीतीनें शारीरिक दौर्बल्याचें, अनीतीचें व पारतंत्र्याचें खरें कलियुग यावेळेपासूनच हिंदुस्थानावर सुरू झालें. पण इतर देशांत याचवेळीं कलियुग संपून सत्ययुगास आरंभ झाला हें आश्चर्य आहे.' 'बौद्ध, खिस्ती व हिंदु या सर्व धर्मांतील वैराग्यप्रवृत्ति लग्न हें पाप आहे, स्त्रिया जात्या पापी व मोक्षास अनधिकारी आहेत अशाकडे असते. हिंदुधर्मांत ही प्रवृत्ति बौद्धधर्मांतून आली आहे. ती स्वतः-सिद्ध मानली तरी इतकें खरें कीं, प्राचीनकाळीं ती तशी नव्हती. 'पुरा कल्पे तु नारीणां मौजीबंधनमिष्यते' यावरून स्त्रियांची मुंज होत असे, त्यांस वेदाचा अधिकार असे व अविवाहित राहून ब्रह्मवादिनी होतां येत असे. परंतु बौद्ध व जैन यांचें मत अगदीं भिन्न आहे. ज्यावेळीं बौद्ध हिंदु झाले, त्यावेळीं त्यांचीं स्त्रियांविषयीं मतें जाईनात, तेव्हां दोहोंचा असा समेट झाला कीं, विवाहित स्त्रियांस पतिद्वारा वैदिक कर्मांचा अधिकार आहे, पण अविवाहितेस मोक्ष नाहीं हें मत ठाम झालें. स्त्रियांस लग्न हाच संस्कार मुंजीबदलीं समजल्यानें दोहोंची वयोमर्यादा एकच ह्मणजे ८ वर्षें आहे असा समज झाला. शिवाय बौद्ध जोगिणींची नीति फार बिघडल्यानें स्त्रीस जोगिण होतां येऊं नये ह्मणून प्रत्येकीचें लवकर लग्न करण्याची चाल निघाली असावी. हा काळ इ. स. ७०० पासून १००० पर्यंतचा होय.' याप्रमाणें त्यांच्या कोटीचा सारांश आहे. लेख-२ यांत त्यांनीं जें ह्मटलें कीं, 'धर्मांचा लग्नाच्या रीतीशीं निकट संबंध जडल्यानें व धर्मबंधनें अति कडक झाल्यानें स्त्रियांवर जुलूम होऊन त्यांस अनिष्ट अशा बालविवाह, असंमत वैधव्य, लग्नाशिवाय गति नसणें इत्यादि चाली निघाल्या,' त्याचें स्पष्टीकरण या लेखांत असें केलें आहे कीं, बौद्धधर्मांचा उच्छेद झाल्यावर हिंदुधर्मास जो जोर आला, त्यामुळें धर्मबंधनें कडक होऊन या वाईट चाली निघाल्या. या मुद्यासंबंधीं आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी अशी आहे कीं, त्यांनीं ४ थ्या लेखांत बालविवाह शास्त्रसंमत नाहीं हें ठरविण्यास सर्व शास्त्रें धुंडाळून इतकें ठरविलें आहे कीं, शास्त्राप्रमाणें मुलीचा विवाह ८ वर्षांपुढें होऊं शकतो, पण १० पासून ऋतुप्राप्तीच्या आंत करणें प्रशस्त, व नवरा लवकर न मिळेल तर ऋतुप्राप्तीनंतर ३ वर्षांत केला तरी हरकत नाहीं. त्या मुदतींत न केल्यास मुलीस स्वयंवराचा अधिकार येतो. रा. रा. आठले यांनींही हाच निष्कर्ष काढला आहे, व हाच निर्णय फक्त मनूच्या दोन श्लोकांवरून ताबडतोब निघतो.

रा. ब. वैद्यांच्या मेंदूंतून निघालेल्या या कोटीचें खंडण करणें ह्मणजे व्यर्थ खटाटोप आहे! ब्राह्मणानें सांगावयाचें व इतरांनीं 'श्रुति' ह्मणून प्रमाण मानावयाचें असे दिवस हल्लीं नाहींत. युरोपांत खऱ्या गोष्टींचा आधार न देतां, किंवा खरी गोष्ट काय आहे हें शोधण्याची खटपट न करतां जीं पुस्तकें सुपीक मेंदूंतून बाहेर येतात, त्यांचें खंडण न करितां त्यांस कचऱ्याची टोपली दिसते. मग वरील विधान

दोन्ही स्थितींत होते असें प्रत्येकास निराळ्या बायका असून शिवाय द्रौपदी सर्वांस होती यावरून दिसतें. आतां हिंदु लोक शास्त्राप्रमाणें त्यांत थोडेंसें पाप समजत असलेच तर, येशूच्या मरण्यानें ज्याप्रमाणें सर्व ख्रिस्त्यांचें पाप जातें, त्याप्रमाणें रामाच्या एकपत्नीव्रताच्या पुण्यानें कृष्णाचें सोळा हजार बायका करण्याचें पाप व त्याच्या अनुयायांचें थोड्या बायका करण्याचें पाप, व शिवाय कृष्णाचें गोपींशीं वर्तन व तसेंच इतरांचें वर्तन यांचेंही सर्व पाप धुवून जातें असेंही ते समजत असले पाहिजेत. याचा अर्थ हा कीं, इतर देशांत जेथें दुसरी बायको करण्याची बंदी आहे त्याच्याच जोडीस व्यभिचार करणाऱ्या नवऱ्यापासून बायकोस काडी मोडून घेतां येते; व **हिंदुधर्मांत एकपत्नी करणें चांगलें अशी प्राय: समजूत नाहीं, इतकेंच नाहीं तर धर्माच्या नांवाखालीं प्रत्यक्ष देवळांतून प्रतिष्ठितपणें व्यभिचार चालत आहे !!** सुशिक्षित हिंदु लोक बाजारबसव्यांच्या चरणीं लोटांगण घालून लग्नासारख्या मंगलप्रसंगीं वैधव्य टाळण्यासाठीं नवरीचें मंगळसूत्र बांधण्यास त्या अखंडसौभाग्यवतींस बोलावीत आहेत; व हे त्यांचे उपकार फेडण्यासाठीं नवरदेवांचें त्यांच्याशीं जास्त दळणवळण सुरू होतें ! सारांश, रा. ब. वैद्यांसारख्या पदवीधर व हुद्याच्या माणसांनीं हिंदुधर्मशास्त्रें गळ्याशीं बांधून, इतक्या महत्वाच्या मुद्यावर जास्त सुधारणा दिसत नाहीं असें उघडपणें पुन्हा पुन्हा प्रतिपादन करावें, यापेक्षां हिंदुस्थानाचें जास्त दुर्भाग्य काय शक्य आहे ? या मुद्याचा दुसऱ्या भागांत जास्त विचार केला आहे.

लेख–२. याचा विषय 'बालविवाहाचें दुष्परिणाम व इतिहास' हा आहे. 'स्मृत्या केव्हां झाल्या याचा कालनिर्णय करतां येत नाहीं, व तो करणें ह्मणजे हिंदुधर्माच्या मूळस्तंभास धक्का बसविणें आहे. रा. ब. रानडे यांनीं फार सुरस रीतीनें स्मृतींचा काल क्रमानुसार लावून बालविवाहाची चाल कशी उत्पन्न झाली हें दाखविलें आहे; परंतु त्यावरून बालविवाहाचा पक्का कालनिर्णय होत नाहीं, व स्मृतिशास्त्राची कालभेदानें व्यवस्था लावणें किंवा त्याचा ऐतिहासिकरीत्या विचार करणें बरोबर नाहीं. किंबहुना त्यास ऐतिहासिक साधनच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.' वेदार्थयत्नाच्या विद्वान् संपादकांनीं एकाजवळ एकदां असा उद्गार काढला होता कीं, 'आज जर हे सर्व वेद समुद्रांत टाकले तर हिंदुस्थानचें कांहींही नुकसान होणार नाहीं.' इतकी ज्या ग्रंथांची किंमत त्यांच्या काळाच्या वादांत येथें पडण्याची गरज नाहीं, कारण तें काम युरोपियन पंडितांनीं केलें आहे. आतां या लेखांतील त्यांची जी एक अतिउच्च कोटी ( Grand theory ) आहे तिचा विचार करूं.

'शंकराचार्य होण्याचे आधीं हिंदु व बौद्ध लोक सलोख्यानें वागत असत; पण त्यानें सर्व हिंदुस्थानभर फिरून बौद्धधर्माचा उच्छेद केला, त्याच्या मूळतत्वांचें खंडण केलें, व हिंदुधर्माचा विजयध्वज उभारला. परंतु लाखों बुद्ध लोकांस हिंदु करतांना त्यास ज्या अडचणी उत्पन्न झाल्या, त्यामुळें त्यांच्या हाडींमासीं खिळलेल्या कांहीं बुद्धमतांचा स्वीकार करून त्यांस त्यानें आत्मवश केलें. यामुळें कांहीं वाईट गोष्टी हिंदुधर्मांत शिरल्या व जाति-

निर्बंध, शाकान्नभक्षण व बालविवाह यांस पूर्वीपेक्षां विशेष जोर मिळाला.' 'ज्या गोष्टींस हिंदुधर्मांत हरकत नव्हती त्या बौद्धधर्माशीं समेट झाल्यानें निषिद्ध ठरल्या व त्यासाठीं कलिवर्ज्य प्रकरणें करून त्यांत त्या घातल्या, व अशा रीतीनें शारीरिक दौर्बल्याचें, अनीतीचें व पारतंत्र्याचें खरें कलियुग यावेळेपासूनच हिंदुस्थानावर सुरू झालें. पण इतर देशांत याचवेळीं कलियुग संपून सत्ययुगास आरंभ झाला हें आश्चर्य आहे.' 'बौद्ध, खिस्ती व हिंदु या सर्व धर्मांतील वैराग्यप्रवृत्ति लग्न हें पाप आहे, स्त्रिया जात्या पापी व मोक्षास अनधिकारी आहेत अशाकडे असते. हिंदुधर्मांत ही प्रवृत्ति बौद्धधर्मांतून आली आहे. ती स्वतः-सिद्ध मानली तरी इतकें खरें कीं, प्राचीनकाळीं ती तशी नव्हती. 'पुरा कल्पे तु नारीणां मौंजीबंधनमिष्यते' यावरून स्त्रियांची मुंज होत असे, त्यांस वेदाचा अधिकार असे व अविवाहित राहून ब्रह्मवादिनी होतां येत असे. परंतु बौद्ध व जैन यांचें मत अगदीं भिन्न आहे. ज्यावेळीं बौद्ध हिंदु झाले, त्यावेळीं त्यांचीं स्त्रियांविषयीं मतें जाईनात, तेव्हां दोहोंचा असा समेट झाला कीं, विवाहित स्त्रियांस पतिद्वारा वैदिक कर्मांचा अधिकार आहे, पण अविवाहितेस मोक्ष नाहीं हें मत ठाम झालें. स्त्रियांस लग्न हाच संस्कार मुंजीबदलीं समजल्यानें दोहोंची वयः-मर्यादा एकच ह्मणजे ८ वर्षे आहे असा समज झाला. शिवाय बौद्ध जोगिणींची नीति फार बिघडल्यानें स्त्रीस जोगिण होतां येऊं नये ह्मणून प्रत्येकीचें लवकर लग्न करण्याची चाल निघाली असावी. हा काळ इ. स. ७०० पासून १००० पर्यंतचा होय.' याप्रमाणें त्यांच्या कोटीचा सारांश आहे. लेख-२ यांत त्यांनीं जें ह्मटलें कीं, 'धर्माचा लग्नाच्या रीतीशीं निकट संबंध जडल्यानें व धर्मबंधनें अति कडक झाल्यानें स्त्रियांवर जुलूम होऊन त्यांस अनिष्ट अशा बालविवाह, असंमत वैधव्य, लग्नाशिवाय गति नसणें इत्यादि चाली निघाल्या,' त्याचें स्पष्टीकरण या लेखांत असें केलें आहे कीं, बौद्धधर्माचा उच्छेद झाल्यावर हिंदुधर्मास जो जोर आला, त्यामुळें धर्मबंधनें कडक होऊन या वाईट चाली निघाल्या. या मुद्यासंबधीं आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी अशी आहे कीं, त्यांनीं ४ थ्या लेखांत बालविवाह शास्त्रसंमत नाहीं हें ठरविण्यास सर्व शास्त्रें धुंडाळून इतकें ठरविलें आहे कीं, शास्त्राप्रमाणें मुलीचा विवाह ८ वर्षांपुढें होऊं शकतो, पण १० पासून ऋतुप्राप्तीच्या आंत करणें प्रशस्त, व नवरा लवकर न मिळेल तर ऋतुप्राप्तीनंतर ३ वर्षांत केला तरी हरकत नाहीं. त्या मुदतींत न केल्यास मुलीस स्वयंवराचा अधिकार येतो. रा. रा. आठले यांनींही हाच निष्कर्ष काढला आहे, व हाच निर्णय फक्त मनूच्या दोन श्लोकांवरून ताबडतोब निघतो.

रा. ब. वैद्यांच्या मेंदूंतून निघालेल्या या कोटीचें खंडण करणें ह्मणजे व्यर्थ खटाटोप आहे! ब्राह्मणानें सांगावयाचें व इतरांनीं 'श्रुति' ह्मणून प्रमाण मानावयाचें असे दिवस हल्लीं नाहींत. युरोपांत खऱ्या गोष्टींचा आधार न देतां, किंवा खरी गोष्ट काय आहे हें शोधण्याची खटपट न करतां जीं पुस्तकें सुपीक मेंदूंतून बाहेर येतात, त्यांचें खंडण न करितां त्यांस कचऱ्याची टोपली दिसते. मग वरील विधान

दुसऱ्या आवृत्तींतही जसेंचें तसें आहे, यावरून त्यांनीं त्यास इतिहासाचा कितपत आधार आहे हें पहाण्याचें मुळींच श्रम केले नाहींत हें उघड दिसतें. व ह्मणून असल्या विवानांची वर सांगितलेली व्यवस्था करणेंच योग्य आहे. पण त्यांच्या मोठ्या नांवाचें त्यास पाठबळ असल्यानें आह्मांस इतिहासाच्या पुराव्यांत पडणें भाग आहे.

त्यांनीं आपल्या ह्मणण्यास एक ऐतिहासिक आधार दिला आहे तो हा कीं, कुमारपाल राजाच्या दरबारांत दोन पंडितांचा वाद होऊन स्त्रियांस मोक्षाचा हक्क नाहीं असा निर्णय झाला. कुमारपालाचा काळ त्यांनीं दिला नाहीं, पण तो शंकराचार्यानंतर ह्मणजे नवव्या शतकाचे सुमाराचा आहे. कुमारपाल हा गुजरायेंतील जैन राजा होता. वरील उताऱ्यांत जरी त्यांनीं बौद्ध व जैन यांचीं सारखींच मतें आहेत असें ह्मटलें आहे तरी त्यांचा मुख्य कटाक्ष बौद्धधर्मावर आहे हें उघड आहे. कुमारपाल जैन असल्यानें त्याच्या दरबारीं बौद्ध पंडितांचा वाद होणें संभवत नाहीं. आतां जैनधर्माची जरी गोष्ट घेतली तरी जोंपर्यंत त्यांनीं या वादास सर्वमान्य इतिहासाचा पुरावा दिला नाहीं तोंपर्यंत जैनांच्या तत्वांचा निराळा विचार करावयास नको. शिवाय जैन व बौद्ध यांचीं मतें सारखीं असल्यामुळें बौद्धमतांची चर्चा येथें पुरे होईल.

शंकाराचार्यांनीं बौद्धधर्माचा उच्छेद केला ही समजूत आज नवीन नाहीं; पण हिला दंतकथेशिवाय जास्त आधार नाहीं. शंकराचार्यांनीं आपल्या ग्रंथांत इतर कित्येक मतांच्या खंडनाबरोबर बौद्धमताचें खंडण केलें आहे, यावरून त्यांनीं पहिल्यानें त्यांचा उच्छेद केला असें होत नाहीं. उलट पक्षीं दुसरा ऐतिहासिक पुरावा असा आहे कीं, शंकराचार्यांच्या आधीं सुमारें १००–१५० वर्षांपासून बौद्धधर्म खालावत जाऊन अशी स्थिति आली होती कीं, एका राजानें 'हिमालयापासून लंकेपर्यंत जो बौद्धास ठार मारणार नाहीं त्यास ठार मारावें' असा कायदा केला होता, असें मानण्यासही पाहिजे तर आधार सांपडेल. तेव्हां शंकराचार्यांस लाखों बौद्ध लोक कोठून सांपडणार? पिंजऱ्यांत सांपडलेल्या वाघास पोरांनीं खडे मारण्याप्रमाणें ह्या देशांत नामशेष झालेल्या धर्माची वाटेल तशी निंदा आजपर्यंत खपत असे. पण आतां युरोपियन शोधकांनीं धर्माभिमानानें प्रेरित अशा कल्पनांपेक्षां सत्यास जास्त महत्व देऊन इतिहासाचा शोध करण्याची रीत इकडे सुरू केल्यापासून, अन्य धर्मांविषयीं ज्या गोष्टी इतिहासानें ठरतात, त्याच ग्राह्य करण्याचा काळ आला आहे. आतां बौद्धधर्मांत स्त्रियांविषयीं काय सांगितलें आहे हें कळण्यास रा. ब. वैद्यांचे लेख नको आहेत. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे बौद्ध धर्मांत स्त्रियांस पतीशिवाय स्वतंत्रपणें धर्मपुस्तकांचें अध्ययन करून त्याप्रमाणें वागून मोक्ष मिळविण्याचा अधिकार आहे, व लग्न करण्याची सक्ती नाहीं, हें त्यांच्या जोगिणींवरून दिसतेंच. रा. ब. वैद्य ह्मणतात त्याप्रमाणें जरी बौद्धांच्या खालावलेल्या स्थितींत जोगिणींची नीति बिघडली असली तरी कलिवर्ज्य प्रकरणांप्रमाणें नवीं प्रकरणें घालून त्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेतलेलें नाहीं. **बौद्धांत बालविवाह कधींच नव्हता व अद्यापही शिरलेला नाहीं.** याउपर जर ते कांहीं जास्त पुरावा दाखवितील तर आह्मीही जास्त पुरावा देण्यास तयार आहों.

उलटपक्षीं, प्राचीन हिंदूधर्मांतही स्त्रियांस वेदाचा अधिकार होता असें ह्मणण्यास ' पुरा कल्पे०' यापेक्षां जास्त व सबळ आधार नाहीं; अविवाहित राहून ब्रह्मवादिनी झाल्याचीं फक्त ३ उदाहरणें सांपडतात. याशिवाय ' इतर ही बऱ्याच स्त्रिया सुशिक्षित होत्या ' असें नुसतें ह्मटल्यानें तें खरें होत नाहीं. द्रौपदी इत्यादि स्त्रियांची सुरस नीति व विचार अध्ययनानें झाले होते यास काय आधार ? उलट शल्य पर्वांतील कुणिगर्ग ऋषीच्या मुलीच्या उदाहरणावरून त्या पूर्वींच स्त्रियांचें अविवाहित राहणें बंद झालें होतें असें रा. रा. आठले यांनींही कबूल केलें आहे. ( तिला ह्मातारी होईपर्यंत नवरा मिळाला नव्हता, तरी स्त्रियांस लग्नाशिवाय गति नाहीं ह्मणून मरण्याचे आदले दिवशीं तिनें लग्न केलें ! यावरून हिंदुधर्माप्रमाणें स्त्रियांस मोक्ष मिळण्यास नवऱ्याची सेवा केलीच पाहिजे असें नसून लग्न झालें ह्मणजे पुरें असें दिसतें. ) मनुस्मृतींत स्त्रियांस लग्नाशिवाय गति नाहीं, व लग्न हाच त्यांचा उपयनसंस्कार असें स्पष्ट ह्मटलें असून बौद्धांवर हें पाप लादणें किती शहाणपणाचें व न्याय्य आहे ? आपणच सर्व शास्त्रें धुंडाळून ८ व्या वर्षीं मुलीचें लग्न करण्यास शास्त्राची हरकत नाहीं हेंच जर ठरविलें, तर मग बौद्धांशीं समेट होऊन स्त्रियांस लग्न हाच उपनयन विधि समजला गेल्यानें उपयनाचें वय जें ८ तेंच लग्नाचें समजूं लागले असावे ही द्राविडीप्राणायामाची कोटी कशाला हवी ! सारांश, या प्रमाणें त्यांनीं ठिकठिकाणीं जीं बेधडक विधानें व कोट्या दडपल्या आहेत त्यांचीं कारणें हिंदुधर्माबद्दल पोकळ अभिमान व परमताविषयीं दोषबुद्धि हीं होत. हा पोकळ डौल याच लेखांत पुढें असा दिसतोः—'आपल्याकडे कामवासना उत्पन्न होण्यापूर्वींच लग्न झालेलें असतें यामुळें इंग्रजींत ज्यांस इल्लेजिटिमेट (Illegitimate) ह्मणजे बिनवारशी ह्मणतात, अशीं मुलें आपल्याकडे फारच थोडीं, किंबहुना मुळींच नाहींत, हा बालविवाहाचा फायदा आहे, व अशा मुलांस आपल्या भाषेंत योग्य शब्द नाहीं हेंही एक समाजास भूषण आहे.' ज्या उदार धर्मानें अशा बिनवारशी लोकांची एक विस्तीर्ण जातच बनविली व वडिलांनीं प्रणीत केलेलें आचरण आचरणें धर्मरूप केलें, त्या धर्माच्या अनुयायांस हा डौल भूषणावहच असेल ! योग्य शब्दाविषयींच पाहिलें तर आमच्या कानावरून ह्या अर्थाचे अनेक मराठी शब्द गेले आहेत. 'दासीपुत्र' हा शब्द बहुतेकांच्या ऐकण्यांत आहे; पण त्याचा अर्थ लग्न होण्याचे आधींचा मुलगा असा होत नाहीं इतकेंच जर त्यांचें ह्मणणें असेल तर इंग्रजी इल्लेजिटिमेट या शब्दानेंही तोच अर्थ होतो असें नाहीं; व ह्मणून इंग्रजींत तो शब्द आहे यावरून जो गर्भित अनुदार आरोप निघतो तोही निराधार ठरतो. आतां उदाहरणाबद्दल पाहिलें तर भारतांत कर्ण सुप्रसिद्धच आहे. ४ थ्या लेखांत पुराणांच्या काळीं प्रौढविवाह होते हें सिद्ध करण्यास ' कुंतीला तर लग्नापूर्वींच मुलगा झाला होता.' हें प्रमाण दिलें आहे ! ! याप्रमाणें जे हिंदुधर्माची कीर्ति उलट रीतीनें अजरामर करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांच्याशीं इल्लेजिटिमेट यास आपल्यांत शब्द आहे कीं नाहीं हा वाद करून काय फळ ?

लेख ७—मधले लेख महत्वाचे नसल्यानें ' प्रस्तुत कोणती सुधारणा शक्य

आहे व ती अमलांत कशी आणावी' हें थोड्या उताऱ्यावरून पाहूं. 'कलिवर्ज्य नियम रद्द केल्याशिवाय बालविधवाविवाह सशास्त्र होऊं शकत नाहीं, ह्मणून शंकराचार्यांची परवानगी घेतल्यानें ही अडचण दूर होईल.' पण 'ते कोणताही कलिवर्ज्य नियम रद्द करतील अशी विशेष आशा नाहीं.' ह्मणून ही सुधारणा सध्यां शक्य नाहीं, मग प्रौढ विधवाविवाहाची गोष्ट कशाला? आतां राहिला बालविवाह; त्यासंबंधीं ते ह्मणतात, 'बालविवाहाची चाल समाजास अत्यंत घातक आहे, व तीमुळें बालवैधव्य वाढून नैतिक हानीही होत आहे. तेव्हां प्रथम ही बंद केली पाहिजे. व प्रौढविवाह ही सुधारणा अमलांत आणणेंही सुलभ आहे, कारण शास्त्र व लोकमत विरुद्ध नाहीं, व कित्येक जातींत हे प्रौढविवाह हल्लींही रूढ आहेत.' आतां त्याची वयमर्यादा ठरवितात—'पुरुषाचें वय २५ व स्त्रीचें वय १६ असल्यावांचून संतति होणें इष्ट नाहीं असें आर्य व आंग्लवैद्यक ह्मणतें. डॉ० देशमुख यांनीं स्पष्ट दाखविलें आहे कीं, पुरुषाची वाढ २७ वे वर्षी व स्त्रियांची २० वें वर्षी पूर्ण होते.' 'तेव्हां आपल्यांत लग्नमर्यादा २५ व १६ पर्यंत निदान वाढविली पाहिजे हें निर्विवाद आहे. आपल्या आर्यपूर्वजांचें अनुकरण केल्यास, मनूप्रमाणें ३० व १६ किंवा २४ व १२ अशी अनायासें सुधारणा होईल.' यावरून डॉ० देशमुख या हिंदुधर्माभिमानी डॉक्टरांच्या मतापेक्षां शास्त्राचें वय व रा. ब. वैद्यांच्या मतें जें 'आर्य व आंग्लवैद्यकांचें वय' तें त्यांस जास्त ग्राह्य वाटतें. पुढें १२–१६ ची मर्यादा जाऊन ऋतुप्राप्तीनंतर ३ वर्षांच्या आंत ही मर्यादा आली. 'व असे प्रौढ विवाह आपणांत जारीनें झाले पाहिजेत. हीच खरी सुधारणा होय. एवढी मोठी [ ! ] सुधारणा आज एकदम अमलांत येणें अशक्य आहे, तरी केव्हां तरी या स्थितीस ती पोंचविण्याचा संकल्प विसरतां नये. कारण या सुधारणेनें बालविवाहाचे सर्व अनिष्ट परिणाम टळतील व बालवैधव्याचा हिंदुस्थानांत मागमूसही राहणार नाहीं.' 'कित्येक जातींत पहिल्या वर्षीच लग्न करतात! बालविवाहाचा असा भयंकर सपाटा सुरू असल्यानें प्रौढविवाह सर्व साधारणपणें केव्हां तरी मान्य होतील अशी आशाच नाहीं. तेव्हां बालविवाहानें होणारी लहान वयांतील संतति तरी बंद होईल अशी कांहीं सुधारणा केली पाहिजे. याचा मुख्य उपाय ह्मणजे ऋतुप्राप्तीपर्यंत मुलीस सासरीं न पाठविणें हाच होय. पण यानें बालवैधव्य कमी होणार नाहीं, व बालविधवाविवाहास मोकळीक मिळण्याची आशा दिसत नाहीं. असें हें बिकट कोडें सोडविण्यास विचारी धर्मास धरून चालणारे सुधारक दोन उपाय सुचवितात. एक ऋतुशांतीवांचून लग्नविधि पूर्ण समजूं नये. पण ही गोष्ट शास्त्री लोक कबूल करतीलसें दिसत नाहीं, कारण सप्तपदी ही विवाहमर्यादा आहे, व ती झाल्यावर पुनः लग्न करूं नये ही कलिवर्ज्यांची अडचण राहणार. दुसरी सूचना आधीं सप्तपदीपर्यंत विधि करून, वधूस बापाकडेच ठेवून, ऋतुप्राप्तिनंतर सप्तपदी करून लग्न कायदेशीर रीतीनें पुरें करावें. ( ही सुधारणा नसून केवळ कायदा चुकविण्यास एक पेच आहे. ) ही सूचना उत्तम होईल यांत संशय नाहीं. पण या आधींच्या विधीस वाग्दानापेक्षां जास्त महत्व लोकांनीं देऊन क्षुल्लक कारणासाठीं

तें लग्न मोडूं नये; 'व असें जर कोणी न करील व मध्येंच दुसऱ्याशीं सप्तपदीस-कट विवाह लावील तर कायद्यानें तें दुसरें लग्न रद्द करून, तें करणारांस आणखी शिक्षा ठेवावी. ' पण लोकमतानें किंवा कायद्यानें अशा विवाहास वाग्दानापेक्षां जास्त महत्व देण्यांत येईल अशी आशा दिसत नाहीं. ह्मणून पुढील सूचना जरी वरच्यापेक्षां निकृष्ठ आहे तरी लोकांच्या परिचयांतलि असल्यानें सुसाध्य आहे ती ही कीं, मुलीचें लग्न १२ वर्षांनंतर करावें व तिला ऋतुप्राप्तीनंतर सासरीं पाठवावी. आतां त्यापूर्वींच नवरा मेल्यास तिच्या पुनर्विवाहास कलिवर्ज्याची अडचण आहे खरी. पण यामुळें निदान १२ वर्षांखालीं तरी विधवा मुली राहणार नाहींत, व अशा रीतीनें १८९१ च्या खानेसुमारींत १२ च्या आंतील ज्या दीड लाख विधवा दाखविल्या आहेत, इतक्यांस तरी या भयंकर जाचांतून सोडविल्यासारखें होईल! पण या सुधारणेनें बिनवारशी पोरें जास्त वाढतील असा कांहींचा आरोप आहे, व तो थोड्या प्रमाणानें तरी खरा आहे हें कबूल केलें पाहिजे. यास उपाय पालकांनीं मुलींवर कडक नजर ठेविली पाहिजे व इतक्याउपरही जीं कांहीं थोडीं बिनवारशीं पोरें निपजतील त्यांची संख्या बालवैधव्यापासून होणाऱ्या पोरांच्या संख्येहून फारच कमी असल्यानें, या सुधारणेंतील तेवढा दोष सहन केला पाहिजे.'

हा रा. ब. वैद्यांच्या सुधारणेचा सारांश आहे. ऋतुप्राप्ति झाल्याबरोबर सासरीं पाठवण्याची सोय जर त्याच्या सुधारणेंत आहे, मग बिनवारशीं पोरें होणार कशीं? हें आरोप करणारांच्या व तो कबूल करणारांच्या ध्यानांत आलेलें दिसत नाहीं! नामदेवांनीं 'सांगते ऐकते मूर्ख दोघे' असें जें ह्मटलें आहे त्याची यावेळीं आठवण होते. पण आधीं हिमालय पोखरून उंदराचें मेलेलें पोर बाहेर काढण्याप्रमाणें, त्यांची सूचना सुधारणा आहे कीं काय हाच प्रश्न आहे. आपल्याकडे ऋतु लवकर येतो असें त्यांनीं ह्मटलेंच आहे मग लग्नांत व त्यांत अंतर तें काय राहिलें? तर फार फार ह्मणजे ३ वर्षें. पुनः जोंपर्यंत संमतिवयाच्या कायद्यांत १२ वर्षांचें वय आहे तोंपर्यंत मुलीस त्यापुढें माहेरीं ठेवण्याचा हक्क कोठें आहे? या सुधारणेनें दीड लाख विधवांस जाचांतून सोडविल्यासारखें होईल असें ह्मणणें ह्मणजे आपल्या व दुसऱ्याच्या डोळ्यांत धूळ टाकणें आहे. कारण हल्लीं १२ चे आधीं विधवा होतात त्याऐवजीं १२ ते १५ च्या जास्त होतील. उदाहरणार्थ १२–१५ मुलींचें वय व २०–२५ मुलाचें वय अशीं सर्व लग्नें होऊं लागलीं ह्मणजे २० ते २५ वयाचे जितके पुरुष मरतील ते सर्व विवाहित होऊन मेल्यानें तितक्या विधवा होतील. तेव्हां जोंपर्यंत विधवाविवाहाची सुधारणा करावयाची नाहीं तोंपर्यंत विधवांस मुक्त करण्याचें फुकटचें पुण्यही मिळणार नाहीं. दुसरी गोष्ट बालविवाहाचा जो घातक परिणाम लहान वयांतील संतति व त्यामुळें होणारे शारीरिक ऱ्हास व सामाजिक व राष्ट्रीय अवनति इत्यादि जे वाईट परिणाम यांनीं ३ ऱ्या लेखांत वर्णिले आहेत, ते परिणाम या सुधारणेनें जर बंद होत नाहींत तर मग ही सुसाध्य आहे ह्मणून सुधारणा कशी होते? सुधारकांच्या सुधारणेस. ती जुन्या मतांस धरून नाहीं असा दोष देऊन,

हीच सुधारणेस पहिली अट पूर्वी घातलेली आहे, व इतकी मात्र या सुधारणेनें पूर्ण होते. या सूचनेस सुधारणा हें नांव दिल्यानेंच गैरसमज करून कोणी हिंदु यांस मारण्यास न उठो ह्मणजे झालें! या सुधारणेनें जुन्या चालीचे फायदे (ह्मणजे तोटे) सर्व ठेविले आहेत यांत शंका नाहीं; पण ही नव्या मतांस अनुसरून व इच्छित हेतु साध्य करणारी नाहीं हें उघड आहे.

लेख–८. आतां स्त्रीशिक्षण या महत्वाचे विषयावर मालाकारांनीं काय प्रकाश पाडला आहे तें पहा. मिल यांच्या पुस्तकाचें रहस्य त्यांस समजलें नसेल, व मुख्य सिद्धांतही त्यांस कबूल नसो. पण त्या साधु तत्वज्ञानें आपल्या लेखांत अतिशयोक्ति केली आहे, अगर अमुक मुद्दे त्यानें मुद्दाम लपवून ठेविले आहेत असा त्याजवर आरोप करणें हें धाडस अपूर्व होय. असे नादान आरोप ज्यांनीं केले आहेत, त्यांच्याशीं मिल यांच्या वतीनें वकिली करून वाद करण्याचा हा प्रसंग नाहीं. तेव्हां हिंदु स्त्रियांस काय व कसें शिक्षण द्यावें इतक्यासंबंधींच पुढें उतारे दिले आहेत.

'हिंदुशास्त्राप्रमाणें सर्व स्त्रियांचें लग्न झालेंच पाहिजे, व ह्मणून त्यांस पुरुषापेक्षां निराळें व त्यांच्या कामीं उपयोगी असें शिक्षण दिलें पाहिजे. हल्लीं पुरुषांचेंच शिक्षण त्यांस दिलें जातें, यामुळें त्यांस युरोपियन रीति आवडतात, त्या घरकामास निरुपयोगी होतात, त्यांच्यांत वडिलांविषयीं आदर राहत नाहीं, खर्चीकपणा वाढतो, इत्यादि दोष त्यांच्यांत येतात ह्मणून ज्यांस पुढें लग्न करणें आहे त्यांस मॅट्रिकच्या परिक्षेचे सव विषय शिकून परीक्षा पास होण्याची गरज नाहीं. १२ वर्षांनंतर लग्न होतें व नंतर शाळेंत जाणें बंद होतें ह्मणून त्यांस जें कांहीं शिकविणें त्या सर्वांचा प्राथमिक शिक्षणांत अंतर्भाव झाला पाहिजे. लिहिणें वाचणें व हिशोब हा शिक्षणाचा पाया आहे. पण कुटुंबव्यवस्था, घरचा जमाखर्च, मुलांचें संगोपन व आजाऱ्याची सुश्रुषा हीं जीं स्त्रियांचीं मुख्य कामें त्यासाठीं त्यांस गृहशिक्षण [एखादी उत्तम ह्मणजे कजाग सासू देते तें] अवश्य आहे. 'घरांतील काटकसर' हा विषयही अवश्य आहे. खाण्याचे सर्व पदार्थ करतां येणें हें तर स्त्रियांचें भूषण आहे. त्यांस चांगला विषय लिहितां येणें, पत्रव्यवहार करितां येणें, तत्कालीन स्थितीची माहिती असणें, आपल्या देशाचा इतिहास व भूगोल जाणणें इत्यादि गोष्टी मध्यमप्रतीच्या शिक्षणांत ह्मणजे बारा वर्षांवरील विवाहित मुलींस जरूर आहेत. त्यांच्या शारीरिक शिक्षणाकडे हल्लींपेक्षां जास्त लक्ष दिलें पाहिजे.' [लहानपणींच मुलें झाल्यानें जी शारीरिक हानि होते ती व्यायामानें भरून येईल काय?]
'स्त्रियांची मानसिक शक्ति पुरुषांहून कमी नसते ही गोष्ट खरी आहे व पुरुषांप्रमाणें त्यांचीही बुद्धि विकास पावेल तर भावी संततीही बुद्धिमत्तेंत अधिक होईल. देशांतील अर्धी प्रजा अज्ञानांत व अज्ञानाचा परिणाम ज्या वेड्या समजुती त्यांत मग्न राहील तर तो देश कधींही सुधारणेच्या पंथास लागणार नाहीं. तात्पर्य, स्त्रियांच्या बुद्धीचा विकास होऊं देणें राष्ट्रास सर्वतोपरी हितावह आहे. व स्त्रियांनीं अमुक विषय शिकूं नये ही बंदी अजीबात काढून टाकिली पाहिजे. ज्या स्त्रिया बुद्धिमान्, महत्वाकांक्षी व उत्साही आहेत, त्यांस पुरुषांप्रमाणें शिक्षणास कांहींच आडकाठी असूं नये. परंतु लहानपणीं बहुतेकांचीं लग्नें झाल्यानें व

बाळंतपणांत व मुलें संभाळण्यांत त्या गुंतल्यानें त्यांचा विद्याभ्यास होऊं शकत नाहीं.'

सुधारणेचा दिव्यप्रकाश मुद्दाम हातानें डोळे झाकून दूर सारण्याचें हें दुसरें उदाहरण. कळून वळत नाहीं ह्मणतात तें हें ! जर हिंदु धर्मांतील लग्नाची मर्यादा कायम ठेवावयाची तर देशांतील सर्व प्रजा ज्ञानी झाल्याशिवाय खरी सुधारणा होणार नाहीं, स्त्रियांस पुरुषांप्रमाणें शिक्षण मिळावें, इत्यादि गोष्टी बोलाव्या तरी कशाला? मॅट्रिकला लागणारे बहुतेक विषय जरूर असें ह्मणून, मॅट्रिकची गरज नाहीं असेंही ह्मणावयाचें ! बरें, हल्लींची पद्धति त्यांस बरोबर वाटत नाहीं, तर त्यांच्या कल्पनेप्रमाणें अविवाहित मुलींची निराळी व विवाहित मुलींची निराळी शाळा निदान एका ठिकाणीं तरी स्थापन करण्याची त्यांनी खटपट केली आहे काय? त्यांच्या कल्पनेप्रमाणें लोकांनीं करून त्यामुळें स्त्रीशिक्षणाचा पाया किती दृढ होतो हें पाहण्याची त्यांस फार इच्छा आहे. पण ती पुरी करण्याविषयीं त्यांनीं परमेश्वराची प्रार्थना करण्यापलीकडे कांहीं केलें आहे असें दिसत नाहीं.

ज्याप्रमाणें मनूकडे सर्व ऋषी जाऊन त्यांनीं विचारल्यावरून त्यांस ती सांगितली गेली, त्याप्रमाणें रा. ब. वैद्यांकडे ते सांगतील तसें करण्यास तयार असे कांहीं लोक गेले होते काय? व ह्मणून फक्त ही सुधारणास्मृति लिहून स्वस्थ बसण्यापलीकडे त्यांस कांहीं कर्तव्य वाटत नाहीं काय? गुणवान् पत्नी दुर्दैवानें अंतरल्यानें त्यांस जी अबलांविषयीं कळकळ उत्पन्न झाली, तिचा शेवट दोन पावलें पुढें जाऊन चार पावलें मागें येण्यांत व्हावा काय ? अबलोन्नति यावर ८ लेख लिहूनें निदान एका बाबतींत तरी अबलांचें दुःख खरोखर कमी होऊन त्यांची स्थिति सुधारेल इतकी त्यांच्यानें सूचनाही करवली नाहीं, मग कशाला त्यांनीं या पवित्र कार्यास आपले अपवित्र हात लावून त्याची व्यर्थ विटंबना केली ? यापेक्षां त्यांनीं आपला पैसा व वेळ आपल्या कामीं लावला असता तर त्यांस कोणी दोष दिला नसता. जर त्यांस सुधारकांचे दोष काढून हिंदू धर्मांतील सांवळा गोंधळ कायम ठेवण्याचाच उपदेश करावयाचा होता तर हें अबलोन्नतीचें ढोंग कशाला हवें होतें ? किती अबलांनीं मोठ्या आशेनें हे लेख वाचण्यास घेतले असतील व 'अखेर पुरुषांचे विचार येथपर्यंतच थांबतातना !' असा उद्गार काढून पुस्तक फेंकून दिलें असेल ! दुःखानें व व्याधीनें गांजलेल्या असतांही ज्यांच्या कपाळाची गुलामगिरी सुटत नाहीं, मरणही लवकर येत नाहीं, ह्मणून ज्या यमासही दोष देत बसल्या आहेत, व तो लवकर नेत नाहीं ह्मणून पुरुषांनीं ज्यांस पृथ्वीवरच नरकवासांत ठेविलें आहे, त्यांच्या उन्नतीची चर्चा करण्याचा आव घालून, लोकमत व शास्त्रें यांचें भय दाखवून पूर्वींचीच गुलामगिरी त्यांजवर लादणें ह्मणजे दुःखावर डागण्या देणें होय ! स्त्रीशिक्षणास लोकमत अनुकूल ह्मणून हा महत्वाचा विषय शेवटीं घातला. बालविधवाविवाहास कलिवर्ज्य प्रकरणें आड ह्मणून ती तडजोडही अखेरीस स्वतःच अशक्य ठरविली ! यावरून इतकेंच दिसतें कीं, कलिवर्ज्य प्रकरणें हल्लींच्या हिंदुधर्मांत वेदांच्याही डोकीवर बसलीं आहेत; मग तीं कोणा वृद्धाचार्यांनीं लिहिलीं कोण जाणे ! प्रौढविधवाविवाहाची तर गोष्टच नको ! राहतां राहिला बालविवाह; त्यांत शास्त्राप्रमाणें ज्या मर्यादेंत बापास

कन्यादान करण्याचा हक्क आहे, त्याच मुदतींत त्यानें तो बजावलाच पाहिजे, कारण नाहींतर स्वयंवराचा हक्क येतो, व स्वयंवर ह्मणजे भ्रष्टाकार! बरें ही सुधारणा येथें तरी थांबते काय? नाहीं, तर एक पाऊल मागें; शास्त्रांत ऋतुप्राप्तीनंतर ३ वर्षेंपर्यंत बापास कन्यादान करण्याची मुदत आहे, पण रा. ब. वैद्य ह्मणतात कीं, मुलीचें लग्न १२ वे वर्षीं करून ऋतुप्राप्त झाल्याबरोबर सासरीं पाठवावें! अशा रीतीनें आपल्या बालविवाहाच्या दुष्परिणामांच्या चर्चेवर स्वतःच पाणी ओतून, नंतर मोठ्या डौलानें अविवाहित मुलींस निराळी व विवाहित मुलींस निराळी शाळा हवी ह्मणून त्यांचा प्रत्येक यत्तेचा अभ्यासक्रम ठरवून दिला आहे! पण एकदां घरकामास जखडल्या जाऊन, व मुलांच्या मुळें घरास खिळून गेल्यावर विवाहित मुलींची शाळा ओस पडणार नाहीं काय? विवाहित मुली बहुतेक शाळेंत जात नाहींत असें त्यांनींही ह्मटलें आहे; मग काय या सुधारणास्मृतींत सांगितल्यावरून त्यांच्यासाठीं काढलेल्या शाळांत त्या येऊं लागतील? ते ह्मणतील या सुधारणा सध्यां सुसाध्य ह्मणून सुचविल्या आहेत. पण समाजांतील चालीरीती दहा दहा वर्षांनीं व हळू हळू बदलत नाहींत; जेव्हां ज्या रीतींनीं समाज खालावत जातो, तेव्हांच एकदम त्यांत सुधारणा होते, अशा वेळां हजार पांचशें वर्षांनीं येतात. ह्मणून वाईट स्थितीत जाऊन चांगली स्थिति येईल अशाच सुधारणांचा उपदेश केला पाहिजे. **सुधारणा जुन्या मतास धरून असणें शक्यच नाहीं, व सुधारणा ही लोकांस सुधारणा अशी भासूनच झाली पाहिजे.**

याप्रमाणें या लेखांचें धोरण आहे. यांत अबलोन्नति अशी कांहींही सांगितली नसून, पुरुषांच्या फायद्याच्या दृष्टीनें व हिंदूधर्माच्या पोकळ डौलाखालीं अबलांस पूर्वीच्या गुलामगिरीस जखडलें आहे. असलीं पुस्तकें हिंदू समाजांत इतकीं वर्षें बिनबोभाट पसरावींत हें हिंदु समाजास लांछनास्पद होय. आमच्या मतें हा नसता उपद्व्याप करून त्यांनीं अबलांस दुखविलें मात्र आहे. ह्मणून त्यांच्या वतीनें **आह्मी त्यांस असें आव्हाहन करितों कीं, या त्यांच्या लेखांत आह्मी वर दाखविलेल्या मुद्यांशिवाय अबलांची उन्नति होण्याचे कांहीं जास्त उपाय त्यांनीं सुचविले असतील तर ते काढून दाखवावेत, नाहींतर हे लेख परत घ्यावेत.** व अबलांच्या भाग्यानें पूर्वीच्या कळकळीचा एक शतांश जरी अजून उरला असेल, तर त्यांनीं पश्चातापानें पवित्र होऊन, या पवित्र कार्यास पुन्हा हात लावून अबलांची खरी उन्नति होईल असा उपदेश करावा. हें काम सर्वांचेंच आहे, पण या आधींच्या दोषानें त्यांजवर जास्त जबाबदारी येत आहे. सुधारकांचीं गलबतें सुधारणेच्या खडकावर आपटलीं नाहींत, कारण हा मुळीं खडकच नाहीं. ज्यांस सुधारणा करणें आहे त्यांस मार्गांत कांहींही अडचणी भासत नाहींत; व ज्यांस सुधारणा करणेंच नसतें ते लोक मात्र मनाच्या पिशाचास व निर्जीव शास्त्रांस स्वतः घाबरून दुसऱ्यांस घाबरवितात. रा. ब. वैद्यांचें गलबत या हिंदुधर्मशास्त्राच्या खडकावर आपटून त्याचा चुराडा उडाला आहे. सुधारकांनीं आपलीं गलबतें या खडकापासून दूर ठे-

विलीं आहेत व लोकमताच्या तुफानांतही आपला रस्ता काढीत आहेत. मिसेस फुल्लर आपल्या . Wrongs of Indian Womanhood या पुस्तकांत ह्मणतात—This is one of the places where Hinduism breaks down, in that family—caste relations are made to supercede obligations to God and their fellowmen. This is the rock upon which so many reformers make shipwreck. This is the cause of much unhappiness on the part of the educated Hindus *who sacrifice their convictions to these considerations.*

---

## प्रकरण ३.

—:०*०:—

### या विषयावरील इतर पुस्तकें.

प्रस्तुत विषयावर इंग्रजींतही फार थोडीं पुस्तकें आहेत, व मराठींत आहेत तीं एका हाताच्या बोटांइतकींही नाहींत, व त्यांतही स्त्रियांच्या बाजूनें लिहिलेलीं फार थोडीं ! या विषयावर आम्ही लिहिण्याचा विचार केला, तेव्हां पहिल्या भागांत स्त्रियांची सुधारणा करण्याचा आजपर्यंत काय प्रयत्न झाला हें दाखविण्यासाठीं या पुस्तकांचें सार देऊन त्यांची दिशा दाखविण्यासाठीं आम्ही तीं सर्व वाचलीं. परंतु प्रत्येक पुस्तकाचें सार देऊन त्यावर टीका करण्यानें विस्तार फार होऊन पुनरुक्ति दोष येऊन, शिवाय कांहीं मुद्दे गाळल्याचाही आमच्यावर उलट आरोप होऊं शकतो. ह्मणून त्यांतून दोन सर्वांत महत्वाचीं पुस्तकें घेऊन त्यांचा पूर्ण विचार गेल्या दोन भागांत केला आहे, व येथें ज्यांस या विषयावरील इतर पुस्तकें वाचण्याची इच्छा होईल त्यांच्या माहितीसाठीं आम्ही वाचलेल्या कांहीं पुस्तकांचीं नांवें देत आहों.

1. The awakening of women by Mrs F. Swiney. या पुस्तकांत स्त्रियांची योग्यता पुरुषांपेक्षांही कशी जास्त आहे हें सिद्ध केलें आहे. ज्यांस या मुद्याविषयीं शंका असेल, त्यांनीं हें वाचण्याची अवश्य तसदी घ्यावी.

2. The subjection of women by John Stuart Mill. हे प्रसिद्धच आहे. (१८६९.) याचेंच भाषांतर.

३. ' स्त्रियांची परवशता ' हेंही प्रसिद्धच आहे ( कर्ते रा. गो. वा. कानिटकर.)

4. Wrongs of Indian womanhood by Mrs Fuller. हें एका ख्रिस्ती मिशनरी बाईनीं १९०० मध्यें लिहिलें आहे. यांत सर्व हिंदुस्थानांतील हिंदु लोकांतील स्त्रियांसंबंधीं वाईट चाली दाखवून, स्त्रियांची सुधारणा ख्रिस्तीधर्माचा प्रसार झाल्याशिवाय व्हायची नाहीं, असें शेवटीं सांगून आपल्या ख्रिस्ती भगिनींस हें काम करण्यास विनंति केली आहे.

5. High-cast Hindu woman by Pandita Ramabai (१८८७) हें ख्रिस्ती झाल्यानंतर, व अमेरिकेंत असतांना तिकडील लोकांनीं इकडील स्त्रियांची सुधारणा करण्याच्या रमाबाईच्या प्रयत्नास मदत करावी या हेतूनें लिहिलेलें आहे.

6. Duties of women by Miss Cobb यांचेंच भाषांतर.

७. ' स्त्रियांचीं कर्तव्यें '—कर्ते रा. कोरगांवकर, व रा. पंडित. यांत दिलेलीं सर्व कर्तव्यें जर स्त्रिया करितील व तीं करण्यास त्यांस पुरुषांकडून अडथळा येणार नाहीं, तर स्त्रियांची खरी सुधारणा होणें शक्य आहे.

८. 'स्त्रीधर्मनीति'—पंडिता रमाबाई. १८८३ ( आवृत्ति २ ) यांतील उपदेशही वरील पुस्तकाप्रमाणें बराच उन्नत आहे.

९. 'वधूदर्पणमाला'—रा. गांगनाईक. यांत कांहीं ठिकाणीं मनुस्मृति व भारत यांतून स्त्रियांच्या कर्तव्यासंबंधींच्या श्लोकांचीं अवतरणें देऊन, त्यावरील स्पष्टीकरणांत सुधारलेल्या विचारांप्रमाणें ( त्या श्लोकांच्या उलट ) उपदेश केला आहे, यामुळें थोडा घोटाळा झाला आहे. एकंदरींत, या पुस्तकांत गोष्टींच्या रूपानें सुखाचा संसार होण्यास स्त्रियांनीं कसें वागावें हें दाखविलें आहे; स्त्रियांच्या हक्कांसंबंधीं विशेष विचार केलेला नाहीं.

१०. 'स्त्रियांची परवशता' या पुस्तकावरील रा. विनायक कोंडदेव ओक यांनीं केलेली टीका. ही १९०६ सालीं लहानशा पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली होती. यांत त्यांनीं स्त्रियांच्या विरुद्ध पुरुषपक्षाच्या बाजूनें कांहीं आपले विचार व कांहीं मिलसाहेबांच्या पुस्तकावर टीका करणारे सर फिट्स जेम्स स्टीफन यांच्या टीकेंतील विचार दिले आहेत. रा. कानिटकरांनीं मूळ पुस्तकाचें भाषांतर केलें तर त्यांनीं त्याच्यावरील टीकेचें छोटेखानीं भाषांतर केलें आहे. त्यांनीं जरी टीकेचें भाषांतर केलें असलें तरी ते मुद्दे त्यांस पसंत आहेत, ह्मणून त्यांनीं ते पुढें केले आहेत. या पुस्तकावर जास्त टीका करण्याचा आमचा विचार होता, परंतु त्यांस स्त्रियांस स्वातंत्र्य व समान हक्क देणें ह्मणजे काय हें नीट कळलें नसल्यामुळें, व तें कळण्यासाठीं त्यांनीं तो पूर्वपक्ष केला आहे असें स्पष्ट ह्मटल्यानें आह्मी त्यांजवर टीका न करतां, त्यांस आमचें पुस्तक, व या यादींतील पहिलें पुस्तक काळजीपूर्वक वाचण्याची विनंति करतो. व त्यानंतरही जरी त्यांस 'पुरुष वर व स्त्रिया त्यांच्या हाताखालीं रहाव्यात अशीच ईश्वरी योजना आहे.' असें वाटलें, तरी त्याच्या समर्थनार्थ 'स्त्री व पुरुष दोघें एकदम उत्पन्न झालीं, पूर्वीं दोघांनींही आपापलें स्वातंत्र्य व श्रेष्ठत्व स्थापण्यासाठीं प्रयत्न केला असलाच पाहिजे; व असें असतांही अनादिकालापासून ज्याअर्थीं स्त्रिया पुरुषांच्याच आधीन आहेत, त्याअर्थीं त्यांची तितकीच योग्यता आहे, तीच ईश्वरी योजना आहे,' 'पुरुषांनीं कट करून स्त्रियांनीं आपल्या आज्ञेंत वागलें पाहिजे असा कोठें कायदा केला नाहीं, व असा कायदा केला असता तरी तो लोकव्यवहाराच्या सामर्थ्यापुढें चालावयचा नाहीं हें कोणासही कळण्यासारखें आहे,' 'मग एक मिलसाहेब ह्मणतात तें खरें व बाकी सर्व जग ह्मणतें तें खोटें असें कसें होईल?' असल्या प्रकारचीं कारणें देऊं नयेत. ज्याप्रमाणें 'स्त्रिया त्या स्त्रिया व पुरुष ते पुरुष, पुरुष वृक्ष व स्त्रिया वेली' या त्यांच्या ठाम मतामुळें स्त्रियांची सुधारणा करण्याची खटपट करणें ह्मणजे व्यर्थ वेळ घालवणें आहे, व असा व्यर्थ वेळ घालविणाऱ्या लोकांत रावसाहेब कानिटकरांसारखे लोक पाहून त्यांस खेद वाटतो, त्याचप्रमाणें रा. ओकांसारख्या कुशाग्र बुद्धीच्या गृहस्थांना ईश्वरी योजनेची इतकीच कल्पना असावी, व आपल्या मताच्या समर्थनार्थ त्यांनीं वरील प्रमाणें कारणें द्यावींत हें पाहून आह्मांस खेद वाटतो. हिंदू धर्मशास्त्रांत स्त्रियांनीं ताब्यांत राहण्यासाठीं किती कडक नियम केले आहेत हें त्यास माहीत नाहीं काय? व पुरुषांनीं पुरुषांच्या फायद्यासाठीं केलेले कायदे

व्यवहारानें जास्त बळकट होतात हें कोणासही कळण्यासारखें नाहीं काय? या जगांत सर्वच कामें बहुमतानें होत नसतात. कारण शहाण्यांपेक्षां हजारपटीनें मूर्खांची संख्या असते व ह्मणून एक शहाणा ह्मणेल तेंच जास्त खरें, इतकें तरी त्यांनीं लक्षांत ठेवावें.

११—मनुस्मृति—( मराठी भाषांतर—कर्ते रा. विष्णुशास्त्री बापट. )

१२—स्त्रीधर्मशिक्षा—रा. प्रयागी यांनीं द्वारकाधीश शंकराचार्यांच्या आज्ञेनें लिहिलेलें पुस्तक. (१९०३मध्यें ) या शेवटच्या दोन पुस्तकांच्या आधारें आह्मी स्त्रियांसंबंधीं हिंदुधर्माच्या काय कल्पना आहेत हें सांगितलें आहे. शेवटलें पुस्तक हिंदुधर्मास किती धरून आहे, हें त्यांत विधवांचीं कर्तव्यें केशवपनापासून सांगितलीं आहेत, यावरून दिसेल.

---

# भाग २.

—:※:—

## प्रस्तावना.

### वाचकांस दोन शब्द.

दुसऱ्या भागांतील पहिलें प्रकरण प्रार्थनासमाजास व दुसरें हिंदु लोकांस उद्देशून जरी लिहिलें आहे, तरी पहिल्यांत मधून मधून सर्वसाधारण उल्लेख केला आहे. कारण, पहिल्यांत सुचविलेल्या सुधारणा हिंदुधर्मियांनींही करणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या प्रकरणांतील विचारांचा सामाजिकांनींही थोडा विचार करणें फायद्याचेंच होईल. पुस्तक लहान करण्यासाठीं बरेच मुद्दे गाळावे लागले व कांहींचा थोडक्यांतच विचार केला आहे. याच कारणासाठीं चौथें प्रकरण स्वतंत्र छापण्याचा आधीं विचार होता; पण त्यांत आधीं आलेल्या मुद्यांचेंच स्पष्टीकरण केलें असल्यानें तेंही या पुस्तकांत सामील केलें आहे, व त्यापासूनही केवळ सामाजिकांसच नाहीं, तर सर्वांसच थोडाबहुत उपयोग होईल. या पुस्तकांतलि उदाहरणें व उलट बाजूचीं मतें एकव्यक्तिविषयक नसून अनेक ठिकाणीं आढळण्यांत येणारीं अशीं आहेत, व ह्मणून कोणी एका व्यक्तीनें आमचेवर विशेष रागावूं नये. त्या प्रकारची स्थिति प्रत्येक घरीं आहे असें नसलें तरी मुख्य मुद्दा हा आहे कीं,त्या गोष्टी हिंदुधर्मांत धर्माच्या नांवाखालीं मोडतात, व त्याच सामाजिकांत मताविरुद्ध आचरणांत मोडतात. ह्मणून सामाजिकांस त्यांत लवकर सुधारणा करणें शक्य असल्यानें आम्ही सामाजिकांचा जास्त विचार करून, त्यांस उद्देशून पहिलें व चौथें अशीं दोन प्रकरणें लिहिलीं आहेत. या पुस्तकांतील हिंदुधर्माच्या उल्लेखावरून हिंदुधर्मविषयीं आमचें साधारण मत तेंच आहे असें ह्मणणें चूक होईल, इतकें सध्यां सांगणें पुरें होइल.

या लेखांत आमच्याकडून बऱ्याच चुकाही झाल्या असतील; पण त्यांमुळें आमच्या मुख्य मुद्यांस कांहीं बाध येणार नाहीं अशी आह्मांस आशा आहे. याचा मुख्य उद्देश लोकांत या महत्वाच्या प्रश्नांसंबंधीं जागृति उत्पन्न करणें हाच आहे, व यासाठीं आज-

पर्यंत इतरांनीं केलेल्या एकेका मुद्यावरील टीकेनें लोकांची काळझोंप जात नाहीं, किंवा थोडा वेळ गेल्यास पुनः डोळ्यांवर कातडें ओढलें जाऊन पूर्वीचीच स्थिति येतें असें पाहून, एकदम सर्व मुद्यांचा आह्मी कडकपणें विचार केला आहे. यांतील सर्व मतें मान्य न झालीं तरी निदान सुशिक्षित व सुधारक ह्मणविणाऱ्यांचे डोळे उघडावेत, इतक्यासाठीं हा यत्न आहे. सर्व मुद्यांवर जास्त अभ्यास करून पूर्ण माहिती मिळविण्यास फुरसत नसल्यानें यांत ज्या चुका झाल्या असतील, त्या कोणी दाखविल्यास आह्मी त्या ताबडतोब कबूल करण्यास तयार आहों. परंतु अशा एकेका वाक्याकडे लक्ष न देतां मुख्य मुद्यांकडे जास्त लक्ष द्यावें, व कांहीं मुद्दे अस्पष्ट असतील तर त्यांचा स्वतः जास्त विचार करून ते स्पष्ट करून घ्यावेत, इतकीच आमची सर्व वाचकांस विनंति आहे. शेवटीं एकंदर पुस्तकांपासून कांहीं जागृति झाल्यास ती थंड होण्यापूर्वीच त्याप्रमाणें आचरण करण्यास लागून ती कायम ठेवावी अशीही प्रार्थना आहे.

---

## प्रकरण १.

### प्रार्थनासमाजांत काय सुधारणा झाल्या पाहिजेत.

'निंदावें हें जग । ऐसा भागा आला भाग॥'

प्रथमतः त्या बुद्धिदात्या ईश्वरास नमन करून, या अवघड कामास हात घालण्याची आह्मांस कोठून व कशी बुद्धि झाली हें सांगितलें पाहिजे. कारण हा एखाद्या कसलेल्या लेखकाचा मराठी भाषेस शोभा आणण्यास लिहिलेला लेख नाहीं; तर चालण्यास शिकणाऱ्या मुलाच्या रांगण्याप्रमाणें पुस्तक लिहिण्याचा आमचा हा पहिलाच प्रसंग आहे. तेव्हां या दृष्टीनें याचा लोकांवर विशेष परिणाम होणार नाहीं हें माहीत असूनही ज्याअर्थीं हें काम आह्मी स्वतःवर ओढून घेतल्याप्रमाणें केलें आहे, त्याअर्थीं याचें कारण थोडक्यांत देणें अवश्य आहे.

१९०५ सालीं सुबोधपत्रिकेंत 'प्रार्थनासमाजाचा प्रसार कां होत नाहीं' यावर चर्चा होऊन अनेकांनीं अनेक कारणें दिलीं होतीं. याच प्रश्नावर आह्मी विचार करीत असतां 'घोडें अडतें कोठें' हें आह्मांस दिसून आलें; पण या लेखकांनीं जीं सामान्य शब्दांत कारणें दिलीं होतीं, त्यांत वरील विषयाचा उल्लेख नाहीं हें पाहून आह्मांस वाईट वाटलें. परंतु लहान तोंडीं मोठा घास घेण्याचें धैर्य त्यावेळीं आह्मांस झालें नाहीं. समाजाचीं मतें ठीक आहेत, मग त्यांचा प्रसार कां होत नाहीं ? यास कित्येकांनीं 'आह्मी सभासद त्यांप्रमाणें वागत नाहीं' असें ठोकळ उत्तर दिलें होतें. परंतु प्रत्यक्ष कोणत्या मतांकडे आह्मी दुर्लक्ष करितों व तें कसें, हें कोणीही दाखविलें नाहीं. ह्मणून 'आह्मी वागत नाहीं' या नेहमींच्या आरोपानें कोणास विशेष वाईट न वाटतां, ही चर्चाही थांबली, व 'येरे माझ्या मागल्या' होऊन ५ वर्षेंही निघून गेलीं ! परंतु आमच्या कारणाचा आह्मांस विसर पडेना; उलट

कोणच्याही सुधारणेस काय अडथळा येतो हें पाहूं गेलें कीं त्याच कारणावर आह्मी येऊन थडकूं लागलों. तरी कोणाशीं कधीं फार न बोलण्याचा आमचा स्वभाव असल्यानें, 'आपलें काम बरें व आपण बरें' ह्मणून आह्मी याची कोणाजवळ चर्चा केली नाहीं. शिवाय विद्यार्थ्यांनीं इतर गोष्टींत मन घालूं नये असेंही आमचें मत असल्यानें आह्मांस यासंबंधीं आमचें कांहीं कर्तव्य आहे असें वाटेना. परंतु हे विचार कांहीं जाईनात; उलट वाढूंच लागले. 'चुकतें कोठें व त्यास उपाय काय,' यावर आमच्या मतें आह्मीं पुष्कळ सिद्धांत ठरविले, पण ते सर्व आमच्याच जवळ. पण पुढें, समाजाचे लोक मानतात एक, पण त्याप्रमाणें वागत नाहींत, याचा अर्थ सत्य, न्याय, व दया, यांप्रमाणें वागावयाचें असें घोकत असतां प्रत्यक्ष आपल्या बायकांपोरांवर अन्याय व जुलूम करीत आहेत; रामाप्रमाणें धर्माच्या मागें धावावयाचें असें ह्मणत अधर्म आचरीत आहेत; यामुळें ज्या चालींस मिठी मारून आज विशेषतः हिंदु लोक ज्या नरकाच्या वाटेंत अद्याप लागले आहेत, त्यांतच सामाजिकही 'उन्नति, उन्नति,' असें घोकत अजाणपणें जात आहेत;—हीं जेव्हां ईश्वरानें प्रेरणा केली, व आधीं ठरविलेले सिद्धांत हे आमच्या बुद्धीचे नसून त्याच्या आज्ञा प्रसार करण्यास त्यानें आमच्या स्वाधीन केल्या आहेत, ही जागृति झाली, तेव्हां आमच्यानें स्वस्थ बसवेना. जितके दिवस ही प्रेरणा दाबून ठेवूं, अंतःकरणांत विचारांस ऊत आला असतांही त्यास अडवून ठेवण्याचा प्रयत्न करूं, तोंपर्यंत आह्मांस त्याजपुढें तोंड दाखविण्यास जागा नाहीं, असें जेव्हां वाटूं लागलें, तेव्हां आमचा यःकश्चित्पणा एकीकडे ठेवून, हे विचार लोकांपुढें ठेवण्याचा निश्चय आह्मांस करावा लागला. व त्याप्रमाणें आज हें कर्तव्य होईल तसें बजावीत आहों.

स्त्री स्वाभाविक जास्त सद्गुणी असते हें मान्य नसलें तरी स्त्री व पुरुष ईश्वराचे दृष्टीनें निदान अगदीं सारख्या योग्यतेचीं आहेत असें समाजाचे लोक मानीत असतां त्याप्रमाणें आह्मी वागत नाहीं, याचें कारण काय हा साहजिक प्रश्न येतो. रा. विनायक कोंडदेव ओक यांच्याप्रमाणें 'स्त्रिया या पुरुषांच्या हाताखालीं राहाव्यात अशीच ईश्वरी योजना आहे,' असें जे मानतात, त्यांहून भिन्न व निराधार अशी भलतीच कांहीं कल्पना आह्मी मानतों, परंतु सृष्टिक्रमांत त्याप्रमाणें वागणें शक्यच नाहीं, व ह्मणून आमच्या आचरणांत आम्हांस सृष्टीनियमांखालीं डोकें लववावें लागतें काय? कीं केवळ हलगर्जीपणानें आम्ही वागत नाहीं इतकेंच? हा हलगर्जीपणा आमच्यांत आहे, पण तो हल्लीं हिंदुस्थानच्या सर्वच लोकांत आहे, व म्हणूनच आम्हांपुढें इंग्लिशांचें उन्नत उदाहरण शें दोनशें वर्षें असतां ही लोकांची म्हणण्यासारखी सुधारणा झाली नाहीं. याच हलगर्जीपणानें किंवा नीतिधैर्याच्या अभावानें बंगाल्यांतील ब्राम्ह लोकांच्या कित्येक सुधारणा तहकूब राहिल्या असतील. पण महाराष्ट्रांतलि ब्राम्ह व प्रार्थनासमाजाच्या लोकांची याशिवाय जी एक मोठी चूक झाली ती समाजाच्या चाली नक्की न ठरवितां, आम्ही हिंदु आहों, या कल्पनेनें हिंदु समाजांत मिसळून जुन्या हिंदु चाली स्वीका-

रल्या ही होय. व यामुळें समाजाचें कसें मातेरें झालें आहे पहा !

आर्यनासमाज हिंदुधर्मांतील एक भाग कां ? तर त्यांचीं मतें हिंदुधर्माच्या उदात्त स्वरूपांतून काढतां येतात म्हणून. या मूळ तत्वांविषयींचा वाद टाळण्यास हें गृहीत धेऊं. त्यामुळें सामाजिक स्वतःस हिंदु म्हणवितात, व त्यामुळें त्यांच्यांतील पूर्वींच्या रूढीनें कोर्टांत त्यांस ' हिंदु कायदा ' लागतो, हेंही सर्वांस माहीत आहेच. पण हिंदु कायदा कबूल केल्यानें स्त्रियांचे हक्कांविषयींचा अन्याय चालू ठेवण्यास आम्हीही कशी मदत करीत आहों, ज्या गोष्टी आम्ही मानीत नाहीं त्या प्रत्यक्ष आचरण्यास आम्हीच आपणास कसें बांधून घेतलें आहे, व नाहीं म्हणत असतांही स्त्रियांवर पूर्वीचाच जुलूम कळत किंवा न कळत, पण करीत आहों इकडे कोणाचें लक्ष गेलें होतें काय ? हिंदुधर्माप्रमाणें स्त्रीला मुळींच स्वतंत्रता नाहीं, व ह्मणून हिंदु लॉ प्रमाणें तिची स्त्रीधनाशिवाय जास्त कशावरही मालकी नाहीं. मुसलमानांतही मुलीस थोडा वारशाचा हक्क आहे. पण हिंदूंत बापाच्या संपत्तीवर मुलग्यांचाच हक्क आहे, व आईच्या संपत्तीवर फक्त मुलींचाच हक्क आहे. ही व्यवस्था आमच्या मतांप्रमाणें आम्हांस कबूल आहे काय ? नाहीं. पण आम्हीं असेंच वागतों कीं नाहीं ? होय, ही हिंदु लॉची धोंड गळ्यांत बांधल्यानें आम्ही कितीही सुधारक म्हणून बाता मारल्या तरी आम्हांस त्याप्रमाणें वागणें भाग आहे. हा मुद्दा पहिल्या प्रथम घेण्याचें कारण स्त्रियांस खरें स्वातंत्र्य व समान हक्क देण्यास त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे, हें होय. या जगांत पैशाची किंमत शहाणपणापेक्षां अधिक आहे. पैशासाठीं शहाण्यास मूर्खांची व स्त्रियांस पुरुषांची गुलामगिरी करणें भाग पडत आहे. म्हणून स्त्रियांस केवळ शिक्षण देण्यानें त्यांच्या कपाळची पुरुषवशता कधींही नाहींशी होणार नाहीं. कांहीं कारणांमुळें एखाद्या स्त्रीस नवरा असतां, किंवा त्याच्या मागें, स्वतंत्र रहावेंसें वाटलें तरी जोंपर्यंत तिच्या मालकीचा कांहीं पैसा नाहीं, व तिला स्वतंत्रपणें मिळवून खाण्याचीही सोय नाहीं, तोंपर्यंत तिला पोटासाठीं दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून रहावें लागतें. माहेरी कायमची रहाण्याची सोय फार थोड्यांची असते, व नवरा असतां निराळें राहून नवऱ्यापासून पोटगी मिळण्यास कोर्टाची पायरी चढावी लागते. अशा स्थितींत नवऱ्यानें हाकलून देईपर्यंत कशीही स्थिति असली तरी तिला नवऱ्याच्या घरींच रहावें लागतें. कित्येक ह्मणतात, ' हिंदु स्त्रियांची स्त्रीधनावर पूर्ण सत्ता असते, व विधवेस नवऱ्याच्या संपत्तीची व्यवस्था लावण्याचा हक्क नसला तरी ती भोगण्याचा हक्क आहे हें काय थोडें झालें ? ' स्त्रीधनावर स्त्रियांची पूर्ण सत्ता आहे खरी; पण तें धन किती असतें ? त्याच्या आधारावर कोणीही स्त्री स्वतंत्रपणें रहाण्यास तयार होणार नाहीं. व नवऱ्याची संपत्ति भोगण्याचा हक्क म्हणजे सासरच्या इतर माणसांच्या घरीं स्वयंपाक करून जेवण्याच्या हक्कापलीकडे कांहीं आहे काय ? जोंपर्यंत कोणीही स्त्री स्वतंत्र राहिली कीं तिच्या वर्तनाविषयीं लोक शंका घेतात, व जोंपर्यंत विधवेस नवऱ्याच्या संपत्तीची आपल्या इच्छेप्रमाणें व्यवस्था करितां येत नाहीं, तोंपर्यंत तिनें ती भोगावयाची, ह्मणजे दुसऱ्या कोणा नातलगाच्या घरीं राहून,

एकभुक्त राहून, कोणास तोंड न दाखवितां, कोणच्याही समारंभांत अपशकून न करतां, आपलें शरीर झिजवून मरणाची वाट पहात बसण्याचा हक्क इतकाच त्याचा हिंदु कल्पनांप्रमाणें अर्थ निघतो! परंतु स्त्रियांविषयींच्या या कल्पना निदान सुधारक ह्मणविणारांनीं सोडण्याची आतां वेळ आली आहे. लग्न करणें ह्मणजे स्त्रियांची इतिकर्तव्यता नाहीं. ह्मणून त्यांस पुरुषांप्रमाणें शिक्षण मिळालें पाहिजे, पुरुषांप्रमाणें स्वतंत्रपणें कष्ट करून राहतां आलें पाहिजे, व पुरुषांप्रमाणें वडिलोपार्जित संपत्तीवर हक्क असला पाहिजे. मुलगा कांहीं पुण्याचें गाठोडें घेऊन जन्मतो असें नाहीं, व मुलीच्या गळ्यांत जन्माच्या वेळीं ईश्वरानें पापाचें गाठोडें बांधलें आहे असेंही नाहीं. वृद्धापकाळीं मुलगाच आईबापांचा संभाळ करूं शकतो असें नाहीं. जर त्यांनीं मुलास व मुलीस सारखें मानून दोघांचीही नीट वाढ केली तर पुढें दोघांकडून त्यांस सारखीच मदत मिळेल, किंबहुना मुलानें लाथा झाडल्या तरी मुलगी खचित जास्त काळजी घेईल.

वारशासंबंधीं हिंदु लॉ सामाजिकांनीं आपणांस कबूल नाहीं असें ह्मणून आह्मांस निराळा कायदा मिळेपर्यंत, किंवा हिंदु लॉमध्यें बदल होईपर्यंत त्याचा निषेध (Protest) तरी केला पाहिजे, ह्मणजे हें मत नेहमीं बोलून दाखविलें पाहिजे व कायद्यानें मुलांमुलींस वारशाचा सारखाच हक्क मिळेपर्यंत मृत्युपत्राप्रमाणें तशी व्यवस्था केली पाहिजे. ही गोष्ट प्रत्येकास वाटेल तेव्हां शक्य आहे, व यावरून स्त्रियांस समान हक्क द्यावेत असें वाटलें तरी खरोखर किती देतात हेंही दिसून येणार आहे. हिंदु लॉमध्यें बदल होण्यास हिंदुधर्मांतील बहुतेक लोकांची या गोष्टीस अनुकूलता पाहिजे, व आजपर्यंतच्या इतिहासावरून अंदाज केल्यास या गोष्टीस बऱ्याच पिढ्या लोटण्याची जरूर दिसते. परंतु ब्राह्म व प्रार्थनासमाजांस हिंदुधर्मांतील सर्व तत्वें मान्य नसल्यानें त्यांनीं स्वतःस हिंदु ह्मणविण्याचें व हिंदु लॉ लागू करून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. ज्याप्रमाणें त्यांनीं आपलीं निराळीं मतें ठरवून निराळा समाज स्थापन केला आहे, त्याप्रमाणें त्यांनीं आपणांस कबूल असतील असेच कायदे आपणांस लावावेत असा सरकाराकडे अर्ज केला पाहिजे. Indian Succession Act या नांवाचा वारशासंबंधीं कायदा हिंदुस्थान सरकारानें हिंदु, मुसलमान व बौद्धधर्मी नसणारांस किंवा या तिहींपैकीं एखादी वारशाची रूढी ज्यांत नाहीं अशांस लागू करण्यासाठीं केलेला आहे. या कायद्याप्रमाणें, जर कोणी मृत्युपत्र केलें नसेल तर संपत्तीचा तिसरा हिस्सा बायकोस मिळून, बाकी संपत्ति सर्व मुलांत सारखी वाटली जाते. हा कायदा आह्मांस कबूल करण्यास विशेष कांहीं हरकती असतील असें आह्मांस वाटत नाहीं, व ह्मणून यासंबंधीं विचार होऊन सर्व समाजांनीं मिळून हा कायदा आह्मांस लागू करावा असा अर्ज करणें रास्त आहे. पण हेंही होण्यास कांहीं काळ लागणारच, व तोंपर्यंत ज्यांस आपल्या मतांप्रमाणें आचरण ठेवणें असेल त्यांनीं मृत्युपत्रांनीं तशी व्यवस्था केली पाहिजे. सारांश, मुख्य प्रश्न आमचीं स्त्रियांसंबंधीं काय मतें आहेत, काय असावींत, व त्याप्रमाणें आचरण करण्यास आह्मी काय केलें पाहिजे, हा आहे. यापैकीं पहिला मुद्दा स्त्रियांची व

पुरुषांची सांपत्तिक स्थिति शक्य तितक्या रीतीनें सारख्या पादावर पाहिजे, ह्मणजे बापानें तरी मुलगा व मुलगी यांत भेद ठेवितां कामा नये; हा भेद न राहील असा कायदा असला पाहिजे, व तोंपर्यंत मृत्युपत्रांनीं हा भेद काढून टाकणें शक्य आहे.

प्रार्थनासमाजानें 'ब्राह्मसमाज' नांव घ्यावें कीं नाहीं हा प्रश्न अनेकदां उपस्थित होऊन २/३ मतांवर अडकून पडला आहे. हा वाद येथें काढून 'ब्राह्म' शब्दांत सुधारणा करण्याची कांहीं जादू आहे असें आह्मांस सांगावयाचें नाहीं. पण पहिल्याच खेपेस जर तें नांव घेतलें असतें तर प्रार्थनासमाज आणखी एका अन्यायांतून सुटला असता. हा अन्याय एका वेळीं एकच पति किंवा पत्नी करण्याचा लेखी नियम नसणें हा होय. नवविधान ब्राह्मसमाजाच्या नवसंहितेंत ब्राह्मसमाजांत एका वेळीं एकच पति किंवा पत्नी होऊं शकते असा स्पष्ट उल्लेख आहे; व साधारण ब्राह्मसमाजांत (Civil Marriage Act प्रमाणें) लग्नें रजिस्टर करतात; यामुळें तो नियम त्या कायद्यांत येतोच. पण प्रार्थनासमाजी हिंदु ह्मणवितात, फार थोडीं लग्नें रजिस्टर करतात, इतर लग्नेंही ठराविक विधीनें होत नाहींत, व वरील मताचा कोठेंही उल्लेख नाहीं; मग हिंदु ह्मणण्यानें काय मानणें आमच्या गळ्यांत येतें? कित्येक ह्मणतील आमचें तसें खासगी मत (Private understanding) आहे. पण असल्या महत्वाच्या बाबतींत खासगी मत किती दिवस चालेल? जोंपर्यंत असें उदाहरण झालें नाहीं तोंपर्यंत! कारण असें उदाहरण झाल्यास त्यास लेखी नियमांप्रमाणें समाजांतून बाहेर काढतां येत नाहीं. याचें कारण आह्मी हिंदु ह्मणविण्याच्या भरांत हिंदु लोकांत स्त्रियांसंबंधीं अन्यायाच्या व जुलमाच्या किती गोष्टी आहेत इकडे आमचें लक्ष गेलें नाहीं, व ह्मणून आह्मी मानतो एक, पण कायद्याप्रमाणें आह्मांस उलट आचरण करणें भाग येतें. इतर सुधारलेल्या देशांत केवळ इतक्यावरच मजल नसून व्यभिचार करणाऱ्या नवऱ्यापासूनही काडी मोडून स्वतंत्र होण्याचा बायकोस हक्क आहे, याचें कारण काय? तर दुसरी बायको करणें किंवा व्यभिचार करणें ह्मणजे पहिल्या बायकोचा अत्यंत घोर अपराध करणें आहे, असें तिकडचे लोक मानतात. याच नियमांप्रमाणें दुर्गुणी बायकोपासून नवऱ्यासही निराळें होतां येतें हें खरें; पण **स्त्रियांपेक्षां पुरुषच जास्त जुलमी व व्यभिचारी असतात**, व ह्मणून लग्नासंबंधाचे कायदे विशेषतः स्त्रियांच्या रक्षणासाठीं आहेत असा समज आहे. 'आतां या चित्राकडे पहा.' ज्या केशवचंद्रांनीं एकपत्नीव्रताचा उल्लेख केला, त्यांनींच उच्च विचारांच्या भरांत 'ब्राह्मसमाजांत घटस्फोटाचें नांवही नाहीं' असा नियम केला! पण जोंपर्यंत ब्राह्मसमाजांत कोणीही पुरुष किंवा स्त्री कधींही व्यभिचार करणार नाहीं असा ईश्वरानें वर दिला नाहीं, तोंपर्यंत हा नियम अनीतिप्रवर्तक नव्हे काय? हिंदुधर्मांत याच्याही वर ताण आहे! दुराचारी बायकोस घटस्फोटाच्या विधीप्रमाणें सोडतां येतें, पण नवरा दुराचारी असला तरी बायकोनें त्याची सेवाच केली पाहिजे! पण जेथें एक बायको असतांही दुसरी करतां येते व बायकोचा अपराध नसतां तिला टाकतां येतें, तेथें या विधीनें काय महत्व राहिलें? या विधीवरून स्त्रियांसंबंधीं हिंदु नियमांची साधारण दिशा दिसते; यांत शंका

नाहीं. हिंदुधर्माभिमानी मोठ्या दिमाखानें ह्मणतात, ' आमचीं लग्नबंधनें पाश्चात्यांप्रमाणें लेचींपेचीं नाहींत; व आह्मी अविचारानें इतरांचें अनुकरण करून त्यांच्या मजबूत पायास धक्का पोंचेल असें कांहीं करूं नये. ' ( ना. के. अलोनी, बॅरिस्टर; ' लग्नविधि व सोहळे ' प्रस्तावना पा. १९ ). परंतु या नियमानें हिंदु लोकांत व तींहीं विशेषतः पुरुषांत ( कारण नवरा असणाऱ्या स्त्रियांनीं व्यभिचार केल्याचीं उदाहरणें कमी प्रमाणानें आढळतात.) किती अनीति वाढली आहे हें येथें सिद्ध करण्याची गरज आहे काय ? प्रत्यक्ष उदाहरणांची गोष्ट सोडली तरी घटस्फोट शक्य असण्याच्या नियमानें आमची नीति कमी होते कीं जास्त ? विवाहासारखें पवित्र धर्मबंधनही एका अनीतीच्या घावानें तुटतें असें मानण्यांत आमची अनीतिविषयीं चाड कमी होते कीं जास्त ? केवळ असें मानण्यानेंही आमच्या मनांत नीतीची आवश्यकता व पवित्रता जास्त ठसतें हें उघड उघड दिसत असतां, आह्मी पाश्चात्यांची चेष्टा करावी काय ? आह्मी ह्मणतों, आज निदान ब्राह्म व प्रार्थनासमाजांचें हा नियम कबूल करणें कर्तव्य आहे. या नियमानें लग्नबंधनें जास्त पवित्र व जास्त बळकटच होतील. या नियमानें समाजांत अनीतीचा शिरकावही होणार नाहीं, कारण समाजांत अनीति झाल्याबरोबर ती समाजाबाहेर काढण्याचा हा सेफ्टी व्हॉल्व्ह ह्मणजे दरवाजा आहे. रा. अलोनी ह्मणतात, ' जर पाश्चात्यांत स्वयंवर पद्धतीनें लग्नें होतात, मग अल्प कारणांवरून एकमेकांनीं तडातड काडया मोडून देण्यास कां प्रवृत्त व्हावें ? आणि पाश्चात्य न्यायाधिशांपुढें असल्या खटल्यांच्या नित्य नव्या राशी कां पडाव्या ? याचें इंगित त्यांच्या लग्नसंस्थेचा पायाच कच्चा आहे हें निर्विवाद सिद्ध होतें. ' ( वरील पुस्तक, प्रस्ता. पा. १८ ) त्यांचा हा शेवटचा सिद्धांत कसा सिद्ध होतो हें त्यांचें त्यांसच माहीत ! पण त्यांनींच केलेल्या पुस्तकांत पाश्चात्य लग्नविधींत **मृत्युवियुक्त करीपर्यंत** हें बंधन पाळण्याची वधूंवरें शपथ घेतात असें दिलें आहे, व यावरून त्यांचें धार्मिक लग्नबंधन पक्कें आहे हेंच सिद्ध होतें. व हें धार्मिकबंधन अधर्मानेंच तुटतें असा अनीति वाढल्यानें लोकांस कायदा करावा लागला; तरी अजून ही गोष्ट धर्मपुस्तकांत आली नाहीं. आतां घटस्फोट अल्प कारणांनीं होत नाहीं हें विलायतेस जाऊन कायदे शिकणारांस आम्हीं सांगितलें पाहिजे काय ? घटस्फोट एका पक्षाची अब्रू जाऊनच होतो, व जे अब्रू विकून अनीति करतात त्यांस भक्कम धर्मबंधनांनीं बांधल्यानें त्यांची नीति सुधारते कीं दुसऱ्या पक्षावर अन्याय होतो, हा विचार कोणी करील काय ? सारांश, याप्रमाणें घटस्फोटाच्या नियमाची व पाश्चात्यांची चेष्टा करणें हा हिंदु कल्पना हाडीं खिळल्याचा परिणाम आहे. व जोंपर्यंत हिंदु काय किंवा प्रार्थनासामाजिक काय, या हिंदु नांवाचा पोकळ अभिमान सोडून या बाबतींत सुधारणा करणार नाहींत, तोंपर्यंत अनीति व अधर्मच वाढून ते अधोगतीसच जाणार ! ही कल्पना हिंदु लोकांस नवी आहे, व शिवाय इतके दिवस तिची चेष्टा केल्यानें आतां ती ग्रहण करणें जास्त कठीण आहे हें खरें. तरी यामुळें होणाऱ्या स्त्रियांवरील अन्यायाची जर आह्मांस चाड असेल, सत्य व न्याय या तत्वांप्रमाणें वागूनच आमचें हित होईल

असा दृढ विश्वास असेल तर ईश्वराची कास धरून, आत्महत्या करविणाऱ्या अहंकाराची मान मोडून आज या नव्या कल्पनेचा स्वीकार करणें आह्मांला शक्य आहे,व आजपर्यंतच्या अन्यायानें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे असें आह्मी पुन्हा ह्मणतों.

स्त्रियांसंबंधींच्या अन्यायांची गोष्ट काढली ह्मणजे जुने लोक ह्मणतात, 'अहो, काय तुह्मी हें अन्यायांच व त्यांच्या दुःखांचें तिखटमीठ लावून काल्पनिक वर्णन करतां? इतका अन्याय व जुलूम खरोखर होत असता तर काय स्त्रिया उगीच बसल्या असत्या?' खरें आहे. स्त्रिया इतका जुलूम सहन करून, आहे त्या स्थितींत आनंद मानून, पुन्हा बिनतक्रार जुलूम करणारांचीच सेवा करीत आहेत. अजून इंग्लंडांतील चळवळ करणाऱ्या बायकांप्रमाणें इकडे बायका आपले हक्क मागूं लागल्या नाहींत, हें खरें आहे! व ह्मणून पुरुषांस 'त्यांचे हक्क त्यांस द्या' असें सांगण्याबरोबरच 'त्यांनीं न दिल्यास तुह्मी हट्टानें ते हिसकावून घ्या' असेंही स्त्रियांस आह्मी सुचविणार आहों. परंतु त्यांनीं कुरकुर न केल्यानें आमचा जुलूम कमी न होतां वाढत आहे. पहा, मनु काय ह्मणतो—'पति दुराचारी, दुसऱ्या स्त्रीवर प्रेम करणारा, किंवा गुणशून्य असला तरी साध्वीनें देवाप्रमाणें त्याची सेवा करावी. (अ. ५, श्लो. १५४)' व 'ती जर त्यास सोडून निराळी राहील तर ती व्यभिचारी अशी तिची सर्व लोकांत निंदा होईल,' ही वर दक्षिणा! जेथें रामानें उघड उघड सीतेच्या पातिव्रत्याची शंका घेऊन तिची अब्रू घेतल्यानें वाल्मिकीनें तिला पुनः रामाकडे पाठविली नाहीं, तेथें मनूसारखे शास्त्रकाराची प्रौढी मिरवणारे स्त्रियांस आपल्या दुर्गुणी पतीसच मिठी मारण्यास सांगून, तसें न केल्यास पुरुषांचें पाप त्यांजवर लादत आहे! "या कल्पना ज्यांच्यावर सद्गुण ह्मणून हजारों वर्षें लादल्या आहेत, त्या कोणच्या तोंडानें बोलतील? व्यभिचारी नवऱ्यापासून दूर राहिल्यानें जे लोक त्याच्या पापाचें खापर तिच्यावर फोडण्यास तयार आहेत, अशा हजारों लोकांच्या निंदेपेक्षां एकाच इलकटाच्या जाचांतच त्या सुख न मानतील तर काय करतील? असा तोंड दाबून बुक्क्याचा मार देऊन, मार लागता तर ओरड केली नसती कां? या ह्मणण्यानें जास्त क्रूरपणा दिसत नाहीं काय? सारांश, यासाठीं पुरुषांनीं आपण होऊन स्त्रियांचे हक्क त्यांस दिले पाहिजेत. केवळ न्याय्य ह्मणून, केवळ त्यांच्या सुखासाठीं ह्मणूनही ते देणें आमचें कर्तव्य आहे; मग ज्यांत आमचाही फायदा आहे, ती गोष्ट करण्यास आह्मी अजून मागें पुढें पहावें काय?

हे मालकीचे व विवाहसंबंधी कायदेशीर अन्याय झाले. आतां सामाजिकांनीं स्वतःस हिंदु ह्मटल्यानें मानसशास्त्राच्या नियमांप्रमाणें, त्याचा आमच्या मनांवर कसा परिणाम झाला, व त्यामुळें आह्मी स्त्रियांवरील जुने सामाजिक जुलूम कसे पुढें चालवीत आहों हें पहा. हजारों वर्षें हाडीं खिळल्यानें घडघडीत वाईट चालीही सोडणें फार कठीण जातें, हें ज्यांनीं त्या सोडल्या त्यांच्या अनुभवानें व ज्यांनीं माघार घेतली त्यांच्या उदाहरणानें दिसतें. प्रत्यक्ष मुलगी विधवा असतां, व तिची लग्न करण्याची इच्छा असतांही बापाची सर्व विद्या व सुधारणा एकीकडे राहून, निदान आपल्या घरीं इतक्यांतच हा भ्रष्टाकार न होईल तर चांगलें असें त्यास वाटतें, मग इतर नातेवाईक उलट जातील यांत

काय आश्चर्य! याप्रमाणें हीं जुन्या वाईट चालींची मगरमिठी सुटणें इतकें कठीण असतांही जे लोक थोडाबहुत हिय्या करून सुधारणा करण्यास समाजांत येतात, त्यांस आह्मी ह्मणतों, 'अहो, आह्मी हिंदूच आहों' व यामुळें जुन्या चालींत सुधारणा करण्याची जी अर्धवट प्रवृत्ति असते, तिला हिंदुधर्मांत राहूनच त्यांतील चांगल्या गोष्टी घेण्याचें स्वरूप येतें, व पुढें 'भट हळूहळू पाय पसरून' सर्व जुन्या चाली येतात, इतकेंच नाहीं, तर आह्मी त्यांसच उत्तम व सुधारणा ह्मणून गळ्यांत बांधतों! हा मुद्दा शास्त्रीय दृष्टीनें फार महत्वाचा आहे, व तो नीट समजण्यास यामुळेंच आह्मी सर्व जुन्या चाली स्वीकारून, स्त्रियांवर सुधारणेच्या नांवानें पूर्वींचाच जुलूम कसा करीत आहों, हें उदाहरणांनीं दाखविलें पाहिजे.

(१) मुलींचें शिक्षण व त्यांच्या लग्नाची वयमर्यादा याविषयीं आह्मी मानतों काय, करतों काय, व तें तसें कां करतों, यांचा विचार करा. मुलगा व मुलगी यांत लग्न होईपर्यंत आह्मी फारसें अंतर मानीत नाहीं; दोघेही आत्मे आहेत व दोघांचीही उन्नति झाली पाहिजे, व लग्नाचे वेळीं वधूवर लग्नास योग्य असलीं पाहिजेत, इतकें तरी आह्मी मानतों. आतां विशेषतः मुलीचें लग्नास योग्य वय कोणतें हा प्रश्न आला, व येथें आम्ही प्रत्येक गोष्टींत आपलें ज्ञान व सुधारणा बाजूस ठेवून हिंदु वाईट चाली पुनः सुधारणा म्हणून सुरू केल्या आहेत. मुलींच्या शिक्षणाची गोष्ट घ्या. लग्नाच्या आधीं किती शिक्षण अवश्य झालें पाहिजे? तर 'बायकांस लिहितां वाचतां न आलें तरी चालेल, पण त्यांस स्वयंपाक करतां आलाच पाहिजे,' असे उद्गार पोरांपासून थोरांपर्यंत पुरुष काढीत आहेत. व यामुळें व शेजारचें जुनें उदाहरण पाहून बिचाऱ्या आयांस व मुलींस असें वाटत आहे कीं, 'खरोखर बायकांचे गळ्यांत ईश्वरानें फक्त पोळपाट लाटणेंच बांधलें आहे, व पुरुष अलीकडे सुधारणा करून, फावल्या वेळांत जीं चार अक्षरें आह्मांस ऐकवितात किंवा शिकवितात तें केवळ त्यांची दया ह्मणून!' मिलनें गुलामांचें उदाहरण देऊन ह्मटलें आहे कीं, ते स्वतः पूर्ण स्वातंत्र्य मागत नाहींत याचें कारण तें त्यांस कल्पतरूप्रमाणें अशक्य वाटतें ह्मणून. याचप्रमाणें ज्यांस शिक्षण व स्वातंत्र्य हजारों वर्षांपासून माहीत नाहीं, त्यांस पुरुषांच्या बरोबरीनें आपणांस शिक्षण असावें असें न वाटल्यास, केवळ आपली मारहाण कमी होऊन फुरसतीच्या वेळीं ट फ करतां येऊं लागलें हेंच भाग्य असें वाटल्यास, नवल काय? पण हीच शिक्षण-मर्यादा असें आह्मी उघड कबूल करतों काय? नाहीं; दोघांची आत्मिक उन्नति झाली पाहिजे हें मत आह्मी परत घेणार नाहीं. पण मुलगा बी. ए. झाला तरी केव्हां केव्हां त्यांस आत्मा व धर्म कशाशीं खावा हें कळत नाहीं, अशीं उदाहरणें डोळ्यांपुढें असून, आह्मी स्त्रियांची आत्मिक उन्नति दोन चार मराठी क्रमिक पुस्तकांनीं करूं पाहतों आहों. अशानें त्यांच्या आज-पर्यंतच्या आत्मिक मृत्यूपासून त्यांची सुटका होईल काय? स्वयंपाक आधीं आला पाहिजे कां? तर पुरुषांस चूल पेटवणेंही माहीत नसतें ह्मणून! पण त्यासाठीं ८ व्या वर्षापासून किंवा त्याचयाही आधींपासून घरकामास जुंपून तिच्या शिक्षणाचें मातेरें करणें आह्मांस शोभतें काय? स्वयपाक शिकण्यास एक वर्षही लागत नाहीं, पण शिक्षणाचा नुसता गंध लागण्यास १० वर्षेंही

कमी पडतात ! या पुरुषांच्या धमकीनें हल्लीं कित्येक मुली घरकाम करूनही मुलांच्या बरोबरीनें शाळांत व कॉलेजांत शिकत आहेत, याची पुरुषांस लाज वाटते काय ? नाहीं; उलट अशा हौसेनें शिकणाऱ्या मुलींची हौस पुरी न करतां, **आईच्या नांवाखालीं** बाप त्यांचीं लग्नें करून देत आहेत. याप्रमाणें आलेल्या लग्नाच्या विषयाचा आतां विचार करूं.

'मुलीचें लवकर लग्न करण्याचें माझ्या मनांत नव्हतें, पण तिच्या टुमण्यानें करावें लागलें' असे पश्चात् उद्गार कितीकदां सुधारक काढीत आहेत. पण हें खापर आईवर न फुटतां बापावरच फुटतें ! जिला लग्न ह्मणजे काय हें स्वानुभवानें कळतें, ती आई मुलीचें लग्न लवकर न करतां, उलट तिच्यांत शिकण्याची हौस जास्त वाढवील, असें कांहीं उदाहरणांवरून दिसतें; मग आधीं हौस असतां मुद्दाम शिकणें सोडवून लग्नपाशांत गुंतविण्याची घाई सुशिक्षित आई करील असें आह्मांस वाटत नाहीं. व जरी हल्लीं जात व लोकनिंदा यांमुळें बायकांस मुलींच्या लग्नाची घाई असते, तरी मुलीची शिकण्याची हौस पुरी झाल्यावर लग्न करावयाचें असें नवऱ्यांनीं ह्मटल्यास त्यांस वाईट खचित वाटणार नाहीं. याप्रमाणें मुख्य जबाबदारी हल्लीं बापावर येते. जुन्या रीतीप्रमाणें मुलीच्या जन्माचे वेळीं जरी त्यानें नाक न मुरडलें, तरी तिचें पुढें लग्न करून देणें हें मोठें काम आपल्यावर आहे, व तें पार कसें पडेल ही त्यास व्यर्थ काळजी असते; व ही दूर करण्यास एखादें स्थळ मिळालें कीं मुलीचें शिक्षण किती झालें, तिचें वय काय आहे, यांचा विचार न करितां, 'चांगलें स्थळ दवडूं नये' हें कारण दाखवून बापच तिचें दान करतो !

( २ ) बरें, शिक्षणाची गोष्ट सोडली तरी, मनूंत ह्मटल्याप्रमाणें स्त्रिया या मुलें होण्याचीं जिवंत यंत्रें आहेत, या दृष्टीनें त्यांचें लग्नाचें वय काय असलेंच पाहिजे हा विचार करा. मुलें होण्याचे आधीं स्त्रीची पूर्ण वाढ होणें अवश्य आहे; कारण नाहींतर मुलांच्या व आयांच्या शरीराची हानि होते. या डॉक्टरी नियमाप्रमाणें वय ठरविलें तर डॉ. देशमुख यांनीं २७ व २० अशीं वर व वधु यांचीं वयें दिलेलीं वाचकांचे ध्यानांत असतील. डॉ. देशमुख हे धर्म किंवा सामाजिक सुधारक नसतां, केवळ डॉक्टरी शास्त्रास स्मरून त्यांनीं या पूर्ण वाढीच्या मर्यादा दिल्या आहेत हें त्यांस भूषणावह आहे. कारण इकडे सुधारक ह्मणविणारे डॉक्टर स्वतः प्रौढ असतां, १२–१३ वर्षांच्या प्रौढ वधूबरोबर लग्न करीत आहेत, व आपल्या तितक्याच प्रौढ मुलींचीं लग्नें स्वतः करून देत आहेत, मग त्यांचे मित्र तेंच करतील यांत काय दोष ! ज्यांस पडसें, खोकला झाला कीं दोन दिवस औषध प्याल्याशिवाय चैन पडत नाहीं, त्यांस मुलींच्या लग्नाचें वय ठरविण्यास डॉक्टरी शास्त्राची मदत नकोशी वाटते, इतकेंच नाहीं तर या गोष्टी माहीत असतां, रोज आपोआप कानावर येऊन आदळत असतां, मुद्दाम डोळेझांक चालू आहे ! ब्राह्म व प्रार्थनासमाजी ह्मणविण्यांत भूषण मानणारांच्या घरींही २०–२५ वर्षांच्या तीन चार मुलें झालेल्या, प्रौढ आया काठी टेकून चालत आहेत ! मग काय आमच्यांत व जुन्या लोकांत फरक आहे ! कशाला आह्मी व्यर्थ हें नवें धर्मसुधारणेचें

ढोंग काढून, त्याचा प्रसार करूं पाहतों ? डॉक्टरी शास्त्रास गुंडाळून ठेवण्याचें प्रायश्चित्त डॉक्टरी शास्त्रच पुनः आह्मांस कडू औषधें पाजून देत असतांही आमचे डोळे उघडूं नयेत, मग काय आह्मी सुधारणेचे दिवे लावणार ? अल्पवयांत झालेल्या मुलांत व आईच्या आंगांत जेमतेम अर्धा जीव असतो, कांहीं मुलें मरतात, व जीं जगतात तीं व आया वर्षांचीं वर्षें अंथरुणास खिळून एकामागून एक आजार काढीत असतां, व त्यांचें औषधपाणी करतांना इतर सर्वांच्या नाकीं नव येत असतांही, दुसऱ्या मुलाचे किंवा मुलीचे केव्हां एकदां दोहोंचे चार हात झालेले पाहीन ही आशा ह्मातारचळ लागलेल्या, जुन्या, भोळसट बायांप्रमाणें पुरुषांस–शहाणपणाचा व सुधारणेचा टेंभा मिरवणाऱ्या पुरुषांस सोडीत नाहीं. याप्रमाणें आम्ही धर्म व सामाजिक सुधारणेच्या नांवास कलंक लाविला नाहीं काय ? इतकें शिक्षण जर स्त्रियांस दिलें तर खचित त्या इतक्या मूर्ख राहणार नाहींत ! पण लक्षांत कोण घेतो !

( ३ ) तरी या हिंदुधर्माच्या मगरमिठीनें आह्मांस येथेंच सोडलें नाहीं. आणखी एक चाल आह्मी तिचा स्त्रीस्वातंत्र्याच्या दृष्टीनें विचार न करतां मुकाट्यानें हिंदुधर्मांतून घेतली आहे. **ही कन्यादानाची चाल होय.** ही चाल इतर सर्व धर्मांतही आहे, असा ती चालू ठेवण्यासाठीं आधार एका विद्वान् गृहस्थांनीं दिला होता. ह्मणून आह्मी ‘ लग्नविधि व सोहळे’ या पुस्तकांतील सर्व देशांचे व धर्मांचे लग्नविधि पाहिले, व त्यावरून पुढील लोकांत हा विधि मुळींच नाहीं असें निघालें.–यहुदी, रोमन कॅथलिक, मुसलमान, दक्षिणेंतील जैन, लिंगायत, मेश्री वैश्य ( वैष्णव ), पारशी, शीख, जपानी व चिनी. यांवरून जगांतील बहुतेक लोकांत हा विधि नाहीं ! ( यावरून त्यांच्यांत स्त्रियांस पूर्ण स्वातंत्र्य आहे असें आमचें ह्मणणें नाहीं; पण या विधीची हिंदुधर्मांत कशी उत्पत्ति झाली हें समजण्यास याचा उपयोग होईल. ) पारशी लोकांत पाणिग्रहणापूर्वीं वधु व वर यांच्या पित्यांची संमति घेण्याचा विधि आहे. जपानी विधीच्या आरंभींच ‘जपानी मुलें व मुली पूर्ण वयांत आल्याखेरीज त्यांचीं लग्नें होत नाहींत, ’ हें वाक्य वरील पुस्तकांत दिलें आहे. वरील लोकांशिवाय प्रॉटेस्टंट लोकांत जरी कन्यादाता ह्मणून असतो तरी तो कन्येस वराच्या स्वाधीन न करतां, उपाध्यायाच्या स्वाधीन तिचें लग्न करण्यासाठीं करतो. यावरून हा विधि हिंदु कन्यादानापेक्षां अगदीं निराळा आहे, व त्यानें फक्त त्याची संमति दिसते व ही संमति सर्व खिस्ती लोकांत लग्नाची जाहिरात देतांनाच अवश्य आहे. आतां हिंदुधर्मांतून ज्या तीन सुधारलेल्या शाखा निघाल्या–ब्राह्म, प्रार्थनासमाज, व आर्यसमाज–त्यांत हा विधि जरी गाड्याबरोबर नळा याप्रमाणें शिरला आहे, तरी इतर दोघांनीं त्यानंतरच्या विधींत इष्ट फरक केला आहे, पण प्रार्थनासमाजानें कांहींही विचार न करतां तो विधि घेतला आहे. ब्राह्म व आर्यसमाजांत कन्यादानानंतर वधूवरांस समान प्रतिज्ञा घ्याव्या लागतात. ब्राह्मसमाजांत कन्यादानापूर्वीं उपाध्याय वधूवरांस त्यांची संमति विचारतात, व नंतर कन्यादान होऊन, पाणिग्रहणांत पुढील वाक्यें दोघांसही ह्मणावीं लागतात.–‘ १ आज मी परमेश्वरासमक्ष तुजशीं विवाह करतों. २ संपत्ति–विपत्तींत मी तुला अंतर देणार नाहीं. माझें अंतःकरण सर्वदा तुझ्याठायीं

व तुझें मोझ्याठायीं राहो, व उभयतांचीं अंतःकरणें परमेश्वराचे ठायीं राहोत. ३ मी सर्वस्वीं तुझा, तूं सर्वस्वीं माझी, आपल्या प्रेमांत कधीं विपर्यास न होवो ' यांतील मुख्य मुद्दा हा आहे कीं, 'माझी आज्ञा एकमनानें पाळ ' अशी नवरा ताकीद देत नाहीं, व वधूसही ती पाळीन अशी शपथ घ्यावी लागत नाहीं. आर्यसमाजांत हे हिंदुधर्मीतील वाक्य दोघांच्याही तोंडीं आहे. वरः—' हे वधु, तुझें अंतःकरण व आत्मा हे मीं माझ्या कर्मास अनुकूल असें धारण करितों. माझ्या चित्तास अनुकूल तुझें चित्त सदा असो. माझी वाणी तूं एकाग्रमनानें सेवन कर. परमात्मा तुला मजकारणें नियुक्त करो. ' वधुः—' हे प्रियवीर, स्वामिन्, आपलें हृदय व आत्मा मी माझ्या प्रियाचरणकर्मास्तव धारण करिते. माझ्या चित्तास आपलें चित्त सदा अनुकूल राहो. मी आपणास माझ्या वाणीनें जें कांहीं सांगेन तें आपण नेहमीं एकाग्रतेनें सेवन करावें. कारण आजपासून परमात्म्यानें ज्याप्रमाणें मला आपल्या स्वाधीन केलें, तसेंच आपणासही माझ्या स्वाधीन केलें आहे. ' याप्रमाणें या दोघांनीं वधूवरांस पाणिग्रहणांत तरी समान हक्क दिले आहेत. आर्यसमाजानें हा विधीही वेदाच्या आधारेंच रचला आहे कीं काय हें आम्हांस माहीत नाहीं; परंतु असला तर ठीकच, व नसला तर आर्यसमाजानेंही विधींत एक फार मोठी सुधारणा केली असें होतें. परंतु प्रार्थनासमाजाचा असा समजला जाणारा विधि पाहिला तर त्यांत केवळ मूर्तिपूजा गाळण्यापलीकडे इतर तत्वांचा विचारही केलेला दिसत नाहीं. जुन्या धर्मांत स्त्रियांस स्वातंत्र्यच नाहीं, मग कन्यादानाच्या जोडीस वधूच्या तोंडीं कांहीं प्रतिज्ञा नाहींत इतकेंच नाहीं, तर तिनें सप्तपदी संपेपर्यंत म्हणजे, ती नवऱ्याची कायदेशीर गुलाम होईपर्यंत मौन स्वीकारावें असा विधि आहे, तो ठीकच आहे. परंतु तोच विधि, आमच्या विचारांउलट त्यांत कांहीं नाहीं अशा समजानें आह्मी जशाचा तसा घेऊन वधूचें मौन कायम ठेविलें आहे. व त्याचप्रमाणें आमच्यांतही पुष्कळदां बापच वर ठरवितो व मुलीची संमति नांवाची असते. हेंच आह्मी मानतों काय ? नाहीं. तरीही ' नवऱ्याची आज्ञा पाळीन ' ही शपथ न घेणें ह्मणजे बायकांचा उद्दामपणा, व ' बायकोची आज्ञा पाळीन ' अशी नवऱ्यानें शपथ घेणें ह्मणजे निव्वळ भ्रष्टाकार, हे विचार आज समाजांतील लोकांतही आहेत ! आतां हिंदुधर्मांतील कन्यादानाचा विधि केवळ स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर घाव घालून त्यांस गुलामगिरीस जखडण्यासाठींच प्रचारांत आला आहे हें आह्मी दाखवितों. व यावरून ज्यांची त्याप्रमाणें खात्री होईल त्यांनीं ही चाल त्या क्षणापासून आपणांतून काढणें त्यांचें कर्तव्य आहे यांत शंका नाहीं.

आह्मी अजून वेदांचा अभ्यास केला नाहीं, यामुळें या विधीची उपपत्ति तेव्हां कशी झाली हें आह्मी सांगूं शकत नाहीं. परंतु त्या काळीं स्त्रियांस जास्त स्वातंत्र्य होतें असें जुने लोकही अभिमानानें ह्मणत आहेत. हें खरें असलें तर हा विधि केवळ विधि होता असें होतें; व जर हें खोटें असेल तरी आमचेंच ह्मणणें खरें होतें. परंतु वेदांच्याही डोक्यावर बसलेली जी मनुस्मृति तिचा आह्मी मुद्दाम् या विषयासाठीं अभ्यास केला आहे, व तिच्यावर केलेल्या टीकेंत म-

नूनें स्त्रियांस किती हलकें मानलें आहे, हें दाखविलें आहे. ( 'मनुस्मृतींत काय सांगितलें आहे' हा निबंध,–विविधज्ञानविस्तार, फेब्रुवारी व एप्रिल १९१०, या दोन अंकांत आला आहे. ) व त्याच स्मृतीच्या आधारें कन्यादानास हल्लींचें जुलमी स्वरूप कसें दिलें आहे हें आह्मी दाखवीत आहों. जेव्हां जातिभेदाचें प्रस्थ अतिशय माजलें, ( व मनुस्मृतीचा पाया जातिभेदच आहे ) तेव्हां खालच्या जातीच्या पुरुषानें वरच्या जातीची स्त्री करणें वरच्या जातीस अपमान वाटूं लागला; पुढें या अपमानास भ्रष्टाकाराचें रूप आलें, व वर्णसंकर ह्मणजे घोर पाप झालें. मनुस्मृतींत या वर्णसंकराचें राक्षसाप्रमाणें भयंकर वर्णन केलें आहे. त्यांतल्या त्यांत शूद्रानें वरची स्त्री करणें ह्मणजे अति घोर पाप, व त्यांची प्रजा एकदम जातिबाह्य व चांडाळ होते. पण स्त्रियांस स्वयंवराचा हक्क ठेवून हा वर्णसंकर पुरा बंद कसा पडणार ? ह्मणून त्यांचा तो हक्क काढून बापाकडे दिला; व त्यानें तो बजाविला तर स्वर्गप्राप्तीची दक्षिणा, व न बजाविला तर नरकप्राप्तीची दहशत त्यास दिली गेली. पण इतक्यानें संपलें नाहीं. ज्ञानी मनुष्यास ताब्यांत ठेवणें अशक्य, म्हणून बापांनीं अर्ज दिला, व मनूनें त्यांचें शिक्षण बंद करण्यास हुकूम देऊन 'त्यांस वेदाचा अधिकार नाहीं, कारण त्या जन्मतः शूद्र, इतकेंच नाहीं, तर स्वभावतःच दुष्ट, दुर्गुणी, व्यभिचारी असतात,' ही त्यांची पूजा झाली ! तरी काय स्त्रिया हेकेखोर हो ! अजून त्यांचें पारडें वरच ! त्या इतक्या धूर्त असतात कीं, त्यांस अक्षरशत्रु केलें तरी केवळ ऐकून ऐकूनही त्या जास्त शहाण्या होऊन पुरुषांस डोईजड होतील. तेव्हां त्यांच्या स्वातंत्र्याच्या मुळावरच कुऱ्हाड मारली पाहिजे; व ही कुऱ्हाड ह्मणजे त्यांस समजूं लागण्यापूर्वींच ( ऋतुप्राप्तीच्या पूर्वीं न करतां आलें तर त्यानंतर तीन वर्षांत केलेंच पाहिजे. ) बापानें त्यांचें लग्न केलें पाहिजे ही अट होय ! व जर वरील मुदतींत तें न केलें तर दर महिन्यास त्यास एका मुलास मारल्याचें पाप सांगितलें आहे; जणूं काय बायकांस दर महिन्यास मूल होतें ! तरी अजून संपलें नाहींच ! कदाचित् एखादा गाढव बाप आपला हा एवढा मोठा हक्क सोडून, मुलीच्या प्रेमपाशांत गुंतून एवढा मोठा व्यूह ढासळून टाकील ह्मणून, उंदरास आमिष दाखविण्याप्रमाणें त्या मुदतीनंतर मुलीस स्वयंवराच्या हक्काचें आमिष दाखवून तिला या चौऱ्यांशीच्या फेऱ्यांत ओढण्याचा प्रयत्न केला आहे, व तिनें लग्न करणें ह्मणजेच इतिकर्तव्यता करणें, त्यावांचून तिला गतीच नाहीं, अशा गोष्टी जन्मापासून तिच्या कानींकपाळीं ओरडून ती आपणहून पिंजऱ्यांत यावी असें केलें आहे. रा. ब. वैद्य अबलोन्नति लेखांत ह्मणतात कीं, 'हा तिला स्वयंवराचा हक्क दिला हें योग्य आहे, कारण त्या वेळीं आपलें हिताहित कळण्याइतकी ती प्रौढ असते. ३–४ मुलें झालेली २०—२५ वर्षांची बायको जर या चामड्याच्या डोळ्यांस उघड उघड म्हातारी दिसते आहे, मग १४—१५ वर्षांची मुलगी प्रौढ खरीच ! आतां उलट वर्णसंकराची ज्या जातीस भीतीच नाहीं, त्या जातींत ह्मणजे शूद्रांत हा विधि नाहीं, यावरूनही या उपपत्तीस पुष्टि मिळत. त्याचप्रमाणें कन्या-

दानाचें जितकें बंड ब्राह्मणांत आहे, तितकें मराठ्यांत नाहीं, व मेश्री वैश्य या वैष्णव-वैश्यांतही हा विधि नाहीं हें वर दिलेंच आहे. फक्त पाणिग्रहाचा विधि सर्व देशांत व सर्व लोकांत सर्वांस सामान्य आहे. असो.

याप्रमाणें ज्या जातीच्या अभिमानास पेटल्यानें वरीलप्रमाणें खालीं खालीं पाऊल घ्यावें लागलें, तो जातिभेदही 'आह्मी हिंदु' ह्मटल्यानें अजून आह्मांस त्याच्या उलट वागण्याइतका अप्रिय झाला नाहीं. या प्रश्नाचा येथें उल्लेख करूनच पुरें केलें पाहिजे, कारण स्त्रियांसंबंधीं मुख्य विचार करणें आहे; ह्मणून पुनः कन्यादानाचा प्रश्न घेऊं. स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर जेव्हां वरील घाव घातला, तेव्हां तोच पुरुषांसही लागल्यानें किंवा त्याचें प्रायश्चित्त म्हणून ईश्वरानें केलेल्या घावानें ह्मणा, पण स्त्रियांचा सत्यानाश करण्याच्या यत्नांतच पुरुषांचाही सत्यानाश झाला आहे याचा विचार करा! आजपर्यंत हिंदुस्थानांत एकछत्री हिंदु साम्राज्य कधीं तरी होतें काय? नाहीं! कां? तर हिंदु लोकांस एकमेकांस गुलाम करणें, एकमेकांचे गळे कापणें, व दुसऱ्यांची गुलामगिरी करणें यापेक्षां जास्त कधीं कांहीं माहीत होतें असें इतिहास दाखवूं शकत नाहीं म्हणून! व याचें कारण सरळ नरकांतच नेणाऱ्या या रानटी चाली होत. यांमुळें हिंदुस्थान देश हजारों वर्षें नरकांत कुजत पडला आहे, व त्यांच्या कारणांकडे दृष्टि जाऊनही तीं एकजुटीनें एकदम नाहींशीं करणें सध्यां जवळ जवळ अशक्य झालें आहे. कां रा. ब. वैद्यांची कळकळ पार जिरून, एकेक योग्य सुधारणाही प्रस्तुत अशक्य ह्मणून दूर खेपेस त्यांस माघार घ्यावी लागली? तर लोकमत नाहीं म्हणून! याप्रमाणें हिंदु लोक या चालींस पायाखालीं तुडविण्याऐवजीं प्रत्यक्ष आपल्या बायकांपोरांस पायाखालीं तुडवीत असून, या चालींस संमति देणाऱ्या शास्त्रांस डोकीवर घेऊन नाचत आहेत! आज जर सर्व सुशिक्षित ह्मणविणारांस या चालींत सुधारणा पाहिजे असें वाटत आहे, मग सर्वांनीं एकदम सुधारणा केल्यास त्यांची निंदा करण्यास काय आकाशांतून निराळे लोक उतरतील? परंतु या लोकनिंदेचा रामाप्रमाणें विनाकारण मोठा बाऊ करून प्रत्येकास आपल्या मताविरुद्ध वागण्यांत लाज वाटत नाहीं, याचें कारण सुधारणेस अवश्य असलेली एकी नाहीं हें होय. व ही एकी कशी येईल? जीं दोन माणसें जन्मभर एक होण्यास बांधून घेतात, त्यांच्यांत जर, एकी करण्यास हिंदुलोक आरंभ करणार नाहींत; तर काय एकी सुमुहूर्तावर आकाशांतून पडणार आहे काय? जोंपर्यंत नवरा आपल्या बायकोस पायाखालीं तुडवील, तोंपर्यंत एकी व स्वातंत्र्य यांची बायकांस काय, पण पुरुषांस स्वप्नांतही कल्पना येणार नाहीं; तोंपर्यंत हिंदुस्थान देश खालावतच जाणार; तोंपर्यंत राष्ट्रीय सभांनीं देशांची उन्नति न होतां, राष्ट्रीय सभेच्याच चिंधड्या उडणार; व तोंपर्यंत प्रत्यक्ष तीस कोटी लोक देशाकरतां मरण्यास तयार झाले तरी देशाचें कवडीभरही हित होणार नाहीं, कारण दुसऱ्यास मारण्याचे आधीं एकमेकांच्या मानेवर सुऱ्या ठेवून सर्वजण मरतील!

हें केवळ चटकदार वर्णन नाहीं, तर हिंदुसमाजाची आजची खरी स्थिति आहे. डोळे उघडून विचार करा, ह्मणजे तुह्मांसही हेंच दिसेल. व साभाजिकांतील याचीच छाया हिंदुधर्माच्या पोकळ अभिमा-

च्यानें आली आहे, असें अजून तुह्मांस वाटत नाहीं काय? हिंदु लोकांच्या वर दिलेल्या 'स्त्रिया या स्वभावतःच व्यभिचारी' इत्यादि कल्पना आमच्या हिंदु व सामाजिक विद्वद्रत्नांच्या हाडीं कशा खिळलेल्या आहेत हें पहा. कन्यादानाचा विधि कां असावा? तर 'मग काय अजाण मुलींस स्वयंवराचा हक्क देऊन त्यांस त्यांचेंच नुकसान करूं द्यावें?' असें एकजण उत्तर देतात. यावरून कन्यादान गाळण्याची ल्हानशी सुधारणा लग्नाच्या वयांत सुधारणा करण्याची मोठी सुधारणा न करण्यानें अडकून राहते. पण हल्लीं जर मुलींचीं लग्नें त्या स्वातंत्र्यास योग्य होण्यापूर्वीं होत आहेत, मग मुलीच्या संमतीचें ढोंग कशाला हवें? जर तिला स्वातंत्र्य नाहीं ह्मणून कन्यादान करावयाचें, मग ती स्वातंत्र्यास योग्य नसल्या वेळची तिची संमति काय कामाची? यावरून कन्यादान गाळणें, स्वयंवर करणें व तेंही वधूवरांस समजूं लागून स्वातंत्र्यास योग्य झाल्यानंतर, या सुधारणा एकमेकांवर अवलंबून आहेत हें दिसतें. वरच्याच प्रश्नास दुसरें उत्तर देतात, 'लग्नासारख्या प्रसंगीं आपणांस कोणाचा तरी आधार असावा असें स्त्रियांस स्वाभाविकच वाटतें, व ह्मणून बापानें किंवा कोणी तरी कन्यादान केल्यानें त्यांस बरेंच वाटतें.' जर लग्नाच्या विधीच्या वेळीं आधार पाहिजे, मग सासरच्या जाचांतून सोडविण्यास कोणाची मदत तिला नको असते काय? पण त्यावेळीं जर खऱ्या बापासही तिचें दुःख काडीभर कमी करतां येत नाहीं, मग अनेक वेळां जो उपटसूळ कन्यादाता उभा करतात तो काय करील! हिंदुधर्माप्रमाणें कन्यादानानें मुलीवरील बापाची सर्व सत्ता जाऊन नवऱ्याची पूर्ण सत्ता येते. मनु ह्मणतो, 'विवाहसमयीं जें तिचें दान केलें जातें तेंच पतीच्या स्वामित्वाचें कारण होय.' (अ. ५, श्लो. १५२) आतां स्त्रियांच्या स्वभावासच तें आवडतें ह्मणणें ह्मणजे गुलामांस गुलामगिरीच आवडते, कारण ते पूर्ण स्वतंत्रता मागत नाहींत, याप्रमाणेंच निरर्थक आहे; याचा वर एकदां उल्लेख आलाच आहे. जर स्त्रियांस आपल्या पायावर उभें राहतां आल्यास त्या डोईजड होतील, ह्मणून त्यांचे पायच तोडले आहेत, मग त्यांनीं दुसऱ्यावर अवलंबून न राहावें तर काय करावें? बालविवाहासही स्त्रिया ज्या मदत करितात, त्याचें कारणही हेंच आहे जर त्यांस लग्नाशिवाय दुसरी कांहीं गोष्टच माहीत नाहीं, जर लग्नाशिवाय त्यांस गत्यंतरच नाहीं, मग त्यांच्या मनांत विशेषतः आपल्या मुलीस साधारण बरेंसें स्थळ केव्हां मिळेल हेच विचार नेहमीं यावेत यांत आश्चर्य काय? पण ही त्यांची स्वाभाविक स्थिति नाहीं, तर अस्वाभाविक स्थितींत वाढवून, अस्वाभाविक विचार त्यांच्यावर लादल्यामुळें त्यांची ही स्थिति झाली आहे. त्याच प्रश्नास तिसरें पुढील कारण देतात. 'जर आजपर्यंत वधु आपल्या बापावर किंवा पालकावर अवलंबून होती, मग त्यानें तिचें कन्यादान कां करूं नये?' ह्मणजे तिच्याबद्दल बापानें आजपर्यंत खर्च केला ह्मणून तिचें व्यक्तिस्वातंत्र्य गेलें. व हें जर कबूल केलें तर याच्याच पुढची पायरी ह्मणजे कांचनभटाप्रमाणें तिच्याबद्दल केलेला खर्च सव्याज परत देणाऱ्यास तिला देण्याचाही त्यास हक्क येतो. आणखी चवथें पुढील कारण देतात. 'जर कोणी तिचा पालक ह्मणून विधींत उभा न करावा मग आजपर्यंत तिचें वर्तन शुद्ध होतें, या

बद्दल खात्री कोण देणार? ' ह म्हणणें म्हणज स्त्रिया जात्या व्यभिचारी व म्हणून स्वतंत्रतेस अयोग्य, तेव्हां आजपर्यंत त्यांच्या वर्तनावर ज्यानें नजर ठेविली त्यास कन्यादानाचा हक्क येतो असें म्हणणें आहे. आणि हा आक्षेप इतर आक्षेपांपेक्षां जास्त वेळां काढण्यांत येतां, ही त्यांतल्या त्यांत जास्त दुःखाची गोष्ट आहे. पुरुषानें एकटें राहून, घरीं वेश्या ठेवली तरी तो प्रतिष्ठित म्हणून मिरवून पुनः कांहीं दिवसांनीं लग्न करण्यास निघाला, तरी ती गोष्ट पुढें येत नाहीं. पण निराधार असतां स्वतःच्या कष्टानें निर्वाह करून कोणी स्त्री स्वतंत्र राहिली कीं लगेच पुरुषांचें नाक मुरडतें. स्त्रियांसंबंधांच्या कोणत्याही प्रश्नाचा विचार पुरुष करूं लागले कीं त्यांच्या नीतीची, पातिव्रत्याची केवळ त्यांस शंका येते इतकेंच नाहीं, तर त्या जन्मतःच व्यभिचारी व विषयलंपट हें महातत्त्व गृहीत घेतल्याशिवाय त्यांस पुढें एकही विचार सुचत नाहीं. बालविवाह बंद केले तर बिनवारशी पोरें जास्त होतील कीं कमी हा महत्त्वाचा विचार अबलोन्नति लेखमालेंत आलाच आहे. मुलींवर जास्त नजर ठेवण्यास मनूप्रमाणें त्यांनींही वडिलांस सुचाविलें आहे; पण मुलगा दिवसभर काय धंदे करितो याचाही बापानें तपास ठेवावा, हें सुचविण्याचें त्यांस सुचलें नाहीं. परंतु प्रत्येक व्यभिचारी स्त्रीस व्यभिचार करण्यास लावणारा नराधम मांग असतो हा विचार या विद्वत्तेची प्रौढी मिरविणारांस सुचूं नये ना! बालहत्येच्या गुन्ह्यांत मुलाची आई सांपडते, पण बापाचा कधीं पत्ता लागतो काय? कसा लागेल; कारण बाप पुनः लोकांमध्यें प्रतिष्ठित म्हणून मिरवीत असतो! आम्ही म्हणतों, संख्येच्या मानानें व्यभिचारी स्त्रिया थोड्या असतात, वेश्यांची संख्या फार थोडी असते, पण व्यभिचारी पुरुषांची संख्या निदान त्यांच्या दसपटीनें आहे! असें असून स्त्रियांविषयीं या क्षुद्र कल्पना! हल्लीं आगगाडीच्या डब्यांत असलेली गाडीं थांबवण्याची साखळी पुरुषांच्या व्यभिचारानें त्यांचीच कायमची बेअब्रू करणारी खूण झाली नाहीं काय?

हा सर्व आमच्या मनावरील परिणाम ' आम्ही हिंदुधर्मी ' हें घोकण्याचा आहे, हें आतां तरी स्पष्ट झालें असेल असें वाटतें. पण स्वर्गास जाण्यास निघून पुनः नरकांतच परत येऊन पडलों आहों, यांचीही इतके दिवस सामाजिकांस दाद नाहीं. पण सुधारणा घोकत पूर्वींच्याच चालींस सुधारणा म्हणून स्वीकारल्यानें ही स्थिति झाली आहे! मग अजून तरी ही कल्पना आम्ही तावडतोब सोडूं नये काय? अजून तरी या चाली पायाखालीं तुडविण्याचा आम्ही निश्चय करूं नये काय? आमचें आजपर्यंतचें स्त्रियांसंबंधीं वर्तन अगदीं जुन्या लोकांप्रमाणें आहे ह जितकें खरें आहे, तितकेंच आम्ही त्यांतील एकही गोष्ट मानीत नाहीं हें खरें आहे. प्रार्थनासमाज स्त्रियांसंबंधीं काय मानतो, याचा लेखी पुरावा मिस् कॉबाईच्या पुस्तकाचें रा. कोरगांवकर व रा. पंडित या समाजाच्या सभासदांनीं केलेलें भाषांतर 'स्त्रियांचीं कर्तव्यें' आहे हें पुस्तक प्रसिद्ध होऊन १४ वर्षें झालीं. पण त्यांत कोणत्या तत्त्वांची चर्चा केली आहे, व आम्ही वागतों कसें, इकडे लिहिणारांचें व वाचणारांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. कित्येकांस त्यांत सत्यनिष्ठेवरच विशेष जोर आहे असें वाटतें. परंतु हल्लीं इंग्ले-

ढांत राजकीय हक्कांसाठीं खटपट करणाऱ्या ज्या बायका आहेत, ज्यांस सफ्रेजेट म्हणतात, त्यांपैकींच 'मिस कॉबबाई त्यांच्या काळीं एक प्रमुख होत्या, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. सत्यनिष्ठेच्या आदितत्वाचा स्त्रियांस उपदेश करण्यास त्यांनीं पुस्तक लिहिण्याची गरज नव्हती. पण त्यांत त्यांनीं स्त्रियांचीं विशेष व उदात्त म्हणून जीं कर्तव्यें सांगितलीं आहेत, त्यांसाठीं त्यांनीं ते श्रम घेतले, व त्यांचा आम्हीं विचार केला पाहिजे. त्यांतून उतारे देऊन हा लेख वाढविण्याची आम्हांस गरज दिसत नाहीं. त्यांनीं त्यांत पुढील कर्तव्यें मुख्य म्हणून सांगितलीं आहेत ( १ ) मनुष्य या नात्यानें ईश्वरासंबंधीं कर्तव्य; या कर्तव्याच्या आड इतर कोणतेंही कर्तव्य आलें तर तें सोडून हेंच केलें पाहिजे. ( २ ) दुसरें कर्तव्य आईबापांची सेवा; या कर्तव्यांत गुंतलें असल्यास, वडिलांच्या जवळ राहून त्यांची सेवा करण्याची जरूरी असल्यास, मुलीनें लग्न वाटेल तितकीं वर्षें पुढें ढकलणें हें तिचें कर्तव्य आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. व यानंतर ( लग्न केलें असल्यास ) पतीसंबंधीं व इतर कर्तव्यें सांगितलीं आहेत. त्याच पुस्तकांत त्यांनीं लग्नविधींत नवऱ्याची आज्ञा पाळीन अशी शपथ बायकोस घेण्यास लावणें हा अन्याय कसा आहे, याचीही चर्चा केली आहे. हें पुस्तक सर्व सभासदांनीं 'उत्तम, उत्तम,' म्हटलेलें आहे. परंतु गेल्या वर्षी सफ्रेजेट बायांविषयीं आमच्याकडील स्त्रियांस माहिती सांगतांच बिचाऱ्या अज्ञ स्त्रिया घाबरून 'या पुरुषांविरुद्ध बंड करण्याच्या गोष्टी आम्हांस सांगूं नका,' असें म्हणाल्या; व एका सफ्रेजेट बाईनें लग्नाच्या वेळीं 'मी नवऱ्याचा आदर ठेवीन' इतकेंच म्हणून, आज्ञा पाळण्याची शपथ घेण्याचें नाकारलें, ही गोष्ट वाचून प्रार्थनासमाजाचे सभासद पुरुष तिची थट्टा करूं लागले! स्त्रियांच्या जोड्यांचीही ज्या कित्येक पुरुषांस सर नाहीं, त्याचा त्यांनीं होऊन आदर ठेवला तरी तेवढा हल्लीं पुरुषांस पुरेसा वाटत नाहीं; मग काय त्या आपला जोडा काढून पुरुषांच्या थोबाडांत मारतील, तेव्हां ते त्यांच्या अन्यायांचा विचार करणार काय? शहाणपणाचा टेंभा मिरविणारे पुरुष यासंबंधीं मुख्य गोष्ट विसरतात ती ही कीं, सरसकट सर्व नवऱ्यांच्या हाताखालीं बायकांनीं असावें या नियमानें जरी थोडेसे शहाणे लोक आपल्या बायकांस जाच करीत नसले तरी मूर्ख व हलकट नवऱ्यांस आपल्या बायकांवर सत्ता चालविण्याचा आपला हक्क आहे असें वाटत असतें, व म्हणून त्यांस दिवसभर इतरांकडून जो त्रास होतो त्याचें उट्टें ते घरीं बायकांवर काढतात. कित्येक म्हणतील कीं, हा जाच फक्त विधि बदलल्यानें कसा कमी होईल? पण ज्याप्रमाणें आर्धीच्या कल्पनांप्रमाणें विधि ठरतात, त्याचप्रमाणें पुढें विधींचाही मनावर थोडा परिणाम होत असतो; म्हणून विधि बदलला पाहिजे, व त्याबरोबरच स्त्रियांसंबंधीं कल्पनाही बदलल्या पाहिजेत. विलायतेंत स्त्रियांस शिक्षणानें आपल्या हक्कांची जागृति होऊन, ते नुसते मागून मिळत नाहींत तर 'प्राण खर्ची घालूं, पण हक्क मिळवूं तेव्हांच राहूं' अशी ज्यांनीं प्रतिज्ञा केली आहे, ज्यांस उदारमतवादी पक्ष अन्यायानें वागवीत आहे तरी तिकडे लक्ष न देतां ज्या शेक-

ज्यांनीं आपण होऊन कष्टाचा तुरुंगवास भोगीत आहेत, ज्याच्यांत मिस् कॉब, मिस मेरी कार्पेंटर यांच्यासारख्या शेंकडों नामांकित बायकांनीं या कार्यास आपलें सर्व आयुष्य वाहिलें आहे, त्यांची किंमत जर अजून सुधारणेच्या शिखराची प्रौढी मिरविणाऱ्या इंग्लंडांत होत नाहीं, तर दुसऱ्यांस गुलाम करून स्वतः गुलामगिरींत आनंद मानणाऱ्या हिंदुस्थानच्या लोकांस ती काय कळणार? पालींस पाहून विंचवाची नांगी पडते, त्याप्रमाणें बायकांवर अंमल चालविणारे आमचे पुरुष रस्त्यांतील पोलिस किंवा इतर साहेब पाहून जर गर्भगाळित हो-तात, तर तुरुंगवास पतकरण्यास किती धैर्य व **स्वकर्तव्यनिष्ठा** लागते याची त्यांस काय कल्पना येणार! खरोखर, त्यांच्या एकेक गोष्टी वाचून आह्मी स्वतः घाबरून गेलों! एकच उदाहरण देतों. एका खेड्यांत एक पाऊणशें वर्षांची अनाथ विधवा बाई एक लहानशी खाणावळ घालून होती; तिचें उत्पन्न जेमतेम तिचा खर्च व कर यांस पुरें इतकेंच असे, व अशा रीतीनें तिनें दहाच्यावर वर्षें काढलीं; पुढें एका महिन्यांत गिऱ्हाईक नसल्यानें उत्पन्न कमी झालें, व त्या महिन्यास कर देतां आला नाहीं, ह्मणून तिच्यावर खटला झाला, व तिला कायद्याप्रमाणें तुरुंगवासाची शिक्षा झाली, व तिनें तो मुकाट्यानें सोसला! अशा उदाहरणांनीं तिकडच्या बायकांस चीड येऊन, 'जर कर देण्यांत व तुरुंग-वास भोगण्यांत अबला व पुरुष यांत फरक नाहीं, मग पार्लमेंटचे सभासद निवड-ण्यांतच आह्मी कां अबला रहावें' असें ह्मणून, 'आह्मी अबला नाहीं, सबला आहोंत,' हें त्यांनीं सिद्ध केलें आहे, व आतां आपले हक्क स्वकष्टानें मिळविल्याशिवाय त्या स्वस्थ राहणार नाहींत. पण हिंदु-स्थानच्या पुरुषांनीं बांगड्या भरून, घर-कोंडे होऊन, आपल्या बायकांपोरांवर जु-लूम करण्यांतच आपली शक्ति खर्च-ल्यानें, त्यांस या चळवळीपासून कांहींही जागृति होत नाहीं. अजून आमच्याकडील पुरुषांस इंग्लंडांतील बायकांच्या नीतीची व त्यांच्या घटस्फोटाच्या कायद्याची चेष्टा करण्यांतच भूषण वाटत आहे! ही तिकडील चळवळ शिक्षणामुळें उत्पन्न झाली आहे, व त्याप्रमाणेंच इकडेही पुरु-षांनीं आपण होऊन स्त्रियांस हक्क न दिले तर ते सक्तीनें आज मिळविणें स्त्रियांस शक्य आहे. तिकडे राजकीय हक्कांसाठीं त्यांस इतका त्रास पडत आहे, पण तो प्रश्न इकडे उपस्थित होण्यापूर्वींच, ह्मणजे पुरुषांस राजकीय हक्क मिळण्या-पूर्वींच स्त्रियांनीं बरोबरीचे सामाजिक हक्क मिळविले ह्मणजे पुढें तेही आपो-आपच मिळतील. याचें एक उदाहरण युनिव्हर्सिटीच्या पदव्यांच्या हक्काचें आहे. इंग्लंडांतील स्त्रियांस या हक्कासाठींही मुद्दाम खटपट करावी लागली, पण इकडे पहि-ल्यापासून सर्व नियम दोघांस लागू झाले. ह्मणून हल्लीं इकडच्या स्त्रियांनीं सामाजिक हक्कांसाठीं खटपट केली पाहिजे, व आजपर्यंत त्यांनां ज्याप्रमाणें अनेक दागिने मिळविले आहेत, त्याचप्रमाणें आतां या खऱ्या दागिन्यांसाठीं त्यांनीं रोज दुप्पट ओरड केली तर तेही त्यांस लवकरच मिळणें शक्य व इष्ट आहे.

ब्राह्म व प्रार्थनासमाजी बंधूहो! आतांप-र्यंतचें हें चऱ्हाट (हें जितकें वळावें तेवढें लांबतच जातें ह्मणून चऱ्हाट) आपणांस

जरी फार कटु वाटेल, तरी पुढले दोन शब्द ऐकून आपला राग जाईल यांत शंका नाहीं. अल्पमति, अल्पशक्ति असतांही आह्मी हा लहान तोंडीं मोठा घास घेत आहों असें अजून आह्मांस वाटेल; पण हा सुधारणेचा मोठा घास तुह्मांस गिळवत नाहीं, ह्मणून तो आपणांपुढें ठेविला आहे. पूर्वी मधून मधून या विचारांनीं आमचें मन इतकें भरून जाई कीं, आह्मांस मुद्दाम एकांतांत जाऊन अश्रु ढाळून मनावरील दडपण कमी करावें लागे. परंतु पुढें हा ईश्वराचा निरोप दाबून ठेवणें पाप आहे असें वाटूं लागल्यापासून केवळ रडूनही आमचें मन शांत होईना, ह्मणून समाजाच्या उन्नतीविषयींचे आमचे सर्व विचार, अंतःकरण मोकळें करण्यासाठीं ओकून टाकले आहेत. प्रार्थनासमाजापेक्षां आह्मांस कांहींही जास्त प्रिय नसतांही आह्मी जी सामाजिकांची निंदा केली आहे, तिला तसेंच सबळ कारण आहे. आपले सर्व दोष एकदम उघडे केले यावरून रागावूं नका; कारण सध्यां आह्मी आपली सुधारणा न केली तर आमचा तर नाश होईलच, पण ईश्वराचे कार्यास कमीपणा येईल, ही जबाबदारी लक्षांत आणा! आपलेच दांत, व आपलेच ओठ ह्मणून किती दिवस आह्मी दोषांवर पांघरुण घालणार? ज्याप्रमाणें शरीरांत पू होऊन त्यास बाहेर न काढण्यानें प्राणावरच बेतते, त्याप्रमाणें आज सभोंवार हिंदुधर्माची मृतवत् स्थिति झालेली पाहूनही आमचीही उद्यां तीच स्थिति होण्याची आह्मी वाट पहावी काय? यापेक्षां एकदां सर्व दोष उघडे करून त्यांस काडून लावणें आमचें कर्तव्य नाहीं काय? बंधुहो, एकदां त्यांच्याविषयीं आपणा सर्वांच्या अंतःकरणांत त्वेषाचा अग्नि पेटूं द्या, व त्यांत या महादोषांची होळी होऊं द्या; तरच आपल्या उद्धाराची आशा आहे. याच होळींत आमच्या सद्गुणांचें तेज सोन्याप्रमाणें जास्त वाढेल! याप्रमाणें या दोषांची होळी होण्यासाठीं आह्मी ही दोषांवर आग पाखडली आहे, तर त्यांची होळी होऊं द्या, ह्मणजे आपणांस आपल्या उच्च तत्वांप्रमाणें वागणें सोपें होईल. कित्येकांस या शब्दांत विष भरलें आहे असें वाटेल, पण ईश्वराचें नाव घेऊन सत्यानें, न्यायानें व दयेनें वागा, ह्मणजे आपणांस हालाहल विषानेंही कांहीं होणार नाहीं! सारांश, या स्पष्ट शब्दांनीं रागावूं नका, तर विचार करा.

विचार करा, आज ४३ वर्षांत समाजाचें पाऊल पुढें पडलें आहे कीं मागें? दर वर्षी आह्मी उत्सव करितों, व प्रत्येक वर्षी आमची उन्नति झाली नाहीं इतकें आह्मी कबूल करतों; मग अवनति झाली असें एकदां स्पष्ट कां ह्मणूं नये? 'तत्वें उत्तम असतां प्रसार कां होत नाहीं' या प्रश्नास आपणांस योग्य उत्तर न सांपडल्यानें, 'हें ईश्वराचें कार्य आहे, तेव्हां त्यालाच याची काळजी आहे' इतकें म्हणून आम्हांस स्वस्थ बसणें भाग पडतें. पण एकदां आपली चूक कबूल करून उलट बाजूनें विचार केला तर हें कोडें सुटतें. प्रसार होत नाहीं, तेव्हां आम्हांमध्यें भोंवतालच्या लोकांपेक्षां जास्त कांहींच नाहीं काय? असें जर आत्मपरीक्षण केलें तर कबूल करावें लागतें कीं, 'कांहीं जास्त नाहीं!' समाजाचें नांव काढलें कीं जुने लोक 'तुमच्यांत येऊन आमची स्थिति जास्त काय सुधारणार?' असा पहिला प्रश्न करतात, व आम्हांस गप बसावें लागतें! ज्या सामाजिक चाली आम्ही मानीत नाहीं, व जुन्या लोकांसही आतां नकोशा झाल्या

आहेत, त्याचप्रमाणें जर आम्ही वागत आहों, तर आमची उन्नति होण्याऐवजीं, बोलके सुधारक अशी आमची थट्टा झाल्यास काय नवल ? आमचीं धर्मतत्वें त्यांच्याही शास्त्रांत लिहिलेलीं आहेत, मग ते तेवढयासाठीं समाजांत कशाला येतील ? म्हणून आम्ही पुनः म्हणतों कीं, सुरुवातीस अहंकार शिरल्यानें आम्ही 'हिंदु' म्हणून केवळ ब्राम्ह नांव टाकून दिलें, इतकेंच नाहीं तर आम्ही सुधारलेले हिंदु हेंही विसरलों. ज्याप्रमाणें आमचीं धर्मतत्वें हिंदुधर्माच्या उच्च स्वरूपांतून घेतलीं आहेत, त्याचप्रमाणें सामाजिक चालीही त्याच तत्वांस योग्य अशा, हिंदु धर्मांतील उच्च स्वरूपांतून किंवा आणखी कोठून तरी आम्हीं घेतल्या पाहिजे होत्या. आम्ही प्रार्थनासमाजी हें नांव घेऊन, आमच्या मतांप्रमाणें अमुक रीति पाळल्याच पाहिजेत इतका नियम पाहिजे होता. पण सुरुवातीस आम्हीं नक्की चाली अशा कोणच्याच ठरविल्या नाहींत; आमच्या संस्कारांच्या विधींचें पुस्तक अजून तयार होत आहे ! यामुळें एकेकांनीं एकेक जुनी चाल समाजांत आणिली. आमचा मूर्तिपूजेवांचूनचा लग्नविधीही कित्येकांस चांगला वाटत नाहीं, व त्याच्या बदलीं जुनाच हवासा वाटतो ! हेंच जर सुरुवातीला आमच्या मतांप्रमाणें आमच्या चाली व विधि ठरले असते, तर त्यांप्रमाणें वागणारेच लोक समाजांत आले असते, व त्यामुळें हल्लींप्रमाणें खोगीरभरती न होतां, खऱ्या कळकळीनें, व खऱ्या जोमानें कार्य झालें नसतें काय ! होय. व सध्यां समाजसुधारणा करणें म्हणजे त्याच गोष्टी लवकर करणें आहे. अजून जरी आम्ही अहंकार टाकून, आमच्या उच्च तत्वांस शोभणाऱ्याच चाली प्रार्थनासमाजात सुरू करण्याचा आग्रह धरूं तर समाजाचा प्रसार कांहीं कठीण नाहीं. ज्या चालींनीं आम्हीच काय, पण सर्व हिंदुस्थान देश रसातळास पोंचला आहे, त्या चालीरीति सोडून त्यांऐवजीं ज्या सुधारणा अवश्य आहेत त्याच सुधारणा करण्यास अजून आमची तयारी नसावी काय ? हें ईश्वराचें पवित्र कार्य त्यानें आमच्या हातीं दिलें असतांही कर्तव्यास न जागतां, या आणीबाणीच्या वेळीं माघार घेणें आह्मांस शोभेल काय ? काय गरज आह्मांस माघार घेण्याची ? काय ईश्वर आम्हांस यावेळीं त्याच्या कार्यासाठीं बुद्धि व शक्ति देणार नाहीं ? बंधुहो, अशी एक क्षणभरही शंका घेऊं नका, तर फक्त मतांप्रमाणें आचरण करूं लागा. ज्या सामाजिक सुधारणा पाहिजे आहेत, त्यांचा एकदां लेखी ठराव करून केवळ त्याप्रमाणें १० वर्षे वागल्यास, गेल्या शतकांत झाला नाहीं इतका सुधारणेचा प्रसार ताबडतोब होईल. **कुटुंबसुधारणा हाच सर्व सुधारणेचा पाया आहे.** कुटुंबांतील सर्व व्यक्ति स्वतंत्र असल्याशिवाय एकही व्यक्ति स्वतंत्र असूं शकत नाहीं व कुटुंबांतील सर्व व्यक्ति स्वतंत्र असल्यांशिवाय कुटुंबांत ऐक्यही असूं शकत नाहीं. जुलुमी धनी व गुलाम यांचें ऐक्य कसें होईल ? ऐक्य **प्रेमानें उत्पन्न होतें, व प्रेम एकमेकांच्या हक्कांचा एकमेकांनीं मान ठेवल्यानेंच उत्पन्न होतें.** म्हणून आम्ही आजपासून आमच्या स्त्रियांस पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे; त्यांच्या हक्कांच्या, त्यांच्या सुखाच्या, त्यांच्या उन्नतीच्या आड आम्ही कधींही येतां कामा नये. त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचा मान ठेवावयाचा म्हटल्यास आम्ही

त्यांच्या सुखासाठीं प्राणही खर्ची घातले पाहिजेत, यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं. पहा, जितकें आम्ही त्यांस आजपर्यंत छळलें, तितकी त्यांची सहनशीलता जास्ती वाढूं लागली; जितका आम्ही जास्त जुलूम केला, तितकी त्यांनीं स्वतःस विसरून आमची सेवा केली आहे, व आमच्या सुखासाठीं आज हजारों वर्षे त्यांनीं आपले प्राण खर्ची घातले आहेत ! अजून तरी आमच्या स्वतःच्या हितासाठीं आम्ही त्यांची योग्यता ओळखून त्यांचा मान ठेवण्यास शिकूं काय ? शिकलेंच पाहिजे यांत शंका नाहीं. वाल्या कोळ्याच्या पापांनीं भरलेल्या रांजणांप्रमाणें आजपर्यंतच्या पुरुषांच्या अन्यायांनीं व जुलुमांनीं भरलेल्या रांजणांच्या ओळी पाहून रडूं येणार नाहीं असा कोण पुरुष असेल ? पण इतक्यानें निराश होऊं नका. वाल्या कोळ्याचाच वाल्मिकी ऋषी होणें शक्य आहे. त्यानेंही स्त्रियांची खरी योग्यता कशी ओळखली तें पहा, व त्याप्रमाणें वागा. खालील सुधारणा अगदीं आजपासून करणें अवश्य व शक्य आहे.

( १ ) प्रार्थनासमाजास वारशासंबंधीं हिंदु लॉ मान्य नाहीं. ( त्या कायद्यांऐवजीं आम्हांस कोणते कायदे लागू करतां येतील हें पहाणें, ही कायदेपंडितांच्या अधिकारांतलि गोष्ट आहे. )

( २ ) प्रार्थनासमाजाचा एक लग्नविधि ठरविला पाहिजे, व त्याप्रमाणें प्रत्येक सभासदाच्या कुटुंबांतलि लग्नें झालीं पाहिजेत. वधूचें वय २० चें व वराचें २५ चे खालीं असूं नये असा नियम असावा. कन्यादानाचा विधि काढून वधूवरांच्या आईबापांची संमति असावी, व पाणिग्रहणांत वधूवरांच्या शपथा समान असाव्यात.

( ३ ) याच विधीनें विधवांचे पुनर्विवाह व्हावेत. ( असें नमूद करण्यानें विधवाविवाह मान्य आहे, यास लेखी आधार होईल. )

( ४ ) वधूवरांपैकीं कोणी व्यभिचारी निघाल्यास घटस्फोट करण्यास समाजाच्य मतांप्रमाणें हरकत नसावी.

( ५ ) प्रार्थनासमाजाचे मतांप्रमाणें एका वेळीं एकच पति किंवा पत्नी होऊं शकते.

या इतक्या सुधारणा एकदम कशा होतील ही शंकाही मनांत आणूं नका; कारण, या फक्त स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे आड येणाऱ्या हरकती काढण्यास अवश्य तेवढ्याच सुचविल्या आहेत. या सर्व परस्परावलंबी, ह्मणजे एक केली तर दुसरी केलीच पाहिजे अशा आहेत, व या एका सभेंत सर्वानुमतें पास होण्यासारख्या आहेत हल्लींच्या चळवळींच्या दिवसांत सर्व देशास योग्य वळण लावण्याची जबाबदारी ब्राह्म व प्रार्थनासमाजांवर आहे असें आह्मी ह्मणतों, व यासाठीं आधीं आमची उन्नति करणें अत्यंत अवश्य आहे. असो. आतां आपली नम्रपणें रजा घेऊन, हिंदु लोकांस दोन शब्द सुचविण्याकडे वळतों. पण या सूचनांप्रमाणें आपण वागल्याशिवाय इतर लोक कितपत वागतील ?

## प्रकरण २.

—:*:—

### हिंदुधर्माभिमान्यांस इषारा.

" बुडत हें जन न देखवे डोळां ।
ह्मणोनि कळवळा येत असे ॥ "

प्रिय हिंदुधर्मी बंधुहो, आपणांस आह्मी अधिकारानें कांहीं सांगावें अशी गोष्ट नाहीं. तरीही आमच्या देशाची लवकर सुधारणा होण्यास पायाभूत अशी कुटुंबसुधारणा व सामाजिक सुधारणा त्याहूनही लवकर झाली पाहिजे हें लक्षांत घेऊन आह्मांस जे कांहीं दोन विचार सुचले ते कळकळीनें आपणांस त्या मुद्यांवर जास्त विचार करण्यासाठीं सुचवीत आहों. ते आपणांस पटले तर स्वतः त्याप्रमाणें वागून इतरांसही त्याच खऱ्या सुधारणेच्या मार्गास लावण्याविषयीं झटा, इतकचि विनंति आहे.

हिंदुधर्माची मुळींही निंदा न करतां आह्मी इतकें ह्मणूं शकतों कीं, आज हिंदुधर्मास अत्यंत निकृष्टावस्था आलेली आहे. अद्याप तो जेमतेम जीव धरून आहे, याचें कारण अजून त्यांतून **सर्व सत्यें निघून** गेलीं नाहींत, व त्यास त्यांनींच आज शेंकडों वर्षें जीवंत ठेविलें आहे. पण ही स्थिति किती दिवस चालणार याचा आतांच विचार करा. गेलीं कांहीं वर्षें ठिकठिकाणीं निरनिराळ्या बाजूंनीं हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न झाला, पण त्यास यश कां आलें नाहीं, याचा लवकर विचार करा. आज आमच्या देशाची इतकी अवनत स्थिति झाली आहे, व आमचें बळ व इतर सामर्थ्य इतकें मर्यादित झालें आहे कीं, त्यांपैकीं आतां कांहींही व्यर्थ दवडतां येत नाहीं. म्हणून सर्व प्रयत्न योग्य दिशेनेंच झाले पाहिजेत हें लक्षांत आणा. एका बाजूनें कांहीं वर्षे सुधारणा करून ती सफळ होत नाहीं म्हणून आणखी एका बाजूनें प्रयत्न करून पहावा, असें करण्यानें कधीं काळीं सुधारणा होईल हें खरें; पण इतकीं वर्षें इतकी शक्ति व्यर्थ घालविण्यानें कदाचित् खरी सुधारणा होण्याचे आधींच आम्ही कर्जबाजारी व हतवीर्य होण्याची भीति आहे; म्हणून हल्लींच योग्य दिशा कोणती हा जास्त विचार केला पाहिजे. ही योग्य दिशा कोणती हा जास्त विचार केला पाहिजे. ही योग्य दिशा कोणती हें एकदम 'आम्ही सांगतों व तुम्ही ऐका,' असें आमचें ह्मणणें नाहीं; पण ही दिशा ठरविण्यास काय काय गोष्टींचा विचार केला पाहिजे इतकेंच आह्मी सुचवितों.

( १ ) पहिली ध्यानांत ठेवण्याची गोष्ट ह्मणजे **धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा बरोबरच झाल्या पाहिजेत,** कारण त्या निराळ्या होणें शक्य नाहीं. हेंच तत्व रा. ब. वैद्य यांनीं उदाहरणें देऊन पहिल्या लेखांत प्रतिपादिलें आहे; पण पुढें धर्मसुधारणा हळूहळू होईल, पण आधीं सामाजिक सुधारणा झाली पाहिजे, असेंही सांगण्यानें त्यावर पाणी पडलें आहे. ह्मणून येथें पुनः हेंच तत्व नीट समजेल असें स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणच्याही सामाजिक रीति घ्या, त्या त्या वेळच्या धर्मकल्पनांच्या आधारावर ठरविलेल्या असतात; धर्मकल्पनांत बदल झाला कीं तसाच बरा वाईट बदल समाजरीतींत होतोच. याप्रमाणें धर्म हा समाजाच्या चालींचा पाया आहे, व म्हणून धर्मसुधारणा हाच

सामाजिक सुधारणेचा एकच एक पाया आहे. धर्माची या जगांत काय गरज आहे? तर मानवी प्राण्याची उन्नति करणें. ज्या कल्पना व चालींनीं मनुष्यांची उन्नति होत असते तोच धर्म जीवंत म्हणावयाचा; व धर्माचा हा परिणाम बंद झाला कीं धर्म मेल्याप्रमाणें झाला. याचमुळें धर्माचा व संसाराचा अति निकट संबंध आहे. केवळ रानांत जाऊन, ध्यान करून, उच्च धर्मकल्पना मनांत आल्यानें उन्नति होत नाहीं; तर हें जें पोट सर्वांच्या मागें लागलें आहे त्यामुळें जेव्हां जगांत वागावें लागतें, त्यावेळीं त्या उच्च कल्पना आचरणांत आणल्या म्हणजे त्या कायम होतात, व ही उन्नति म्हणतां येते. याप्रमाणें कर्माच्या शेगडींतून निघाल्यानें ज्ञान शुद्ध व पक्कें होतें, व ज्ञानाच्या मदतीनें कर्मांत उन्नतिकारक फरक होत जातो. **धर्माप्रमाणें संसार करणें हाच धर्म.** हेंच तत्व हल्लींच्या स्थितींतील दोषांनीं जास्त स्पष्ट होईल. प्रार्थनासमाजानें धर्मसुधारणा केली, धर्माच्या उच्च तत्वांचा स्वीकार केला, व समाजसुधारणेचा पाया घालून कोणकोणच्या सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत हेंही मोघम ठरविलें. परंतु हीं तत्वें व या सुधारणा आचरणानें कायम न झाल्यानें या उदात्त धर्मकल्पनांवरील पूर्वींची निष्ठाही कमी झाली; त्यामुळेंच साताहिक उपासनेस येणें यांत सभासदांस कांहीं विशेष कर्तव्य किंवा स्वतःच्या फायद्याची गोष्ट असें वाटत नाहीं. म्हणून प्रार्थनासमाजाचें आज पहिलें कर्तव्य हें आहे कीं, पाया आहे तो पुनः एकदां दृढ करून त्यावर सामाजिक सुधारणेची इमारत तावडतोब उभारली पाहिजे. उलटपक्षीं धर्मसुधारणा न करितां सामाजिक सुधारणेच्या मागें श्रम करणारांसही तितकेंच यश आलें आहे, म्हणजे त्यांचे प्रयत्न व्यर्थ होत आहेत; पण 'चुकतें कोठें?' हें अजून त्यांनीं पाहिलें नाहीं. प्रार्थनासमाजानें पाया घालून घर बांधण्याची हयगय केली, म्हणून पाया वाहून जात आहे; पण, फक्त सामाजिक सुधारक हवेंत घर बांधूं पहात आहेत!

याप्रमाणें धर्मसुधारणा हा पाया आहे हें ठरल्यावर, ती काय हा प्रश्न येतो. याचें उत्तर धर्माच्या व्याख्येवरून उघड आहे. ज्या कल्पना व चालींमुळें हल्लीं मनुष्यांची उन्नति होत नाहीं, त्यांऐवजीं दुसऱ्या उन्नत कल्पना व चाली आणणें ही धर्मसुधारणा होय. केवळ पहिल्या चाली टाकून चालत नाहीं, व वाईट चाली टाका असा उपदेशही विशेष करावयास नको. कारण, अमुक गोष्टी करा असा आग्रह धरला म्हणजे बाकीच्या होतच नाहींत. हें एका उदाहरणानें जास्त स्पष्ट होईल. मूर्तिपूजेनें मनाची कांहींही उन्नति होणें शक्य नाहीं. वेदांत उच्च तत्वांच्या पूर्वीं जी सृष्टींतील प्रचंड शक्तींची उपासना दिसते, ती हल्लींच्या मूर्तिपूजेपेक्षां फार निराळी आहे. एखादी प्रचंड शक्ति पाहिली म्हणजे तिच्यापुढें नम्र होणें हा मनुष्यस्वभाव आहे. परंतु याप्रमाणें ज्या पूजेस सुरुवात झाली ती तेथेंच न थांबतां, निरनिराळ्या रूपानें दिसणाऱ्या शक्तींशिवाय, सर्वांचें आदिकारण अशीही एक शक्ति आहे हें मनुष्यानें लवकरच शोधून काढलें, व याप्रमाणें 'एको देवः सर्वभूतेषु गूढः । सर्वव्यापि सर्वभूतांतरात्मा ॥' हें ईश्वराचें स्वरूप कळण्यास फार वेळ लागला नाहीं. पण आतां मूर्तिपूजेची गोष्ट पहा. 'मूर्तींत जो देव आहे त्याची

उपासना आम्ही करितों,' असें किती जरी विद्वानांनीं सांगितलें तरी हल्लीं जी मूर्तिपूजा शेंकडों वर्षे चालू आहे ती दगड हाच देव असें मानून चालली आहे. हातांनीं घडलेल्या मूर्तीस कमीपणा येतो, म्हणून पुष्कळ ठिकाणच्या मूर्तीस स्वयंभू मानण्यांत येतें; पुष्कळ संतांच्या हातून मूर्तींनीं जेवण स्वीकारलें आहे अशा कथा आहेत; यावरून मूर्ति हाच देव ही कल्पना दिसते. मूर्तिपूजेच्या बाजूनें दुसरें कारण असें सांगण्यांत येतें कीं, अज्ञान लोकांस निराकार देवाची कल्पना एकदम येणें शक्य नाहीं, म्हणून मूर्तिपूजा ही पहिली पायरी होय. याची निरर्थकता अशा रीतीनें स्पष्ट दिसतें कीं, बहुतेक समजूतदार लोकांची मूर्तिपूजा मरेपर्यंत सुटत नाहीं; मग ते जन्मभर पहिल्याच पायरीवर होते काय ? इतकीं कथापुराणें ऐकून, इतर ज्ञान संपादून, ईश्वराचें रूप कसें आहे हें कळूनही ते मूर्तिपूजा कां सोडित नाहींत ? तर रूढी म्हणून ! पण मूर्तिपूजा ही ईश्वराकडे जाण्याची पहिली पायरीही नाहीं. कोणच्याही विषयाचें ज्ञान करून घेण्याची पहिली पायरी म्हणजे त्याच विषयांतील निदान एक गोष्ट समजणें होय. भूमितीस आरंभ बिंदूच्या व्याख्येपासून होतो. परंतु अज्ञान लोकांस बिंदूची व्याख्या तरी काय कळणार आहे, असें म्हणून फक्त त्यांस भूमितीचें पुस्तक रोज जवळ बाळगण्यास सांगावें, याप्रमाणें ईश्वराची कल्पना करूं इच्छिणारांच्या गळ्यांत मूर्तिपूजा बांधली आहे. वास्तविकपणें जर एकदम ईश्वराची कपल्ना येणें शक्य नाहीं, तर त्याच्या एकेक गुणाची कल्पना करण्यास शिकविणें ही त्याची सुरुवात होय. हीच सुरुवात वेदकाळच्या इंद्र, वायु, सूर्य, इत्यादि शक्तींच्या प्रार्थनेवरून दिसते; अनेक प्रचंड शक्ति या जगांत काम करीत आहेत हें आधीं वाटलें, व अशा रीतीनें सुरुवात होऊन सृष्टीच्या रचनेकडे जास्त लक्ष गेलें, व पुढें शक्तीच्या जोडीस सौंदर्य व चातुर्य दिसून आलें. परंतु जन्मभर मूर्तिपूजा करून दिवसेंदिवस जास्त काय कळतें ? मनुष्यानें देवाची पूजा केली पाहिजे, या कल्पनेपासून सुरुवात होते, व पुढें स्वतःस पूजा करण्यास वेळ झाला नाहीं तर घरीं कोणी तरी एकानें करावी, नाहीं तर भटाला चार आणे देऊन रोज एकदां घरीं येऊन मूर्ति धुवून ठेवण्यास सांगितलें ह्मणजे झालें, अशी अवनतीच होणार ! मूर्तिपूजेच्या बाजूनें तिसरें कारण असें देतात कीं, मूर्तिपूजा असो कीं मानसपूजा असो, प्रार्थनेंत मुख्य विश्वास असला पाहिजे, व ह्मणून विश्वासानें मूर्तिपूजा जरी केली तरी तिचा मनावर चांगला परिणाम होतो. हें कारण केवळ ती करणारे देतात असें नाहीं, तर प्रार्थनासमाजी लोकही 'मूर्तिपूजा हा ईश्वरोपासनेचा खरा मार्ग नव्हे' इतकेंच जें ह्मणतात त्याचें कारण असें कीं, विश्वासानें मूर्तिपूजा करणें पाप नाहीं, फक्त विश्वास नसतां मूर्तिपूजा करणें हें पाप आहे. परंतु मूर्तिपूजा चांगली कीं वाईट हा विचार करतांना विश्वासानें केलेली चांगली कीं ढोंगीपणानें केलेली चांगली हा प्रश्नच येत नाहीं. खरी मूर्तिपूजा विश्वासाशिवाय होतच नाहीं, व तिचा मनावर कांहीं उन्नतिकारक परिणाम होतो कीं नाहीं हा मुख्य मुद्दा आहे. विश्वासानें केलेल्या मूर्तिपूजेनें मनास समाधान असतें हें खरें; पण हें समाधान देवासंबंधीं आपलें कर्तव्य आपण केलें या समजुतीनें

येतें. मूर्तिपूजेनें मनाची उन्नति होऊन नीति बळकट होते, किंवा ईश्वराची जास्त कल्पना येत जाते असें अनुभवावरून तर दिसत नाहीं. उलट जर कांहीं कारणांनीं ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाची थोडी तरी कल्पना आली तर तिकडेच एकदम लक्ष लागतें, व मूर्तिपूजेविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो. व हें उत्तर तिच्या बाजूनें पुढील जें चवथें कारण देण्यांत येतें, त्याचें आहे. पुष्कळ वेळां असें विचारण्यांत येतें कीं, मूर्तिपूजेनें जर उन्नति होत नाहीं तर आमचे इतके संत होऊन गेले, ते आधीं मूर्तिपूजक असतां त्यांची कशी उन्नति झाली ? यास एक उत्तर हें कीं, अजूनपर्यंत हें ह्मणणारांपैकीं कोणीही त्यांची उन्नति मूर्तिपूजेपासूनच कशी झाली हें सिद्ध केलें नाहीं. ( याचें कारण युरोपियन लोकांप्रमाणें आपणांस सिद्ध करतां येईल कीं नाहीं, याचा विचार करून नंतर विधान करण्याची अजून आमच्याकडील लोकांस संवय लागली नाहीं हें होय. ) तरी आह्मी प्रसिद्ध उदाहरण देऊन मनाची उन्नति मूर्तिपूजेशिवाय इतर कारणांनीं होते, व नंतर तिचा तिरस्कार येतो हें सिद्ध करतों. नामदेव मोठे संत ह्मणून गणले जात होते, तरीही मूर्तिपूजक होते व मूर्ति हाच देव किंवा फार तर मूर्तिमध्येंच देव आहे, अशी त्यांची कल्पना होती. त्यांच्या हातून देव प्रसाद खातात अशीही ख्याति होती. पुढें गोऱ्या कुंभारानें इतर सर्वांचें पक्कें मडकें ठरवून त्यांचें मडकें कच्चें म्हटलें, व कारण विचारावयाला त्यांस विसोबा खेचर यांजकडे पाठविलें. ते शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून निजलेले पाहून नामदेवांस आश्चर्य वाटलें. पण जेव्हां जेथें पाय ठेवावेत तेथें पिंडी उत्पन्न होऊं लागली, ह्मणजे पिंडींतच देव आहे असें नाहीं तर सर्वांत देव आहे हें जेव्हां नामदेवांस कळलें, तेव्हां त्यांनीं मूर्तिपूजेचें स्पष्ट व कडक खंडण केलें. हा अभंग ' पाषाणाचा देव बोलेचिना कधीं ' हा होय; हा सर्व येथें देण्याचें कारण नाहीं, पण यांतच मूर्तिपूजा करण्यास सांगणारे व ऐकणारे हे ' सांगते ऐकते मूर्ख दोघे ' असें ह्मटलें आहे, व याचप्रमाणें प्रत्येक संताचीं मूर्तिपूजेविरुद्ध वचनें आढळतात.

हिंदुबांधवहो, तुह्मी मूर्तिपूजा करितां ह्मणून येथें मूर्तिपूजेचें खंडण केलें असें नाहीं; तर हल्लीं धर्मसुधारणेंत मनुष्याच्या उन्नतीच्या आड येणारी ही जी मोठी गोष्ट आहे, तींत सुधारणा होणें अत्यंत महत्वाचें आहे, म्हणून तिची निरर्थकता दाखवावी लागली. परंतु ती नाहींशी करावयाची ह्मणजे ती टाकून द्या इतकेंच सांगणें पुरें नाहीं; तर मुख्यतः ईश्वराची थोडी तरी कल्पना येईल अशा प्रकारें कथा, पुराणें, भजनें इत्यादिकांतून ईश्वराचें वर्णन केलें पाहिजे. ह्मणजे ईश्वरास शोधण्याची मनुष्याची जी साहजिक प्रवृति आहे तिची जागृति होऊन मूर्तिपूजा आपोआप बंद पडेल. धर्माचा पाया ईश्वर आहे, व त्याच्या गुणांविषयीं किंचित् तरी कल्पना मनुष्याच्या मनांत बिंबल्याशिवाय धर्माचें पुनरुज्जीवन होणें शक्य नाहीं. ह्मणून विचार करा, हें केवढें मोठें काम तुह्मांवर आहे. खरोखर हल्लींचा मूर्तिपूजेचा प्रसार पाहून ती नाहींशी करण्याचा सुशिक्षित व ज्यांचा तिच्यावर विश्वास नाहीं अशा थोड्या लोकांनीं यत्न करणें ह्मणजे पर्वतास बंदुका मारून पाडण्याप्रमाणें अशक्य वाटतें. पण इतके निराश

होऊं नका. कोणचीही सुधारणा सुशिक्षित व अधिकारी लोकांकडून आचरिली गेल्यानेंच बहुजनसमाज तिचा स्वीकार करतो. लोकमत मिळाल्यावर सुधारणा आचरूं असें म्हणून लोकमत मिळविण्याची खटपट केली तर 'आपण मात्र तसें वागत नाहीं, व आह्मांस तसें सांगतो' असा त्यांचा ग्रह होतो; पण तीच स्वतः आचरिली तर उपदेश करण्याचीही जरूर न लागतां तिचा प्रसार होतो असा सर्व ठिकाणचा अनुभव आहे. ह्मणून मूर्तिपूजा सोडणें हें शंकराचार्य व इतर शास्त्री लोक, व इंग्रजी शिकून सुशिक्षित ह्मणविणारे लोक यांचें मुख्य व पहिलें कर्तव्य आहे. सुधारणा लोकांनींच केली पाहिजे, शंकराचार्य व शास्त्री लोक ती कधींही करणार नाहींत, असें रा. ब. वैद्यांप्रमाणें पुष्कळजण ह्मणतात. असे धर्माधिकारी असणें चांगलें कीं नाहीं या वादांत न पडतां आह्मी इतकें ह्मणतों कीं, त्यांनीं केलेली सुधारणा सर्वांत लवकर प्रचारांत येईल, व ह्मणून सध्यांचे काळीं तरी त्यांनीं या कामीं पुढाकार घेतला पाहिजे. धर्मांतील अधिकाऱ्यांचें मुख्य कर्तव्य पोलिसप्रमाणें जे कांहीं कायदे आहेत ते लोकांकडून अमलांत आणविण्याचें नसून लोकांस धर्माचे बाबींत कित्याप्रमाणें आचरण ठेवून लोकांत धर्माचरण वाढविणें हें होय. व ह्मणून सध्यां जीं भाराभर शास्त्रें ह्मणून आहेत तीं सर्व त्यांनीं कबूल केलींच पाहिजेत, असें त्यांजवर बंधन नसून, उलट परस्परविरोधी शास्त्रांपैकीं हल्लीं कोणचीं ग्राह्य आहेत हें ठरविणें त्यांचें कर्तव्य आहे. रा. ब. वैद्यांनीं म्हटल्याप्रमाणें कलिवर्ज्य प्रकरणें रद्द करून लोकांस असणारा बालविधवाविवाह जरी त्यांनीं सशास्त्र ठरविला तरी सुधारणेस सुरुवात होईल, व पुढें वयाची मर्यादा वाढून प्रौढविधवाविवाहहा होऊं लागतील.

धर्मसंबंधीं प्रश्नांत शास्त्रग्रंथांस किती मान द्यावा याचा येथें थोडक्यांत उल्लेख केला पाहिजे. धर्माची सर्वांत उन्नत स्थिति ह्मणजे स्वतः विचारानें व अनुभवानें उन्नति करून, स्वतःच्या विवेकाप्रमाणें वागणें. अशा लोकांस ग्रंथांपासून केवळ सूचना मिळण्याचाच फायदा; पण ते विचार जर त्यांस पसंत न पडले तर ते त्याप्रमाणें वागत नाहींत. परंतु धर्मग्रंथ ह्मणजे थोर धार्मिक गृहस्थांनीं लिहिलेले अनुभव अशी समजूत असल्यानें साधारण अज्ञ जनांनीं स्वतःस विचार करतां न आल्यास केवळ ते अनुभव मिळविले तरी त्यांची उन्नति होते; पण अशी उन्नति झाली याची खूण ह्मणजे पुढें पुढें त्यांनीं स्वतःच्या विवेकास जागृत करून त्याच्या आधारावर वागतां येईल, ह्मणजे आपणांस आपल्या पायावर उभें राहतां येईल असा प्रयत्न केला पाहिजे. चालतां येऊं लागलें तरी पांगुळगाड्यास धरण्याप्रमाणें, जन्मभर शास्त्रांत सांगितलें आहे, ह्मणून तें करावयाचें असा त्यांचा मोठेपणा वाढविणें ह्मणजे व्यक्तिस्वातंत्र्य काढून घेऊन शिवाय व्यक्तीची आत्मिक उन्नति बंद करणें होय. व उन्नति बंद करणें ह्मणजे जिवंत धर्मास मरूं देणें होय. ही जर शास्त्रांची योग्यता तर परस्परविरुद्ध शास्त्रेंहीं गळ्यांत बांधून तीं सर्व प्रमाण मानलींच पाहिजेत असें ह्मणणें ह्मणजे स्वतःचें धर्माविषयीं अज्ञान दाखवून अधर्माचा उपदेश करणें होय. तरी हिंदुबांधवहो, तुमच्या स्वतःच्या उन्नतीकरितां, तुमच्या समाजाच्या उन्नतीकरितां, तुमच्या देशाच्या उन्नतीकरितां, जें कांहीं हिंदुशास्त्रांत आहे तें सर्व चांगलें आहे हा

पोकळ अभिमान लवकर सोडा. आपल्या हिंदुधर्माविषयीं अभिमानें ठेवा, पण आधीं त्यास जीवंत करा तुमची त्यामुळें उन्नति,—शारीरिक, मानसिक, नैतिक, व आध्यात्मिक अशी सर्व प्रकारें उन्नति,—झाली आहे असें दाखवा, व नंतर त्याचा अभिमान ठेवा, व त्याची पुनः अवनति न होईल अशी काळजी घ्या. आर्यसमाजानें वेद ईश्वरप्रणीत ह्मणून तेवढेच ग्रंथ प्रमाण, व इतर सर्व त्याज्य असें ठरवून, प्रमाणग्रंथांस मर्यादा घातली, व शिवाय त्यांत परस्परविरोधी वचनें नाहींत अशा तऱ्हेनें ते त्यांचा अर्थ करून दाखवितात. तो अर्थ खरा असो कीं नसो, पण त्यांत प्रमाणग्रंथांत परस्परविरोध असून चालत नाहीं हें तत्व त्यांनीं कबूल केलें आहे. याप्रमाणें या दोन धर्मसुधारणा करण्यास त्यांनीं सुसाध्य असा मार्ग स्वीकारला, पण ही सुधारणा पायाशुद्ध झाली नाहीं. वेद ईश्वरप्रणीत मानले जातात ह्मणून तें मत कबूल केल्यानें पहिल्यानें एकदम प्रसार झाला खरा. तरी वेद ईश्वरप्रणीत ह्मणजे ईश्वरानें लिहिलेले असे नाहींत, व एकंदर सर्व ज्ञानभांडार ह्मणजे वेद आहेत असें नाहीं, असें त्यांतील कांहीं पुढारी आतां कबूलही करतात, परंतु इतक्यांत या पंथाचें मुख्य तत्व बदलावें कसें? अशामुळें ते आपल्या उदार विचारांस एकीकडे ठेवून जीं मतें एकदां ठरलीं तींच लोकांस सांगत आहेत, व वेदांत यज्ञ सांगितला आहे, ह्मणून प्रत्येकजण तो करीत आहे. त्याचप्रमाणें प्रचलित जातिभेद मान्य नाहीं तरी वेदांत कर्माप्रमाणें जातिभेद सांगितला आहे, ह्मणून तो मानणें, हीही चूक होय. कारण, हल्लींचा जातिभेदही आधीं त्याच पायरीवर होता, व त्याची जशी हल्लींची स्थिति झाली, तशीच याही कल्पनेची होणार.

(२) याप्रमाणें आतां दुसरी जी महत्वाची गोष्ट आह्मी सांगणार आहों तिचा संबंध आला आहे. ती ही कीं, **सुधारणा ह्मणजे सुधारणेची क्रांति झाली पाहिजे—ह्मणजे सुधारणा ही पूर्ण सुधारणा पाहिजे, ती एकदम झाली पाहिजे, व ज्या ज्या गोष्टींत सुधारणा पाहिजे आहेत, त्या सर्व एकदम झाल्या पाहिजेत.** बंधुहो, सर्व सुधारणा एकदम करणें, केवळ त्याचा आजपर्यंत मोठा बाऊ केला आहे, ह्मणून अशक्य मानूं नका; तर विचार करा, ह्मणजे आजपर्यंतच्या आपल्याच नाहीं पण सर्व जगाच्या इतिहासावरून हेंच तत्व खरें ठरतें हें तुह्मांस दिसेल. व्यक्तीचेंच उदाहरण घ्या. लहान मुलाची उन्नति जरी थोडथोडीच होणें शक्य आहे, तरी मोठ्या माणसांत एका दिवसांत—फार काय एका क्षणांत कशी क्रांति होते ती पहा. शंभर वर्षें जरी पापें केलीं तरी खरा पश्चाताप झाला कीं मनास शांति मिळते, व त्या वेळेपासून पुढें धर्माप्रमाणेंच आचरण होऊं लागतें. अशीं उदाहरणें इतिहासांत आहेतच व प्रत्यक्ष आमच्या डोळ्यांपुढेंही असतील. हाच नियम समाजास लागू आहे. धर्म व सामाजिक सुधारणा पुष्कळ वर्षें हळूहळू होऊन झाली, असें इतिहासांत एकही उदाहरण सांपडत नाहीं. उलट क्रांतीचीं उदाहरणें प्रत्येक देशांत आहेत. केवळ क्रांति या शब्दास भिऊं नका. इंग्लंडांत धर्मक्रांतीस जे इतके लोकांस प्राण द्यावे लागले, त्याचें कारण त्यावेळीं राजसत्ता

जुन्या पक्षाची होती. पण हल्लीं आपली स्थिति उलट आहे. आह्मांस धर्म व सामाजिक सुधारणेंत सरकाराकडून अडथळा नसून, उलट मदत मिळण्यासारखी स्थिति आहे हें आपलें भाग्य आहे. सुधारकांचा छळ फार तर जुन्या लोकांकडून होणार, व आतांपर्यंत तो झालाही आहे. पण यापुढें धर्म व सामाजिक सुधारणा बहुतेक सुशिक्षितांस व जुन्या लोकांसही हवी आहे. ह्मणून केवळ घरीं बसून लोकापवादाची भीति न धरतां, सर्वांनीं एकदम सुधारणा करणें शक्य आहे. याप्रमाणें सुधारणा ही एकदम झाली पाहिजे. शिवाय सर्व सुधारणा बरोबर झाल्या पाहिजेत. केवळ धर्म व सामाजिक सुधारणाच बरोबर झाल्या पाहिजेत, इतकेंच नाहीं तर दोन्ही बाबींत जितक्या सुधारणा हव्या आहेत त्या सर्व बरोबरच झाल्या पाहिजेत. याचें एक कारण बऱ्याच सुधारणा एकमेकांवर अवलंबून असतात, व ह्मणून एक खरी सुधारणा आचरण्यास इतरही केल्याच पाहिजेत. शिवाय याचें दुसरें कारण असें कीं, सुधारणेचा पाया मनाची उदात्त विचारांनीं झालेली उन्नति होय. व जेव्हां मन खरोखर उदार होतें तेव्हां एका गोष्टीसंबंधीं उदार व दुसऱ्या गोष्टीसंबंधीं अनुदार असे भाग होणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ सर्व माणसें एका देवाचीं लेकरें आहेत हें तत्व जर खरोखर मनांत ठसलें तर जातिभेद मोडण्यास सुरुवात आधीं पोटजाति एक करून करूं हा विचारही यावयाचा नाहीं, व जे अशी सूचना करतात त्यांच्या मनांत अजून हें तत्व बिंबलेंच नाहीं असें स्पष्ट ह्मणावयास कांहींही हरकत नाहीं. सुधारणेच्या मार्गांत ठेच खाण्याची ही शेवटली जागा आहे. पुष्कळ सुधारणा केल्या, पण मन पक्कें झालें नव्हतें ह्मणून नंतर इतर कांहीं सुधारणा करण्याचा प्रसंग आला व घेतली माघार !. व अशी एकदां माघार घेतली ह्मणजे उलट 'आजपर्यंत ज्या सुधारणा केल्या, त्याही मी मूर्ख ह्मणून केल्या; त्या केल्या नसत्या तर आजचा हा अब्रू जायचा प्रसंग आला नसता,' असेंही मग कित्येकांस वाटूं लागतें. ही शेवटली ठेच खाली नाहीं असे फार थोडे सुधारक होऊन गेले. ही ठेच खाण्याचें कारण सुधारणेस हात घालतांना मन खरें उदार नसतें; कळकळ वाटलेली नसते; कांहीं इतर फायदा होतो आहे ह्मणून कांहीं सुधारणा आधीं करून शेवटीं जेव्हां सुधारणेसाठीं ह्मणून सुधारणा करण्याचा प्रसंग येतो तेव्हां मन कचरतें. पण सुधारणा हा कांहीं पोरखेळ नाहीं. सुधारणेचा पाया धर्मसुधारणा, व या सुधारणेनें मन खरें उन्नत, उदार व करारी करून नंतर ज्यांस सुधारणा करावयाची त्यांनीं या मार्गांत पडावें. करारीपणा ईश्वरावर दृढभाव नेहमीं जागृत असल्याशिवाय येत नाहीं. म्हणून तुकोबा म्हणतात—' एक भाव चित्तीं । तरी नलगे कांहीं युक्ती ॥ '

( ३ ) आतां सामाजिक सुधारणा कोणच्या हा प्रश्न आला. धर्माचें अंतिम म्हणजे ' वसुधैव कुटुंबकं ' वृत्ति होणें. परंतु हे सर्वांवरील प्रेम जरी आरंभीं शक्य नाहीं, तरी मनुष्यमात्र ईश्वरापुढें सारखा आहे हें मत सुरुवातीसच कबूल करावें लागतें. व हें एकदां कबूल केलें कीं, प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्याच्या उन्नतीच्या आड न येणें हें सत्य व न्याय या दोन तत्वांप्रमाणें त्याचें कर्तव्य होतें. या एकाच कर्तव्यांत

हल्लीं दोन सुधारणा येतात. एक जातभेद मोडणें म्हणजे आजपर्यंत हलके मानलेल्या लोकांस समान हक्क देणें, व दुसरी, स्त्रीजातीस समान हक्क देणें; यांपैकीं दुसरीचाच येथें विचार कर्तव्य आहे. या स्त्रियांच्या सुधारणेमुळें हल्लीं सामाजिक सुधारणेस आरंभ कुटुंब-सुधारणेपासून होतो व म्हणून कुटुंब-सुधारणा हा सामाजिक सुधारणेचा पाया असें मागें म्हटलें आहे. स्त्रियांसंबंधींचे अन्याय दूर करण्यास काय केलें पाहिजे हें आधीं सांगितलेंच आहे. आतां येथें स्त्रियांस समान हक्क देणें म्हणजे काय याचा विचार केला पाहिजे; कारण, आजपर्यंत आमच्याकडील पुष्कळ विद्वान् गृहस्थांसही 'स्त्रियांस समान हक्क द्यावयाचे' ह्मणजे काय ? हें नीट समजलें नाहीं. समान हक्काचें नांव काढतांच ' मग स्वयंपाक कोणी करावा ? ' असा माथेफिरूसारखा प्रश्न पुष्कळ करतात. कित्येकांस स्त्रियांस स्वातंत्र्य दिलें तर त्या लग्नच करण्यास तयार व्हावयाच्या नाहींत, व मग जग बुडेल ही भीति वाटते, आणखी या ह्मणण्यास ते अमेरिकेचें उदाहरण देतात ! मग त्यांचें ह्मणणें खोटें ह्मणणें म्हणजे आम्हीच आम्हांस मूर्ख ठरवून घेण्याप्रमाणें त्यांस वाटतें ! रा. ब. वैद्यांनीं स्त्रीशिक्षणावरील लेखांत स्त्रियांच्या मागें मुलें उत्पन्न करून त्यांस संभाळण्याचें काम ईश्वरानेंच लावल्यानें त्यांस पुरुषांच्या बरोबरीनें शिक्षण देणें अशक्यच आहे; पण मिल्साहेबांनीं हे दोन मुद्दे मुद्दाम गाळले असा आरोप केला आहे ! म्हणून आम्ही म्हणतों कीं, त्यांस व त्यांच्या समानशील बंधूंस अजून ' समान हक्क ' म्हणजे काय हें समजलें नाहीं.

आधीं स्त्रियास समान हक्क कां द्यावयाचे याचा विचार करा. त्यांत पुरुषांचा खरा फायदा हें खरें; पण या पायावर जर आज हे हक्क दिले तर पुरुष स्वाभाविक इतके दुष्ट व नष्ट आहेत कीं, हा खरा फायदा एकीकडे ठेवून पुनः लवकरच ते आपला नीच स्वार्थ पाहूं लागतील. धर्ममार्गानें जाण्यांत सर्वांचा खरा फायदा आहे, पण हा फायदा कितीजण पहातात ? म्हणून समान हक्काचा पाया ' **प्रत्येक पुरुष व स्त्री हीं ईश्वरापुढें सारखीं आहेत** ' हा होय. याच पायावर जातिभेदही मोडला पाहिजे, व ब्राह्मणांपासून चांडालापर्यंत सर्वांस समान हक्क दिले पाहिजेत. आतां समान हक्क ह्मणजे काय ? **समान हक्क ह्मणजे प्रत्येकाच्या उन्नतीच्या मार्गांतील अडचणी काढून, होईल तितकी मदत करणें.** मदत न केली तरी चालेल, पण निदान प्रत्येक मनुष्यप्राण्यास स्वतःची उन्नति करण्याचा हक्क व रस्ता असला पाहिजे. रा. रा. वि. कों. ओक ह्मणतात त्याप्रमाणें स्त्रियांनीं समाजाच्या तळाशीं बुडून पुरुषांनीं वर तरंगावें, ही ईश्वरी योजना नसून, आह्मी ह्मणतों याप्रमाणें **प्रत्येकाची उन्नति व्हावी ही ईश्वरी योजना आहे.** ही ईश्वरी योजना फक्त मनुष्यांसाठीं नसून, सत्य, न्याय, व दया अथवा प्रेम या तीन तत्वांवर तो सर्व ब्रह्मांडाची उन्नति करीत आहे. त्यांत यःकश्चित् मनुष्यप्राण्यानें अडथळा केला तर उलट तोच कांहीं वेळ खालीं पडतो. परंतु ईश्वराच्या अगाध दयेनें तोही पुनः उन्नतीस लागेल अशीच त्याची योजना आहे. याप्रमाणें सुधारणा ही उन्नति आहे; सुधारणा हा धर्म आहे; सुधारणा

हेंच कर्तव्य आहे. मानवी आत्मा अमर आहे, व त्याच्या उन्नतीस कायमचा अडथळा कधींही आणणें शक्य नाहीं.

या तत्वांप्रमाणें स्त्रियांस समान हक्क देण्यास प्रत्यक्ष व्यवहारांत काय केलें पाहिजे? तर मुलगा असो कीं मुलगी असो, पहिलीं दहा वर्षें मुख्यत: शारीरिक वाढीकडे लक्ष दिलें पाहिजे; या वयांत शिक्षणाचा बोजा पडला कीं वाढ खुंटते, हें आज कित्येक वर्षांपासून सर्व डॉक्टर लोक ओरडून सांगत आहेत. दुसऱ्या दहा वर्षांत शारीरिक व मानसिक वाढ बरोबर होईल असाच शिक्षणक्रम पाहिजे. पहिल्या दहा वर्षांतील शाळांत मुलांमुलींस बरोबर शिकवावें; पुढें कांहीं मुदतीपर्यंत ( ह्मणजे हल्लीं ज्याप्रमाणें मॅट्रिकपर्यंत आहे ) मुलांची व मुलींची निराळी शाळा असली तर जास्त फायदा होईल, व पुढें कॉलेजांत दोघांसही एकाच ठिकाणीं शिकवावें. **शाळेंतील क्रमांत मुलींच्या विषयांत बदल करण्याची कांहींही जरूरी नाहीं.** कारण ज्याप्रमाणें परदेशाचा इतिहास घोकून किंवा अमेरिकेंतील नद्यांचीं नांवें पाठ करून पुढें त्यांचा स्त्रियांस घरकामांत उपयोग होत नाहीं, त्याचप्रमाणें पुरुषांसही त्यामुळें कांहीं जास्त पगार मिळत नाहीं. एकंदर शिक्षणाचा मुख्य उद्देश जो मन सुसंस्कृत करणें तिकडे लक्ष देऊन शिक्षणक्रम ठरवावा, व मग तो दोघांसही लागू करण्यास हरकत नाहीं. त्या विषयांशिवाय मुलींस जें घरकाम आलें पाहिजे तें त्या आपल्या सुटीच्या वेळांत आयांबहिणींकडून सहज शिकतात. हाच वेळ त्यांचे, भाऊ पत्ते खेळून व दुसऱ्यांच्या कुचेष्टा करण्यांत घालवितात ही मोठी दुःखाची व लाजिरवाणी गोष्ट आहे. पण हल्लीं पुरुषांस लाज असेल, तर ते ती जपतील ना? आमच्या वाडवडिलांनीं जर पुरुषांची लाज बायकांवर लादून त्यांच्या माना मोडल्या आहेत, मग पुरुषांनीं आतां लाज कोठून आणावी? असो.

याप्रमाणें २०–२१ वर्षें शिक्षण झाल्यावर मुलीची इच्छा असल्यास तिनें लग्न करण्यास हरकत नाहीं. आतां कुटुंबांत समान हक्क कसा राखावयाचा हा प्रश्न आला. येथें त्यांच्यावर आलेल्या नैसर्गिक कामामुळें दोघांचीं कामें आपोआप वाटलीं जातात, यांत शंका नाहीं; पण त्यामुळें एकमेकांनीं एकमेकांचें सुख वाढविण्यास झटलें पाहिजे हें कर्तव्य नाहींसें होत नाहीं. जर त्या इतकें शारीरिक दुःख सोसून आपल्यावर आलेलीं कामें करतात, तर इतर वेळांत त्यांस सुख व आनंद होईल अशासाठीं पुरुषांनीं जास्त प्रयत्न करणें हें त्यांचें कर्तव्य नाहीं काय? पण इकडे पुरुष लक्ष देत नाहींत! त्यांस वाटतें कीं, सर्व जग आपल्या सुखासाठीं आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत नोकरी होते; ती कितीही त्रासाची असली तरी मुकाट्यानें होते! नंतर जो फुरसतीचा वेळ राहतो, तेव्हां दिवसाचा श्रम घालविण्यास त्यांस क्लबांत गेल्याशिवाय चालत नाहीं; उत्तेजक पाणी पिण्याची जरूर न वाटली ह्मणजे बायकोचें भाग्य! पुढें घरीं आले म्हणजे त्यांच्या सुखासाठीं म्हणून बायको हवी! याप्रमाणें जर पुरुष २४ तास आपल्या सुखाचीच पर्वा करीत आहेत, तर शिकलेल्या व स्वतंत्रपणें चरितार्थ चालवितां येणाऱ्या स्त्रियांनीं आपणहून अशा गुलामगिरींत कां उडी घालावी? हा प्रश्न आज पाश्चात्य देश व अमेरिका यांत उत्पन्न झाला आहे. एका बाईनीं

"लग्नाचा धंदा' ( Marriage as a trade ) असें पुस्तक लिहून असें म्हटलें आहे कीं, हल्लीं लग्न हा बायकांस फक्त पोट भरण्याच्या धंद्यांपैकीं एक झाला आहे; यापेक्षां जास्त फायदा बायकांच्या दृष्टीनें कुटुंबांत राहिला नाहीं; व या धंद्यांत फक्त पोटास अन्न मिळण्यास सर्व वेळ शरीर झिजवावें लागतें, व अशा रीतीनें या धंद्यांत त्यांच्या कामास अति थोडा पगार मिळतो; असें असूनही ज्यांस इतर कांहीं धंदा करून पोट भरतां येत नाहीं, त्यांस निरुपायानें इतक्या कमी पगाराचा धंदा पतकरावा लागतो, ही फार वाईट स्थिति आहे; इत्यादि. मग ज्यांस इतर धंद्यांत कामास जास्त पगार मिळतो त्यांनीं तोच केल्यास चूक त्यांची कीं पुरुषांची ? ही पुरुषांची चूक एका विद्वान् अमेरिकन डाक्टरांनीं कबूल केली आहे, व असें ह्मटलें आहे कीं, जर पुरुष त्यांचें ( स्त्रियांचें ) सुख वाढवितील जर त्या इतर धंदा न करतां, स्वाभाविकपणें ह्मणजे त्यांसही जें कुटुंब सुख स्वाभाविकपणें आवडतें त्यासाठीं लग्न करण्यास तयार होतील.

हें समान हक्काचें रहस्य आहे. समान हक्कांशिवाय कुटुंब, समाज व राष्ट्र यांत सुख, आनंद व शांति यांऐवजीं दुःख व कलहच वाढणार. ह्मणून प्रिय बंधुहो, 'समान हक्क' या शब्दांनीं बावरून जाऊं नका. समान हक्कांनीं स्त्रिया उच्छृंखल होतील ही कल्पना सोडून द्या. व दुसऱ्याच्या सुखासाठीं झटण्यानेंच आपणास खरें सुख मिळून आपली उन्नति होते, हा जो एकच व श्रेष्ठ सुखाचा उपाय ईश्वरानें आपणांस ठेविला आहे, तो आपल्या सुखासाठीं, आपल्या उन्नतीसाठीं ह्मणून तरी नम्रपणें आचरणांत आणा. अलीकडे कांहीं लोक स्त्रीशिक्षण ही एक टूम ह्मणून, शिकलेल्या मुलास शिकलेल्या मुली हव्याशा वाटतात, ह्मणून त्यांस चार अक्षरें शिकवितात. पण स्त्रीशिक्षणासारखी महत्वाची सुधारणा पायाशुद्ध झाल्याशिवाय हल्लींच्या अर्धवट शिक्षणानें जे अनेक दोष मुलींत शिरतात असा आक्षेप आहे, ते दोष शिक्षणानें शिरत नाहींत हें कळणार नाहीं. ह्मणून **सर्व सुधारणा पायाशुद्ध, व एकमेकांबरोबरच करून पहा, ह्मणजे त्यांपासून समाजाची उन्नतीच होईल यांत संशय नाहीं.**

## प्रकरण ३.

—:*:—

## स्त्रीवर्गास नम्र सूचना.

सर्व स्त्रियांस माता व भगिनी या नात्यानें नमन करून, आतां आह्मी त्यांसही दोन शब्द सुचविणार आहों. हा सर्व खटाटोप त्यांच्यासाठीं असल्यानें त्यांनीं या सूचनांचा जास्त काळजीपूर्वक विचार करून त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय करावा, इतकी आमची त्यांस नम्र विनंति आहे. इतका वेळ आह्मी पुरुषांचे जे दोष दाखविले त्याचें मूळ इतकेंच आहे कीं, त्यांनीं स्त्रियांस अन्यायानें व जबरीनें अशिक्षित ठेवून त्यांच्या सद्गुणांची वाढ होण्यास फुरसत दिली नाहीं. परंतु आतां पुरुषांचे हातीं फक्त तो अडथळा काढून घेणें इतकेंच आहे; त्यांनीं आपल्या पापाच्या प्रायश्चित्तासाठीं तुमची उन्नति करण्यास कितीही खटपट करण्याचें मनांत आणलें, तरी तें त्यांस शक्य नाहीं. स्त्रियानों, तुमची उन्नति तुमच्या हातूनच होणें अवश्य आहे, हें तत्व कधींही विसरूं नका. तुमच्या हक्कांचें, सद्गुणांचें पुरुषांनीं आपल्याजवळ गाठोडें करून ठेविलें आहे, व तें तुह्मांस परत दिलें ह्मणजे झालें अशी मुळींच गोष्ट नाहीं, तर पुरुषांनीं फक्त तुमच्या उन्नतीस अडथळा केला, व आतां तो न करणें इतकेंच त्यांच्या हातीं आहे. पण तुमच्या निश्चयानें व प्रयत्नानें हा अडथळा त्यांनीं आपण होऊन न काढला तरी तो त्यांस काढण्यास लावून तुमची उन्नति करणें तुह्मांस शक्य आहे. ज्याप्रमाणें शिक्षकानें कितीही श्रम घेतले तरी शेवटीं अभ्यास करणें शिकणाराकडेच येतें, त्याप्रमाणें पुरुषांनीं कितीही मदत केली तरी शेवटीं तुमची उन्नति तुह्मीं केली तरच होणें शक्य आहे. यापुढें बहुतकरून पुरुषांकडून अडथळा होणार नाहीं, अशी आह्मांस आशा आहे, व हेंच तुमच्या अनुभवास येवो! परंतु आजपर्यंतच्या संवयीनें जरी कांहींनीं हा अडथळा काढला नाहीं, तरी थोडा वेळ त्यांच्या मनाच्या उलट वागूनही, थोडा वेळ आपला हेका सत्कार्यासाठीं चालवूनही तुमची उन्नति सतत चालू ठेवणें हें तुमचें कर्तव्य आहे. यांत पुरुषांचा अपमान होत नाहीं, यानें पुरुषांविरुद्ध बंड केलें असें होत नाहीं, तर उलट तुमची उन्नति झाल्याशिवाय पुरुषांची उन्नति होणें शक्य नाहीं, हें सत्य नेहमीं लक्षांत बाळगून, आचरण्यांत आणण्यास कचरूं नका. देशाचें कल्याण होण्यास आज देशांत पुष्कळ वीर उत्पन्न झाले पाहिजे, अशी सर्वत्र ओरड चालू आहे. परंतु आह्मी स्पष्ट ह्मणतों कीं, आधीं वीरमाता असल्याशिवाय वीर जन्मणें शक्य नाहीं. पुष्कळ लोक आजपर्यंत एखादा वीर ह्मणून पुढें आला ह्मणजे औपचारिक रीतीनें त्याच्या मातेस वीरमाता ह्मणत आले आहेत. पण ही चूक आहे. प्रत्यक्ष इतिहासांतील उदाहरणें पहा. इंग्लंडांत तिसऱ्या जॉर्जला त्याची आई लहानपणापासून 'खरा राजा हो' (Be a real king) असें रोज शंभरदां सांगत असे. शिवाजीची आई आधीं वीरमाता होती, ह्मणून तो वीर झाला हें आज सर्वांस माहीत आहे. आधुनिक सुधारणावीर पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांस त्यांच्या आईनें विधवाविवाहास शास्त्राधार आहे कीं नाहीं हें पहाण्यास सांगितलें. याप्रमाणें बहुतेक वीरांस लहानपणापासून योग्य शिक्षण व वळण देऊन वीरमातांनींच त्यांस केलेलें आढळून येईल. ह्मणून **देशाची सुधारणा तुमच्या उन्नतीवरच अवलं-**

बून आहे हें लक्षांत ठेवा, व त्याप्रमाणें वागण्यास कधींही मागें घेऊं नका.

आर्य स्त्रियांनों, आद्यकवि वाल्मिकीपासून तों आधुनिक कवींपर्यंत सर्वांनीं जरी तुमच्या अनेक गुणांचें वर्णन केलेलें आहे, तरी तें खोटें न ह्मणतां आह्मी इतकें ह्मणतों कीं, हल्लीं तुमच्या दोषांच्या मानानें ते गुण फार थोडया प्रमाणांत असल्यानें त्यांचें तेज पडत नाहीं. आजपर्यंत यांत तुमचा दोष नव्हता हें खरें आहे. पण यापुढें तुह्मांस एकदां जागृत केल्यावर, व अडथळा पुष्कळसा नाहींसा झाल्यावरही जर तुह्मी आळसानें किंवा पुरुषांची विनाकारण जास्त भीति बाळगून जुन्याच चाली चालू ठेवाल तर तो मात्र तुमचा दोष होईल. म्हणून यापुढें तुमची उन्नति करितांना, तुमच्या सद्गुणांची वाढ करितांना, आधीं दोष नाहींसे करण्याकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे. येथें तुमच्या सर्व दोषांविषयीं चर्चा करण्याची जरूर नाहीं. पण कांहींचा उल्लेख केला पाहिजे. हा उल्लेख निदान हे दोष तरी तुह्मी लवकर काढून टाकून त्यामुळें तुमच्या सुधारणेस जो अडथळा होत आहे तो दूर कराल अशा हेतूनें केला आहे हें पुनः एकदां ध्यानांत ठेवा, व तुमच्या मनांत असेल तर तुमच्यासंबंधीं सर्व सुधारणा तुह्मांस सहज रीतीनें करितां येतील हें पहा.

मनुष्यस्वभावाचा एकाच गोष्टीस चिकटून राहणें हा एक गुण आहे. हा जेव्हां वाईट गोष्टींसंबंधीं दिसून येतो, तेव्हां दुर्गुण होऊन त्यास हेकेखोरपणा ह्मणतात; व हाच जेव्हां चांगल्या व खऱ्या गोष्टींत दिसतो तेव्हां सद्गुण होऊन सत्यनिष्ठा किंवा करारीपणा असें त्यास नांव मिळतें. याप्रमाणें समाजांतील चांगल्या चांगल्या चालींसंबंधीं जो सद्गुण दिसतो तोच वाईट चालींसंबंधीं किंवा अवनति होऊन चांगल्या चालींऐवजीं वाईट चाली आलेल्या असल्या तरी त्यांस चिकटून राहण्यानें तो दुर्गुण होतो. व सुधारणेच्या मार्गांतील मोठा अडथळा हा दुर्गुण आहे, व हा टाकल्याशिवाय, आमच्या सर्व चाली चांगल्या आहेत हा अहंकार सोडल्याशिवाय सुधारणेस सुरुवात होणेंही शक्य नाहीं. हल्लीं हा दोष विशेषतः स्त्रियांत आढळतो. पुष्कळ सुधारकांस मागें पाऊल घेतांना ‘ आमच्या घरीं हें कांहीं चालत नाहीं, ’ ही सबब कामीं पडते यांत शंका नाहीं ! ह्मणन स्त्रियांनों, तुह्मी स्वतः एकदां हल्लींच्या सामाजिक चाली, विशेषतः तुह्मांसंबंधीं चाली चांगल्या आहेत कीं वाईट हा विचार करीं, व वाईट दिसतील त्या तावडतोब बंद करण्यास मागें घेऊं नका. उदाहरणार्थ, बालविवाहाची गोष्ट घ्या. आजपर्यंत याच्या वाईट परिणामांबद्दल इतकी चर्चा, इतकीं व्याख्यानें झालीं तरी अद्याप थोडीही सुधारणा झालेली नाहीं, असें पाहून विद्वान् गृहस्थांसही आतां आपल्या डोळ्यांदेखत ही सुधारणा होणार नाहीं अशी निराशा वाटत आहे. कोठें कोठें लग्न लांबणीवर पडल्यानें थोडीशी सुधारणा झाली नाहीं तोंच व क्वचित एखाद्या मुलीचें पाऊल वांकडें पडलेलें पाहून ‘ मुलींचीं लग्नें लहानपणींच केलीं पाहिजेत ’ अशी कित्येक लोक उलट खात आहेत ! परंतु आमची अजून मुळींही निराशा झाली नाहीं. आजपर्यंत सुधारणेस मुख्य अडथळा लोकापवादाचा झालेला आहे; मागें ह्मटल्याप्रमाणें पुरुषांस स्त्रियांची भीति, स्त्रियांस पुरुषांची, व प्रत्येकास इतर सर्वांची व्यर्थ भीति वा-

टत असल्यानें एकजुटीनें सुधारणा झाली नाहीं. परंतु स्त्रियांनो, फक्त तुह्मी जर या खोट्या पिशाचाची भीति एकदां टाकून दिलीत, तर आज बालविवाह बंद करणें तुमच्या हातीं आहे. काय, बालविवाहाचे वाईट परिणाम तुह्मांस अनुभवानें माहीत असून तीच स्थिति तुमच्या मुलींची व्हावी असें तुह्मांस वाटतें काय ? लग्नापूर्वी निदान शारीरिक वाढ पूर्ण झाली पाहिजे, यासाठीं मुलींचें लग्न निदान २० वर्षांपर्यंत न करणें चांगलें असें तुम्हांस वाटल्यावर तो वेळ तिनें विद्या शिकण्यांत घालवूं नये असें तुम्हांस वाटेल काय ? जर नाहीं, तर मग बालविवाह बंद करण्यास उशीर कां करतां ? ज्या मुलींस तुम्ही १०–१२ वर्षें पाळतां, त्यांच्या शिक्षणाचा खर्च करण्याची जरी तुम्हांस ऐपत नसली तरी तुमच्या पोटच्या गोळ्यास आणखी १० वर्षें पाळणें तुम्हांस जड जाईल काय ? मग अजून हा निश्चय करण्यास उशीर कां करतां ? सुशिक्षित स्त्रियांनो, तुम्ही एकमेकींस व आपल्या अज्ञभगिनींस धैर्य द्या. तुह्मी वर्षांतून इतके वेळां एकमेकींच्या घरीं जमतां, तेव्हां आपल्या मुलींचीं लग्नें ठरवण्याऐवजीं ही सुधारणा प्रत्येकीनें अमलांत आणली पाहिजे, असा निश्चय करून तो पाळण्यास एकमेकींस मदत करा. आह्मी पुनः ह्मणतों कीं बालविवाह बंद करणें हें तुमचेंच काम आहे. कारण अजून पुरुषांची तुमच्या नीतीविषयीं शंका गेली नाहीं, व तुह्मी सुधारणा करून ती शंका निराधार आहे, असें दाखवल्याशिवाय तीं कधीं त्यांच्या डोकींतून जावयाचीही नाहीं. परंतु तुह्मांसही तुमच्या मुलींविषयीं तीच शंका आहे काय ? आह्मांस ही कल्पनाही करवत नाहीं. ह्मणून ही तुमच्या हातीं असलेली सुधारणा, पुरुषांविरुद्ध आपला करारीपणा दाखविण्याची गरज पडली तर तोही दाखवून आजपासून करण्यास सुरुवात करा.

याचप्रमाणें विधवाविवाहाची गोष्ट आहे. पुरुष अजून बालविधवाविवाहच करावेत, व प्रौढविधवाविवाह करूं नयेत, अशा फुकटच्या बाता मारून तोंडाची वाफ दवडीत आहेत. परंतु त्यांनीं सर्व शास्त्रांचा आधार दाखवून, जरी हें तुह्मांस कितीही सांगितलें, व स्वतः ब्रह्मदेव खालीं उतरून जरी त्यानें हेंच सांगितलें तरी **जिची इच्छा असेल तिला पुनः लग्न करण्यास आडकाठी करणें एक तर अन्याय आहे, व दुसऱ्या पक्षीं अनीतिप्रवर्तक आहे.** तुमच्या विधवा भगिनींचें वांकडें पाऊल पडण्यानें तुमच्या जातीची अब्रू कमी होऊन सरसकट सर्वांविषयीं पुरुष साशंक होतात. हा पुरुषांचा जरी एकतर्फी न्याय आहे, तरी तुमच्या अब्रूची काळजी तुह्मी घेतली पाहिजे, इतकें तरी तुह्मी मान्य केलें पाहिजे. ह्मणून वरील सरळ व सामान्य नियम ध्यानांत ठेवून कोणच्याही विधवाविवाहास अडथळा करूं नका. सध्यां या सुधारणेसही तुमच्याकडून जास्त अडथळा होत आहे; पुनर्विवाहित जोडप्यांपैकीं पुरुषांस पुरुषांकडून जितका त्रास होतो, त्यापेक्षां जास्त स्त्रियांस स्त्रियांकडून होत आहे. ह्मणून ही सुधारणा जरी वरीलप्रमाणें सर्वस्वीं तुमच्या हातीं नाहीं, तरी तुमचा अडथळा काढून घेणें तुमच्या हातीं आहे; मदत करणें तुमच्या हातीं आहे. व तुमचा अडथळा नाहींसा झाल्यावर ज्या पुरुषांचा शास्त्रांवर विश्वास नाहीं ते तीं पुं-

टाकून ठेवून तुमच्या मदतीस खात्रीनें येतील. बालविवाह बंद झाल्यावर बालविधवाही बंद होतील;' ह्मणून मुख्य प्रश्न बालविधवाविवाह करावेत की प्रौढविधवाविवाह करावेत हा नाहीं, तर ज्यांची लग्नकरण्याची इच्छा आहे त्यांस जाणून बुजून दुःखांत लोटून शिवाय अनीतीच्या मार्गास जाऊं द्यावें कीं काय हा प्रश्न आहे. ह्मणून विचार करा. काय एक ईश्वरचंद्रांच्या आईचेंच मन एक विधवा पाहून कळवळलें काय? आजपर्यंत या जुलुमाकडे व त्यामुळें विनाकारण लागणाऱ्या कलंकाकडे तुमचें कोणाचें लक्ष गेलें नाहीं काय? मग या तुमच्या दुःखी अनाथ भगिनींस त्यांतून सोडविण्याचें पुण्य मिळून सहजीं जर तुमच्या जातीचा कलंक जात आहे, तर यासाठीं खटपट करण्यास यापुढें तुह्मी कसला विचार करतां? कोणाची भीड धरतां? एकदम एकजुटीनें व दृढनिश्चयानें कामास लागा. या कामांतही तुह्मीच पुढें पाऊल टाकून पुरुषांस लाजवाल अशी आह्मांस आशा आहे.

स्त्रियांनो, आणखी एक तुमची बेअब्रू करणारी चाल आहे व तीही तुह्मी बंद केल्याशिवाय बंद व्हावयाची नाहीं. ही चाल ह्मणजे लग्नासारख्या मंगलप्रसंगीं व इतर मोठ्या कार्यांच्या व उत्सवांच्या प्रसंगीं होत असलेला नाच होय. पुरुष कितीही शिकले, किंवा त्यांनीं एक सोडून दहा बायका जरी केल्या तरी त्यांची नायकिणींच्या नाचाची गोडी कमी होणार नाहीं, व ह्मणून दारूबाजास दारू पिऊं नको ह्मणण्याप्रमाणें त्यांस ही चाल बंद करा ह्मणून सांगणें निष्फळ होईल. ह्मणून तुह्मी आपल्या अब्रूच्या बचावासाठीं दृढनिश्चयानें त्यांस ही चाल बंद करण्याची ताकीद द्या, ज्या कार्यांत नाच होईल त्या कार्यांत घरच्या व बाहेरच्या स्त्रिया कोणीही मदत करणार नाहींत असा तुमचा निश्चय त्यांस दाखवा, ह्मणजे तुमच्या नीतिधैर्यानें, नीतीच्या तेजानें ते खालीं मान घालून ही चाल बंद करतील.

आतां तुमचे जास्त दोष काढून पाल्हाळ करण्याची गरज नाहीं. तुह्मांस आळशी ह्मणण्याची पुरुषांस संवय लागली आहे. पण खरें पाहिलें तर हल्लीं सर्व हिंदुस्थान देश आळशी आहे, व आजपर्यंत पुरुषांवरच सर्व जबाबदारी असतां त्यांनीं आपली जी वाईट स्थिति करून घेतली आहे, तिचें कारण त्यांचा आळसच होय. परंतु ही वेळ पुरुष आळशी कीं स्त्रिया आळशी हा वाद करून भांडण्याची नसून पुरुषांची उन्नति पुरुषांनीं व स्त्रियांची उन्नति स्त्रियांनीं करण्यास दोघांनींही आळस टाकला पाहिजे. हा आळस जाण्याचा एकच उपाय ह्मणजे आपली स्थिति सुधारेपर्यंत आपल्या मनास आपल्या वाईट स्थितीबद्दल हळहळ लागली पाहिजे. याशिवाय, स्त्रियांची जीभ आगगाडीप्रमाणें सतत चालू असते अशी सर्व देशांत ह्मण पडली आहे, हें इंग्रजी व मराठी चुटक्यांवरून दिसतें. पण हल्लीं आपल्या देशांत व्याख्यानांचा इतका सुळसुळाट झाला आहे कीं, पुरुष जास्त बोलके कीं स्त्रिया जास्त बोलक्या हें ठरविणें कठीण झालें आहे! सारांश, प्रत्येकामध्यें जरी दोष असले तरी ते काढून, उन्नत होण्याचा हक्क प्रत्येकाचा आहे. ह्मणून स्त्रियांनो, तुह्मी हें कधींही विसरूं नका, कीं स्त्रिया या मनुष्य आहेत, व त्यांस आपली उन्नति करण्याचा पुरुषांइतकाच हक्क ईश्वरानें दिला आहे; इतकेंच नाहीं, तर त्यांच्यांत कांहीं असे विशिष्ट उदात्त गुण आहेत कीं, त्यांच्या

वाढीनें समाजाची स्थिति ज्यास्त सुधारून, त्याचें सुख जास्त वाढून, एकंदर उन्नतीस विशेष शोभा येईल. ( इंच इंग्रजींत असें व्यक्त करितात कीं, Woman has a special mission in this world to fulfil ) ह्मणून मनुष्यास योग्य व अवश्य असा स्वाभिमान धरा, व स्वतःस विसरून आपलें जीवित हल्लीं जें व्यर्थ घालवीत आहां तें आपली उन्नति करून समाजाच्या उन्नतीसाठीं खर्च करा. 'व्यर्थ आह्मी अबला' ही कल्पना सोडून द्या, व ईश्वरानें जीं कामें फक्त तुह्मांसच शक्य अशीं नेमिलीं आहेत तीं ओळखून करण्यास योग्य व्हा. जितकी जास्त मेहनत व कष्ट सोसून तुह्मी आपले हक्क मिळवाल तितके ते जास्त दिवस टिकतील, हें सर्वसामान्य तत्वही ध्यानांत ठेवा.

या प्रकरणांत ज्या गोष्टी तुह्मी करण्याच्या अशा दाखविल्या आहेत, त्यांशिवाय या भागाच्या पहिल्या प्रकरणांत अवश्य दाखविलेल्या सुधारणा पुरुषांकडून लवकर करवून तुमचे स्वाभाविक हक्क परत मिळवणें, तुमच्या नीतीची योग्यता जास्त वाढविणें, हेंही तुमचें कर्तव्य आहे. विस्तारभयास्तव तुमच्या आणखी एका हक्काचा येथें फक्त निर्देश करूनच पुरें करतों. स्त्रियांस लग्नाशिवाय गति नाहीं, किंवा त्यांनीं लग्न केलेंच पाहिजे ही कल्पना व्यक्तीस व समाजास घातक आहे. लग्न करणें हें जरी सृष्टिनियमाप्रमाणें आहे, तरी ज्यांची इच्छा नसेल त्यांनीं लग्न न करतां स्वतंत्रपणें राहून, समाजसेवा करणेंच चांगलें, हें त्या प्रकारच्या इंग्लिश स्त्रियांच्या उदाहरणांवरून दिसतें. आपल्याकडेही त्यांच्याप्रमाणें स्वार्थत्याग करून, समाजसेवेस जीवित अर्पण करणाऱ्या स्त्रिया निघणें इष्ट आहे. आपल्याकडे ही गोष्ट नवी असल्यानें सुधारणाद्वेष्टयांकडून यांस पहिल्यानें त्रास होईल; परंतु अशा त्रासास भिऊन आजपर्यंत कोणतीही सुधारणा झाली नाहीं, व त्याचप्रमाणें याही कामीं कांहींनीं त्रास सोसून इतरांस मार्ग मोकळा केला पाहिजे.

## प्रकरण. ४.

—:*:—

# कांहीं मुद्यांचें स्पष्टीकरण.

## १. प्रार्थनासमाज हिंदुधर्मी आहे काय ?

या भागाच्या पहिल्या प्रकरणांत प्रार्थनासमाजानें स्वतःस हिंदु ह्मटल्यानें त्यांत जुन्या वाईट चाली आल्या, असें ह्मटलें आहे. परंतु फक्त तितक्या प्रतिपादनानें कांहीं सामाजिक लोकांचें समाधान होणार नाहीं; व जरी त्या नांवानें थोडी गैरसोय होते इतकें त्यांस वाटलें तरी तेवढ्यासाठीं आपलें आवडतें नांव टाकण्यास ते तयार होतील अशी मुळींच आशा नाहीं. परंतु आमच्या मतें सध्यां प्रार्थनासमाजांत खरी सुधारणा होऊन त्यास योग्य दिशा लागण्यास या महत्वाच्या मुद्याचा जास्त विचार होऊन, जर कांहीं एक निकाल लागणें शक्य असेल तर तो लवकर लागणें अवश्य असल्यानें, या विषयाचा जरी पुस्तकाच्या विषयाशीं विशेष संबंध नाहीं, तरी या प्रकरणांत या प्रश्नासंबंधीं एकंदर गोष्टी आह्मी वाचकांस सादर करीत आहों. त्यांचा केवळ पुढाऱ्यांनींच नव्हे तर ब्राह्म वे प्रार्थनासमाजाच्या प्रत्येक सभासदानें नीट विचार करून नंतर समाजाची या पुढील दिशा ठरविली पाहिजे.

प्रथमतः पूर्वीं जो वाद आह्मीं टाळला त्याचा ह्मणजे ' प्रार्थनासमाज हिंदु आहे काय ? ' या प्रश्नाचा विचार करूं. हिंदु आहे ह्मणणाऱ्यांचें कारण ' आमचीं सर्व मतें हिंदुधर्माच्या उदात्त रूपांतून काढतां येतात; व आजपर्यंत हिंदुधर्मी ह्मणविण्यास अमुक मतें मान्य असलींच पाहिजेत असा केव्हांच नियम नसल्यानें आह्मी मानतों हीं हिंदुधर्मांतील मतें मानूनही आह्मी हिंदु धर्मीच राहूं शकतों, ' हें होय. हिंदुधर्माची एक व्याख्या कधींच नव्हती हें आह्मी कबूल करतों. पण फक्त वेदकाळ सोडून (वेद व उपनिषदें यांत ' वेद सर्वांशीं प्रमाण ' असें ह्मटलेलें नसलें. तर ) त्यानंतरच्या काळापासून आतांपर्यंत ' वेदाचें प्रामाण्य ' हा हिंदुधर्माचा पाया आहे; वेद सर्वांशीं प्रमाण आहेत असें स्मृत्यादि ग्रंथांत स्पष्ट ह्मटलें आहे; व आजपर्यंत प्रत्येक हिंदुधर्मीयास मान्य असें हें एक मत आहे. व ह्मणून अलीकडील हिंदुधर्मीयांपैकीं एका प्रसिद्ध गृहस्थांनीं, ' प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ' अशी जी हिंदुधर्माची व्याख्या केली आहे ती योग्य आहे. हिंदुधर्माची व्याख्या करण्याचा हक्क हिंदुधर्मीयांचाच आहे, व म्हणून ही व्याख्या गृहीत धरली तर आर्यसमाजी हिंदु होऊं शकतात, पण **ब्राह्म व प्रार्थनासमाजी हिंदुधर्मी होऊं शकत नाहींत.** तरीही आमच्यांतील कांहीं लोक ह्मणतात कीं, ' हें मत कांहीं हिंदुधर्माच्या उदात्त रूपास अवश्य नाहीं, व ह्मणून हें मत आह्मी मानीत नाहीं, व हल्लींचे हिंदु जरी आह्मांस हिंदु ह्मणत नाहींत तरी आह्मी स्वतःस हिंदु ह्मणं शकतों. ' या लोकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, एखाद्या धर्मांतील कांहीं मतें व रीति रूढीनेंच ठरलेल्या असतात, पण त्यांवरून तीं मतें न मानलीं तरी चालतात असें होत नाहीं. रूढीनें समाजाच्या लग्नविधीस कायदेशीरपणा आणण्याची सामाजिकांचीही इच्छा व यत्न आहे. व ह्मणून

वेदांचें प्रामाण्य आतां हिंदुधर्मांतून गाळतां येत नाहीं. हेंही कबूल नसलें, तर या लोकांनीं पुढील मुद्याचा विचार करावा.

वेदकाळचा धर्म जरी मनुष्यमात्रासाठीं सांगितला असला तरी हिंदूंची व म्लेंच्छांची गांठ पडल्यापासून लाखों हिंदु मुसलमान व खिस्ती झाले, पण एक बाटलेला हिंदु जर पुनः हिंदुधर्मांत येऊं शकत नाहीं, मग जन्मतः मुसलमान किंवा खिस्ती हिंदु कसा होणार ? बौद्धधर्माच्या प्रसारानें हिंदूंची संख्या फारच कमी झाली. त्यावेळीं जें हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन झालें, त्यावेळीं जन्मतः हिंदु नसलेल्या बौद्धांसही हिंदु धर्मांत घेतल्यानें थोडा वर्णसंकर झालेला आहे असें ह्मणतात. पण त्याखेरीज हिंदूंनीं आपल्या धर्माचा इतरांस कधीं उपदेशही केलेला नाहीं. व याप्रमाणें रूढीनें 'जन्मतः हिंदु असलेल्यासच हिंदुधर्मशास्त्रें लागू' हें दुसरें महत्वाचें तत्व हिंदुधर्मांत आलें आहे. पण ब्राह्म व प्रार्थनासमाजाचा धर्म सार्वत्रिक ह्मणजे मनुष्यमात्राचा धर्म आहे; त्याप्रमाणें आजपर्यंत उपदेश होत आले आहेत; व समाजांत खिस्ती व मुसलमान यांस घेतल्याचींही उदाहरणें आहेत. ही समाजाची दिशा कायम ठेवणें हें सामाजिकांचें पहिलें कर्तव्य आहे. तरीही कित्येक हिंदुधर्माभिमानी व स्वतःस हिंदु ह्मणविणाऱ्या सभासदांचा कल समाजानें फक्त हिंदुधर्माचीच सुधारणा केली तरी पुष्कळ होईल अशाकडे आहे. व कित्येक वरीलप्रमाणें ह्मणतात कीं, 'आजपर्यंत जरी हिंदुधर्मांत इतर धर्मीयांस घेतलें नसलें तरी तसें घेऊं नये असें उदात्त हिंदुधर्मांत कोठें सांगितलें आहे ? व ह्मणून यापुढें आम्ही हिंदुधर्माचा सार्वत्रिक धर्माप्रमाणें उपदेश करण्यास हरकत नाहीं. शिवाय ज्या मुसलमान किंवा खिस्ती लोकांस आमचा उदार धर्म स्वीकारणें असेल त्यांनीं हिंदु होण्यास मागें घेऊं नये; नाहीं तर ते पूर्ण उदारधर्मी झालेच नाहींत असें होतें.' हें रूढीनें आलेलें तत्व झुगारून हिंदुधर्मास सार्वत्रिक रूप देण्यास आमची हरकत नाहीं. पण हा यत्न अशक्य गोष्ट करण्यास हात घालण्याप्रमाणें आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. मुसलमान व खिस्ती फार तर महंमद व खिस्त यांजबद्दलचा हेका सोडण्याइतके उदार होतील, पण ते उदारधर्माच्या नांवाखालीं स्वतःस हिंदु ह्मणविण्यास कधींही तयार होणार नाहींत. व यामुळें ते उदारच नाहींत, असें ह्मणणें हेकेखोरपणाचें आहे. समाजाचीं तत्वें उदात्त हिंदुधर्मांत आहेत हें जितकें खरें आहे तितकेंच तीं इतर सर्व धर्मांच्या उदात्त रूपांत आहेत हें खरें आहे; हेंच आम्ही आजपर्यंत लोकांस सांगत आहोंत. मग आमच्याप्रमाणें इतर धर्मांतील सुधारकांनीं आपलें नांव कायम ठेवून आम्ही जोंपर्यंत तें नांव घेण्यास तयार होणार नाहीं, तोंपर्यंत आम्हीही पूर्ण उदार झालों नाहीं असें ह्मणण्यास काय हरकत आहे ? याप्रमाणें या अटीचा परिणाम एकमेकांत द्वेष वाढवणें हाच होणार ! येथें कोणी ह्मणतील, 'मग हिंदुधर्मानें हिंदु नांव टाकल्याशिवाय त्याची पूर्ण सुधारणा होणें शक्यच नाहीं काय ?' तर, होय ! हिंदुधर्मानें हिंदु नांवाचा, मुसलमानांनीं मुसलमान नांवाचा व खिस्त्यांनीं खिस्ती नावाचा हेका सोडल्याशिवाय कोणताही धर्म सार्वत्रिक होऊं शकत नाहीं. ब्राम्ह हें नांव बहुतेक सर्वांस घेण्यास

हरकत वाटणार नाहीं अशी आजपर्यंतच्या अनुभवावरून आशा आहे; तरीही ब्राह्मसमाजाचें मुख्य तत्व सार्वत्रिकता आहे, व जर ब्राह्म या नांवानें त्यास बाध येईल तर ब्राह्म लोकांनीं ब्राह्म या नांवाचाही हेका सोडला पाहिजे. ह्मणून जर आह्मांस आमचा धर्म सार्वत्रिक ह्मणून कायम ठेवावयाचा असेल तर आम्ही हिंदु नाहीं असें आज स्पष्ट कबूल केलेंच पाहिजे; त्याशिवाय सार्वत्रिकपणाबद्दलचे आमचे सर्व उपदेश दांभिक व व्यर्थच होणार. ब्राह्म व प्रार्थनासमाजांचे सभासदहो, याप्रमाणें आह्मीं हिंदु आहों काय याचा आज निकाल होण्यानें समाजाची पुढील दिशा ठरणार आहे. हिंदुधर्मी ह्मणवा व एक पाऊल मागें घेऊन इतरांपासून कायमचे वेगळे व्हा, किंवा हिंदु नांव सोडा व आजपर्यंतची समाजाची दिशा कायम ठेवा!

Civil Marriage Act प्रमाणें लग्न रजिस्टर करणारास 'मी हिंदुधर्माचा नाहीं,' अशी शपथ घ्यावी लागते. प्रार्थनासमाजाच्या ज्या सभासदांनीं किंवा त्यांच्या मुलांनीं याप्रमाणें शपथ घेतली आहे, त्यांनीं त्यानंतर पुनः आपणांस हिंदु ह्मणविणें हें खऱ्या धार्मिकपणास कितपत शोभतें याचाही विचार करण्यासारखा आहे.

प्रार्थनासमाज हिंदु आहे काय ? या प्रश्नाचा विचार करतांना, त्याच्या स्थापनेचा इतिहास पहाणें अप्रासंगिक होणार नाहीं. कारण समाजाचीं सर्व तत्वें जरी हिंदुधर्मांत असलीं तरी समाज स्थापनेच्या वेळीं हीं तत्वें ठरवितांना आमच्याकडील स्थापकांनीं हिंदुधर्मशास्त्रांचें विशेष पारायण केलें नव्हतें, व ह्मणून प्रार्थनासमाजाची स्थापना फक्त हिंदुधर्माचें उदात्त स्वरूप पुढें आणण्यासाठीं झाली नाहीं, इतका आमचा मुद्दा आहे. मुंबई-प्रार्थनासमाजाची स्थापना होण्याच्या आधीं कांहीं वर्षें 'परमहंससभा' या नांवाची एक संस्था धर्म व सामाजिक सुधारणा करण्याच्या हेतूनें कांहीं मंडळींनीं काढली होती. ही संस्था हिंदुधर्माचें उदात्त रूप लक्षांत घेऊन निघाली नसून इंग्रजी शिक्षणानें प्रचलित हिंदु चालींत सुधारणा करण्यासाठीं निघाली होती. या संस्थेचा मुख्य कटाक्ष धर्मतत्वांवर नसून व्यावहारिक आचरणावर होता हें सभासद होतांना इंग्लिश रोटी खाण्याच्या अटीवरून दिसतें. ही संस्था कांहीं वर्षांनीं बंद पडली. परंतु या सुमारास कलकत्त्यास ब्राह्मसमाजांत महत्वाची चळवळ चालली होती, व तिच्या परिणामानें, व इंग्रजी शिक्षण व धर्मसंबंधीं उलट सुलट इंग्रजी पुस्तकें वाचून कांहीं मंडळीस धर्मांत सुधारणा करावी असें वाटूं लागलें, व त्यांनीं बंगाल्यांतील ब्राह्मसमाजाप्रमाणें इकडेही धर्मसुधारणेची एक संस्था स्थापन केली. पण ती एकदम ब्राह्मसमाज या मोठ्या नांवानें काढून पुढें न चालल्यास बरें नाहीं, ह्मणून या संस्थेची सुरवात आठवड्याची उपासना सुरू करून केली, व या सभेस इंग्रजी नांव Prayer Meeting असें देऊन, **त्याचें भाषांतर** 'प्रार्थनासमाज' हें नांव आहे. यावेळीं जीं तत्वें व इतर नियम ठरविले ते ब्राह्मसमाजाचे नियमांचे अनुरोधानें ठरविण्यांत आलेले आहेत. नंतर कांहीं वर्षांनीं ब्राह्मसमाज नांव घेण्याची सूचना समाजाच्या साधारण सभेपुढें आली. त्यावेळीं नांव बदलण्यास $\frac{२}{३}$ मतें पाहिजेत हा नियम नव्हता, व नांव बदलावें असा बहुमतानें ठराव झाला! परंतु तितक्यांत

कांहीं प्रतिष्ठित मंडळीनें भीड खर्चून या सूचनेचा निकाल पुढील सभेवर टाकावा अशी अध्यक्षांस विनवणी केली, व अध्यक्षांनीं ती मान्य केली. पुढील सभेंत ही सूचना येण्याच्या आधीं उलटपक्षानें बरचि खटपट करून नांव बदलणें वगैरे महत्वाच्या कामांस $\frac{2}{3}$ मतें असावींत असा नियम पास केला. यामुळें त्यानंतर नांवाचा प्रश्न जरी कांहीं वेळां सभासदांमध्यें निघाला होता, तरी अद्याप त्यास $\frac{2}{3}$ मतें मिळालीं नाहींत. १८७८ सालीं फक्त एक मत कमी पडलें होतें.

आतां ब्राह्म नांव घेण्याच्या वेळींच 'आम्हीं हिंदु आहों' हीं कल्पना जोरानें लक्षांत येण्याचें कारण काय याचा मानसशास्त्रदृष्ट्या विचार करूं. जी गोष्ट आपणांस करावयाची नसते, किंवा गोष्ट चांगली आहे, पण आपल्याकडून सध्यांच ती होईल कीं नाहीं अशी आपणांस शंका असते ती गोष्ट करण्यास आम्ही स्वतःस बांधून घेत नाहीं; पण जी गोष्ट करण्याविषयीं खरी कळकळ असते ती गोष्ट करण्यास बांधून घेण्यांत आह्मांस कांहीं वाटत नाहीं, कारण आमच्या हातून ती होणार नाहीं हा विचारही त्यावेळीं येत नाहीं. या साध्या नियमाप्रमाणें पाहिलें तर कांहीं ब्राह्म लोक स्वतः हिंदु नाहीं म्हणतात, म्हणून ब्राह्म नांव टाकण्याचें कारण ब्राह्म म्हणणें ह्मणजे हिंदु नाहीं ह्मणणें, व त्यामुळें हिंदु लोकांपासून निराळें होणें, यास त्या सभासदांची तयारी नव्हती असें दिसतें. ब्राह्म नांव टाकण्याचें दुसरें कारण त्या पक्षाकडून असें देण्यांत येतें कीं, इकडच्या मंडळीनें स्वतंत्रपणें विचार करून प्रार्थनासमाज काढला आहे, मग आम्ही ब्राह्म नांव कां घ्यावें? परंतु हें कारण वरवरचें आहे. वरील इतिहासावरून निदान इतकें दिसतें कीं, हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं म्हणून प्रार्थनासमाज निघाला नाहीं. व ह्मणून जर ही स्वतंत्रपणें सुधारणा करणारी संस्था असती, व सभासदांनीं आपल्या मतांप्रमाणें आचरण ठेविलें असतें तर साहजिकच त्यांस सुधारणा न करणाऱ्यांपासून निराळें व्हावें लागलें असतें. आम्ही हिंदु म्हणवूनही जरी सर्व सुधारणा अमलांत आणूं तरीही इतर लोक आमच्याशीं संबंध ठेवणार नाहींत. परंतु या पक्षाचा मुख्य मुद्दा जुन्या लोकांशीं संबंध ठेवून जितकी सुधारणा करतां येईल तितकी करावयाची, साधेल तर सुधारणा करावी, नाहीं तर पूर्वींची स्थिति तरी कायम राहावी हा असल्यानें ब्राह्म नांव न घेऊन त्यांनीं एक पाऊल मागें घेतलें, व हिंदु ह्मणवून दुसरें पाऊल मागें घेतलें. याचा परिणाम पहिल्या प्रकरणांत दाखविला आहे; व तेवढ्यानें कांहींची खात्री होणार नाहीं या भीतीनें पुढें जास्त उदाहरणें दिलीं आहेत.

२ या अल्पविवेचनावरून प्रार्थनासमाज हिंदु नाहीं असें ज्यांस वाटणार नाहीं, त्यांच्यासाठीं व इतर हिंदु लोकांसाठीं, प्रार्थनासमाजांनीं किंवा हिंदु सुधारकांनीं स्वतःस हिंदु ह्मणवावें काय? याचा पुनः थोडा विचार करूं. स्त्रियांस समान हक्क देण्यासंबंधीं हिंदु लॉ आह्मांस मान्य नाहीं, असें सुधारकांनीं निदान ह्मणत राहिलें पाहिजे; त्याशिवाय त्यांच्या मतांप्रमाणें कायद्यांत बदल होणार नाहीं, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हिंदु ह्मणवून हिंदु लॉमध्यें बदल होण्यास सर्व हिंदु लोकांचें त्यास पाठबळ पाहिजे; व ते मिळेपर्यंत

वाट पहाणें ह्मणजे एक वर्षाऐवजीं दहा वीस वर्षें या प्रमाणानें वाट पाहून, तोंपर्यंत आमच्या मतांविरुद्ध तो कायदा पाळणें होय. परंतु इतकी वाट पाहण्यापेक्षां, जे इतर हिंदूंप्रमाणें हिंदुधर्मी नाहींत, त्यांस आतांपासून निराळा कायदा मागतां येण्यासारखा आहे व त्यासाठीं जर हिंदु नांव सोडण्याचा प्रसंग आला तर तें सोडलें पाहिजे. दुसरी गोष्ट, प्रार्थनासमाज हिंदु आहे असें गृहीत धरलें तरीही ज्यांस खरोखरी सुधारणा करावयाची आहे, त्यांनीं कांहीं काळपर्यंत हिंदु नांव एकीकडे ठेवून आपण सुधारक आहों ही जागृति सतत ठेविली पाहिजे. सर्व सुधारणा पूर्णपणें आचरण्यास मनाची तयारी एकदम होत नाहीं हें खरें. जुन्या वाईट चालींचा तिरस्कार व सुधारणेविषयीं कळकळ हीं वाढलीं ह्मणजेच मन जास्त जास्त बळकट होतें. परंतु एकदां मनाचा निश्चय करून सुधारक ह्मणून पुढें आल्यावर नंतर एकही पाऊल मागें घेऊन चालत नाहीं. हळुहळु, साधेल तेव्हां व शक्य तितकी सुधारणा होऊं शकत नाहीं, हेंही मागें आलेंच आहे. म्हणून सुधारकांस आपण सुधारक आहों, आपल्यास आतां मागें जातां येत नाहीं ही जागृति नेहमीं असली पाहिजे. हिंदु नांवाखालीं मोडल्यानें ही जागृति राहत नाहीं, तर उलट सुधारणा बाजूस राहून इतर लोकांप्रमाणें आह्मीही जुन्या रीतीप्रमाणेंच वागूं लागतों. या आमच्या ह्मणण्यास प्रार्थनासमाजाचा आजपर्यंतचा इतिहास हिंदु ह्मटल्यानें सुधारणा झाल्या नाहींत हें दाखवून साक्ष देतु आहे; व सर्व जगांतील इतर धर्मांतील सुधारणेचा इतिहास, सुधारक इतर लोकांहून निराळे झाल्यानेंच सुधारणा कशा झाल्या, हें शेंकडों उदाहरणांनीं दाखवून पाठबळ देत आहे. इतक्या उपर ज्यांस हिंदु ह्मणवूनच सुधारणा करावयाच्या असतील त्यांनीं त्या करून दाखवाव्यात, इतकेंच आमचें म्हणणें आहे. आजपर्यंतच्या समाजाच्या इतिहासावरून स्त्रियांसंबंधींच्या सर्व जुन्या वाईट चाली समाजांत आहेत हें दाखविलेंच आहे. आतां इतर सुधारणा कितपत झाल्या आहेत हें पहा.

(१) आह्मी जातिभेद मानीत नाहीं. पण वागणें त्याप्रमाणें असतें तर वर्षोंवर्षी रोटीव्यवहाराच्या वेळीं जो अनुभव येतो तो कां आला असतां? प्रीतिभोजनानें प्रीति वाढण्याऐवजीं अप्रीति कां वाढत आहे? प्रीतिभोजनानें अप्रीति वाढते, ह्मणून मुद्दाम त्यावेळीं न येणारांची संख्या दरवर्षीं वाढत आहे, ही सर्व सभासद सुधारणा करीत आहेत, व त्यांची उन्नति होत आहे, याचीच खूण आहे काय? हा इतिहास जुना नसून गेल्या ४–५ वर्षांचा आहे, ही जास्त दुःखाची गोष्ट आहे; व दिवसेंदिवस ही स्थिति कां येत आहे याचा विचार न करतां, सुधारणा काय आहे व ती कशी होते याचा विचार न करतां, उलट सामाजिक सुधारणा करणें हें समाजाचें मुख्य काम नाहीं, तर धर्मसुधारणा मुख्य केली पाहिजे, ह्मणजे सामाजिक सुधारणेशिवाय धर्मसुधारणा होऊं शकेल, येथपर्यंत चुकीच्या कल्पना कित्येक सभासद प्रौढीनें बोलून दाखवीत आहेत. या गोष्टीनें या सर्वांवर कळस झाला आहे! या मुद्याचा पुढें उल्लेख येणार आहे.

( २ ) समाजाच्या लोकांनीं जुन्या लोकांशीं संबंध ठेवल्यानें हुंड्यासारखी वाईट चाल रूढी ह्मणून कित्येक सभासद बिन-

दिकत पाळीत आहेत. ही चाल सहज बंद होण्यासारखी आहे; पण केव्हां? देणें बंद होईल तेव्हां! पण देणें कठीण वाटत असूनही बंद कां होत नाहीं? तर या चालीच्या मुळाशींही स्त्रियांसंबंधींच्या हिंदु कल्पना आहेत ह्मणून! ही चाल कशी निघाली असावी याचा विचार केला तर असें दिसतें कीं ज्या पक्षास लग्नाची उत्सुकता असेल त्यानें दुसऱ्यास हुंडा म्हणजे लाच देऊन आपलें काम उरकून घ्यावें. हा व्यापार हुंडयाच्या चालींत अनेक तऱ्हेने दिसून येतो. कांहीं लोकांत मुलीबद्दल किंमत पडते, व कांहींत मुलाबद्दल पडते; पण मुलींची किंमत शेंकडयानें तर मुलांची हजारानें असते. शिवाय मुलींची किंमत फक्त तिच्या कुळाच्या श्रीमंतीप्रमाणें असते, पण आतांशीं मुलांची किंमत कुळाशिवाय पदव्यांनींही वाढली आहे. येथपर्यंत व्यापार झाला. पण पुढें त्यांत नीचपणाची भर पडते. आधीं सर्व करार झाल्यानंतर लग्नाच्या थोडा वेळ आधीं मुलाची किंमत चढवण्याची बरीच चाल आहे, व असा आयत्या वेळीं मागितलेला जास्त हुंडाही देण्याची चाल पडली आहे! यावरून काय दिसतें? हेंच कीं, आपल्या पापांचें प्रायश्चित्त ह्मणून ईश्वरानें जी ही मुलींची व्याद गळ्यांत बांधली आहे, ती कशी तरी, नव्हे हजारों रुपये खर्चूनही दुसऱ्याच्या गळ्यांत बांधावयाची, इतकीच हिंदु बापाची अक्कल असते. मुलगी ह्मणजे कःपदार्थ! मुलींचें सुख ह्मणून जगांत कांहीं नाहींच! मुलगी ह्मणजे आईनें १०–१२ वर्षांत स्वयंपाकीणीचें काम शिकवून, बापानें दुसऱ्याच्या घरीं राबण्यास पाठविण्याचा गुलाम आहे! एरव्हीं इतका इतका खर्च करून असल्या हलकटांच्या गळ्यांत बांधण्याइतकी मुलगी वर आली नसती. मुलींच्या शिक्षणासाठीं महिना १० रुपये खर्च ज्यांस झेपत नाहीं, त्यांची तिच्या लग्नासाठीं हजार रुपये हुंडा व हजार रुपये वर खर्च करण्यासाठीं बरीचशी शिल्लक पाडण्यांत हयगय होत नाहीं! या स्त्रियांसंबंधीं घातक हिंदु कल्पनांस बळी पडल्यानें हुंडा देणें बंद होत नाहीं; याच कल्पनांमुळें वधुपक्षास कमीपणा पतकरून वरपक्षाच्या पायीं लोटांगण घालावें लागतें; याच कल्पनांमुळें हल्लीं बाप मुलीस हजारों रुपयांचा जाच विकत घेऊन देत आहेत! होय, हल्लीं प्रत्येक घरीं मुलीस सासुरवास ह्मणजे जाच होत आहे. सासरच्या माणसांची बोलणीं किंवा मार प्रत्येक घरीं नसला, तरी मुलीस कोणच्या वयांत किती काम पडतें, कोणच्या वयांत किती मुलें होतात, याचा विचार केला ह्मणजे, आज इतकीं वर्षें हिंदुसमाजांत प्रत्येक मुलीस जाच होत आहे असेंच ह्मणावें लागतें. याप्रमाणें वाढ पूर्ण होण्यापूर्वींच कामामुळें, मुलांमुळें व आजारांनीं शरीर झिजण्यास लागून मरण्यापेक्षां तिला विहिरींत लोटली असती तर बरें असें तिलाही केव्हां केव्हां वाटूं लागतें. पण ही स्थिति कानांनीं ऐकून, डोळ्यांनीं पाहून व स्वतः अनुभवूनही प्रत्यक्ष आईबाप जर जागे होत नाहींत, मग सुधारणा होणार तरी कशी? हुंडा देणें बंद केलें तर फार तर कांहीं वर्षें मुलीचें लग्न लांबणीवर पडेल इतकेंच; कारण हुंडा मुख्यतः वराच्या बापास हवा असतो, पण वराचा संबंध वधूशीं असतो ह्मणून त्यास गरज असेल तेव्हां तो हुंड्याशिवाय आपण होऊन लग्नास तयार होईल. ही स्थिति आजपर्यंत हिंदु लोकांप्रमाणें प्रार्थनासमाजाच्या कांहीं लोकांतही

कां चालत आली ? त्यांसही मुलीच्या लग्नाची इतकी घाई कां असते ? तर ह्या कल्पना त्यांच्याही डोक्यांतून गेल्या नाहींत ह्मणून. व स्त्रियांसंबंधीं या हलक्या कल्पना जोंपर्यंत समूळ नाहींशा होणार नाहींत, तोंपर्यंत धर्मसुधारणा, समाजसुधारणा, व देशसुधारणा या तोंडाच्या गप्पाच राहणार. लग्नासारखा मंगलप्रसंग जोंपर्यंत व्यक्तीच्या नाशाचें बीं पेरणारा अमंगल प्रसंग राहील, तोंपर्यंत कितीही मंत्र घोकले व धूप जाळले; किंवा सामाजिकांनीं त्याऐवजीं लांब लांब प्रार्थना केल्या तरी परममंगल परमेश्वर अशा अमंगल प्रसंगीं कधींही येणार नाहीं, व आमच्या त्या वेळच्या व इतर वेळच्या प्रार्थना अरण्यरुदनाप्रमाणें व्यर्थच होणार !

( ३ ) ' आह्मी हिंदु ' ह्मणून कांहीं सभासद मुलांची मुंज करतात. मुंज करण्यांत कांहीं वाईट नाहीं, पण हल्लीं इतर लोकांप्रमाणें आह्मीही मुंजीचा फार्स करणें हास्यास्पद आहे. मुंज म्हणजे हल्लीं जानवें अडकवण्याचा विधि झाला आहे, व म्हणून ज्या सभासदांस जुन्या लोकांशीं संबंध ठेवायचा असतो त्यांस हा जानवें अडकवण्याचा विधि करावा लागतो. जानवें घालणारे सभासद त्याबद्दल इतरही कारणें देतात, पण मुख्य कारण हेंच आहे; एरव्हीं त्यांनीं हा हास्यास्पद विधि केला नसता. मुलांस हा विधि किती आवडतो हें त्यावेळीं ठेवलेली शेंडी किती दिवसांत नाहींशी होते, हें पाहिलें ह्मणजे दिसून येईल. हीच स्थिति आज कित्येक हिंदु लोकांचीही झाली आहे, व ती त्यांस चालत आहे, म्हणजे जानवें असून सोंवळें नेसलें म्हणजे हिंदु होण्यास जास्त कांहीं लागत नाहीं. पण सामाजिकांनीं इतर लोकांत मिसळण्यासाठीं जानवें ठेवणें व प्रसंग पडल्यास सोवळें नेसणें, म्हणजे इतरांच्या दांभिक वर्तनांत भर घालणें होय. व म्हणून ज्यांस खरी धर्मसुधारणा करणें असेल त्यांनीं जानव्याच्या पाशांतून निराळें झालें पाहिजे.

( ४ ) स्वतःस हिंदु म्हणण्याचा फायदा काय ? तर कांहीं लोक म्हणतात कीं, हिंदु धर्मांतील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या कायम राहतात. उदाहरणार्थ, 'मातृदेवो भव' ही हिंदु आज्ञा आम्ही हिंदु म्हटल्यानें मनावर जास्त ठसते. हल्लीं हिंदु मुलांचें उच्छृंखळ वर्तन आढळतें, त्याचें कारण या आज्ञा पाळल्या जात नाहींत, हें त्यांस कबूल आहे; मग हिंदु ह्मटल्यामुळें या आज्ञा पाळल्या जाण्यास काय मदत होते ? इतर कोणत्या गोष्टी पाळल्या जाण्यास हिंदुत्वाची मदत होत असेल तीं असो, पण ' मातृदेवो भव ' ही आज्ञा पाळली जाण्यास हिंदुधर्मांतील स्त्रियांविषयींच्या कल्पनांनीं उलट हरकत मात्र येते ! ' पितृदेवो भव ' ही आज्ञा पाळली जाऊन ' मातृदेवो भव ' ही आज्ञा पाळली जात नाहीं, याचें कारण काय ? बापाच्या अर्ध्या वचनांत असून आईस उलट उत्तरें देणारे मुलगे आज हिंदु लोकांत पुष्कळ सांपडतात, व समाजाच्या लोकांतही सांपडतात याचे कारण काय ? तर स्त्रियांसंबंधीं इतर हिंदु कल्पना. ' बायकांचें शहाणपण चुलीपुढें ' या प्रकारचे उद्गार जे ऐकण्यांत येतात, त्यांचा मुलांवर काय परिणाम होतो, इकडे कोणी लक्ष देत नाहीं. पण त्याचा परिणाम असा होतो कीं, आईवर अवलंबून असण्याच्या काळांत जो मुलगा तिच्या आज्ञेंत असतो, तोच आपल्या पायावर हिंदु लागून कान फुटले म्हणजे

आईची पर्वा करीत नाहीं, आई ह्मणजे घरांतील काम करणारी बाई याप्रमाणें कांहीं काम सांगावयाचें असलें तर ओरडून सांगतो, पण आज्ञा ऐकून . घ्यावयाचीच शंका, मग पाळावयाची गोष्ट दूरच ! हिंदु कल्पनांप्रमाणें विधवा आईचा व मुलाचा संबंध असा आहे—'भर्तृजन्माहि तनयस्तदाज्ञां परिपालयेत्' ह्मणजे विधवा स्त्रीनें आपल्या मुलाचे आज्ञेंत राहिलें पाहिजे, कारण मुलगा हा नवऱ्याचा अंश आहे. याच्या जोडीस 'मातृदेवो भव' या कल्पनेची काय मातबरी राहते ? ही विधवा आयांची गोष्ट सोडली तरी, मुलगा आईस उलट उत्तरें देतो हें बापास माहीत असतांही तीच स्थिति चालू असते याचें कारण काय ? तर बापाच्या स्त्रियांसंबंधीं हलक्या कल्पना; व जर त्याच्या कल्पना हलक्या नसल्या तर तो त्याचा हलगर्जीपणा ह्मटला पाहिजे. हा हलगर्जीपणा सामाजिकामध्येंही आढळतो, व आजपर्यंत स्त्रियांच्या हक्कांसंबंधीं पुरुषांनीं कांहींही विचार केला नाहीं, याची ही साक्ष आहे. स्त्रियांची इतर बाबतींत योग्यता वाढल्याशिवाय ' मातृदेवो भव ' ' अर्धभार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमो मतः' इत्यादि कल्पना कल्पनाच राहणार, व हिंदु ह्मटल्यानें इतर हिंदु कल्पनांमुळें त्या पाळल्या जाण्याऐवजीं उलट प्रकारच होणार !

३ सामाजिक सुधारणेशिवाय धर्मसुधारणा होत नाहीं, तर उलट धर्मसुधारणेचा पायाही वहात जातो असें पूर्वीं ह्मटलेंच आहे. पण तेवढ्यानें कित्येकांचें समाधान होणार नाहीं, व सामाजिक सुधारणेशिवाय धर्मसुधारणा होऊं शकेल असें कांहीं प्रमुख सभासदांचेंही मत असल्यानें येथें [illegible] आमचें ह्मणणें पुनः सांगितलें पाहिजे. फक्त धर्मसुधारणा होणें ह्मणजे काय ? तर ,आत्म्याची उन्नति होणें, ईश्वरप्राप्ति होणें, प्रार्थनेची गोडी लागणें, इत्यादि. पण ज्याची खरी आत्मिक उन्नति होईल, ज्यास ईश्वराचें दर्शन होईल तो आपल्या मतांप्रमाणें आचरण करण्यास मागें घेईल काय ? शक्य नाहीं. पण हेंही शक्य मानलें तरी सभासदांमधील धर्मजागृति, त्यांची धार्मिक उन्नति, यांचा पुरावा मंदिरांत उपासनेस न आलें तरी हरकत नाहीं, घरींही प्रार्थना न केली तरी हरकत नाहीं, हाच काय ? मंदिरांत येण्यानेंच उन्नति होत नाहीं हें खरें, पण मंदिरांत न येतां घरीं प्रार्थना करणारे बहुतेक आढळत नाहींत. जे घरीं प्रार्थना करतात त्यांस मंदिरांत जावें कीं नाहीं हा प्रश्नही येत नाहीं, व त्यावेळीं त्यांस इतर कामेंही येत नाहींत ! याशिवाय बाकीच्यांत, घरीं प्रार्थना न केली तरी नियमानें मंदिरास येणारे कांहीं आहेत, पण ते फार थोडे. कांहीं इतर काम नसेल तेव्हां नियमानें उपासनेस येतात; पण दुःखाची गोष्ट इतकीच आहे कीं, हल्लींचे दिवस असे आहेत कीं, बरींचशीं कामें रविवारीं करावयाचीं असतात, त्यामुळें तीं सर्व संभाळून उपासनेस येणें जरा कठीण जातें. याशिवाय इतर सभासद असे आहेत कीं, ज्यांस मंदिरास येण्यास कधींच फुरसत होत नाहीं, व त्यांपैकीं कांहीं 'प्रार्थनेस मंदिरांतच कशाला आलें पाहिजे ?' असाही वाद करितात यांस सरळ उत्तर इतकेंच कीं, ' मंदिरांत आल्यानें जी प्रार्थनेची संधि तरी मिळते, ती तुह्मांस घरीं मिळत नाहीं.' असो. या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, बाहेरील लोक न आल्यास

कोठें कोठें वक्ता व श्रोता एकच होण्याची भीति असते ! ही सामाजिक उपासनेची पद्धत आह्मी खिस्त्यांची घेतली आहे, पण त्यांची मंदिरांत जाण्याची रीत मात्र आह्मी घेतली नाहीं. त्यांच्यांत सर्व कुटुंब मंदिरांत जातें व इकडे कित्येकांच्या घरांतलि बायकां-मुलें जुन्या मताचीं असतात ! ईश्वरकृपेनें तीं नव्या मताचीं असलीं तरी सर्वांनीं मंदिरांत गेलेंच पाहिजे असें कोणासच वाटत नाहीं; त्यामुळें हे सभासद जरी मंदिरांत येतात तरी त्यांच्या बायकांमुलांस इतर कांहीं काम असतें, किंवा को॰. टण्यास किंवा हवा खाण्यास जावयाचें असतें. कित्येकांस उपासनेच्या वेळींच दुसरीकडे व्याख्यान देण्यास किंवा ऐकण्यास जाण्यास कांहींच वाटत नाहीं ! मंदिरांत येण्याची गोष्ट क्षुल्लक दिसते, पण तें आमच्या धार्मिक आचरणाचें एक चिन्ह असल्यानें महत्वाचें आहे. मंदिरांत येण्यानेंच धार्मिकपणा येतो असें जरी नाहीं, तरी जागृति होण्याचा तो एक प्रसंग असतो, व त्यामुळें मनावर चांगला परिणाम होत असतो. म्हणून सर्व कुटुंबासह मंदिरास जाण्याचा धडा आम्ही खिस्ती लोकांपासून शिकला पाहिजे. ही जर फक्त मंदिरांत येण्याची गोष्ट तर मग घरीं बहुतेक कोणी प्रार्थना करीत नाहीं, कित्येकांस प्रार्थना करतां येत नाहीं, कित्येक भजन करतात, पण त्या पदांच्या अर्थाकडे मुळींच लक्ष देत नाहींत, इत्यादि गोष्टींनीं पाल्हाळ करण्याची काय गरज ? पण हीं सर्व धर्मसुधारणेचीं चिन्हें काय ? समाजाचा धर्म हा प्रत्येक व्यक्तीचा धर्म आहे; ह्मणजे बापानें प्रार्थना केली तर तिचा मुलांस कांहीं उपयोग नाहीं, तर प्रत्येकाची निरनिराळी उन्नति व्हावी लागते. पण हें धर्माचें रूप कायम ठेवण्याकडे किती सभासदांचें लक्ष आहे ? या हयगयीचा परिणाम सभासदांच्या मागें त्यांच्या घरांतलि इतर कोणीहि समाजांत राहात नाहीं हा स्पष्ट दिसत आहे; व यासंबंधीं पुष्कळ वेळां ओरडही ऐकूं येते, पण याचा कोणीही खोल विचार करीत नाहीं. घरच्या मंडळीस वळण न लावणें ही त्या एका सभासदाची चूक आहे; पण अशीं अनेक उदाहरणें पाहूनही प्रत्येक सभासदानें आपल्या कुटुंबासह समाजाचीं मतें स्वीकारिलीं पाहिजेत, असा सर्व सभासद आग्रह धरीत नाहींत, ही सर्व सभासदांची चूक आहे. एका दृष्टीनें अशीं सभासदांचीं मुलें समाजांत नाहींत हें चांगलेंच झटलें पाहिजे, कारण त्यांच्यामुळें ज्याप्रमाणें संख्येंत भर पडत नाहीं. त्याप्रमाणें समाजांतलि दांभिकपणांतही भर पडत नाहीं !

हा समाजांतील दांभिकपणा म्हणजे आणखी कांहीं नसून, रोज किंवा बरेच वेळां भजन व प्रार्थना करून धार्मिक उन्नति झाली असें म्हणविणारांचें सामाजिक बाबतींत मागें पाऊल घेणें होय. एखादी गोष्ट कर्तव्य वाटली तरी ती वाटेल तर करावी, हाच प्रार्थनेचा परिणाम काय ? सत्य, न्याय, व दया हीं ईश्वरी तत्वें असतां त्याप्रमाणें वागण्याइतकें धैर्य प्रार्थनेनें प्राप्त होत नाहीं काय ? दया दूर राहो, पण केवळ न्याय म्हणून स्त्रीजातीस समान हक्क दिले पाहिजेत, इतकी न्यायबुद्धि प्रार्थनेनें जागृत होत नाहीं काय ? ईश्वरावर ज्याचा विश्वास असेल तो या प्रश्नास 'नाहीं' असें कधींही उत्तर देणार नाहीं. मग सामाजिक सुधारणेशिवायही धर्मसुधारणा

होईल याचा अर्थ काय? इतकाच कीं धर्माचें ढोंग वाढेल! धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा हें शब्द दोन आहेत, पण वस्तु एकच आहे असें म्हटलें तरी चालेल. धर्मसुधारणेनें आत्म्याची उन्नति होते व खरी उन्नति झाल्यास मतांप्रमाणें आचरणें, कर्तव्य तें केलेंच पाहिजे, हें त्याबरोबरच येतें. मन उदार झालें ह्मणजे एका गोष्टींत उदार व एका गोष्टींत अनुदार असा फरक होणें शक्य नाहीं. ह्मणून एका गोष्टींत अनुदारपणा दिसला कीं मन खरें उदार झालेंच नाहीं असें स्पष्ट ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. मन एकदां उदार झालें व सर्व मनुष्यें ईश्वरापुढें सारखीं आहेत, व सर्वांस स्वतःची उन्नति करण्याचा सारखा हक्क आहे, इतकें कबूल असलें ह्मणजे जातिभेद राहत नाहीं, खालीं दडपलेल्या जातींवरील दडपण नाहींसें होतें, व पुरुष व स्त्रिया सर्व प्रकारच्या गुलामगिरींतून सुटतात. परंतु आधीं कितीही पापी असूनही पश्चात्तापानें ज्याप्रमाणें तोच एकदम पुण्यात्मा होतो, त्याचप्रमाणें कर्तव्यपराङ्मुख झाल्यानें पुण्यात्म्याचीही एकदम अवनति होते. एक वेळ धर्मसुधारणेशिवायही सामाजिक सुधारणा होऊं शकेल, कारण नास्तिक लोकही उदार व सुधारक होऊं शकतात. पण सामाजिक सुधारणेशिवाय धर्मसुधारणा होणें अशक्य आहे. समुद्रांत बुडून कोरडे राहणारे दगडच असतात.

४. आतां शेवटला मुद्दा **नियमांनीं काय होतें?** हा आहे. आह्मी आतांपर्यंत कांहीं सुधारणा होण्यासाठीं त्याप्रमाणें नियम केले पाहिजेत असें ह्मटलें आहे. पण नियम केल्यानें त्याप्रमाणें सभासद वागतात काय? असा कित्येक प्रश्न करतात. असा प्रश्न करणारांस सुधारणा कशी होते हेंच माहीत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. नियमांनीं कांहीं होत नाहीं, मग कशानें काय होतें? मग हीं समाजाचीं ६ तत्वें कशाला? व शिवाय समाजाच्या सभेचें काम कसें चालावें या संबंधीं ' नांव बदलण्यास ३/४ मतें पाहिजेत ' इत्यादि नियम मुद्दाम ठरविण्याचें काय कारण? आमच्या सभेचें कामही जर आमच्या स्वाभाविक शहाणपणानें [ Common sense ] चालत नाहीं, मग सामाजिक चाली नियमांशिवाय कशा अमलांत येतील? नियमांनीं कांहीं होणार नाहीं, या ह्मणण्यांत इतकाच अर्थ आहे कीं, असें ह्मणणारांस त्या नियमांप्रमाणें वागावयाचें नाहीं, व ह्मणून ते स्वतःस नियमांनीं बांधून घेण्यास तयार नाहींत. हेंच कारण समाजाचीं मतें मान्य असतांही समाजांत न येणारांचें आहे. पण आपल्याच्यानें वागणें होणार नाहीं ह्मणून हे लोक समाजांत येत नाहींत, व नियम नको ह्मणणारे समाजांत येऊन मतांप्रमाणें वागत नाहींत, इतका दोघांत फरक आहे. एका व्यक्तीसही कांहीं कांहीं बाबतींत वागण्याचे नियम ठरविण्याची अवश्यकता भासते. मग सुधारकांच्या समाजांत सर्वांचें सारखें आचरण होण्यास नियमांची किती तरी जास्त अवश्यकता आहे. उदाहरणार्थ, समाजाचा एक लग्नविधि असून तो प्रत्येक सभासदानें पाळणें अवश्य आहे. कारण हल्लीं जरी तो कायद्याच्या दृष्टीनें कायदेशीर नसला तरी आमच्यांतील रूढी ह्मणून पुढें त्यास कायदेशीर महत्व येण्याचा संभव आहे. पण हल्लीं समाजाचा असा समजला जाणारा

जो विधी आहे त्याप्रमाणें फार थोडीं लग्नें होतात, व इतर कांहीं जुन्या विधीनें, कांहीं रजिस्टर करून, व कांहीं नवसंहितें-तील विधीनें होतात. याप्रमाणें समाजांत ४ विधी चालू असतां, व सभेनें कोणताही विधी समाजाचा ह्मणून ठरविला नसतां, समाजाचा असा समजला जाणारा विधी रूढीनें कायदेशीर ठरण्याची कितपत आशा आहे ?

यासाठीं कांहीं बाबतींत नियमांची अवश्यकता आहे. हुंडा देऊं नये, दारू पिऊं नये, मंदिरांत यावें, इत्यादि गोष्टींब-द्दल जरी नियम करण्याची गरज नाहीं, तरी आम्ही स्त्रियांसंबंधीं सुचविलेले नियम करणें अवश्य आहे; व त्याचप्रमाणें सभासदांच्या कुटुंबांनींही सभासद झालें पाहिजे असा नियम करणें अवश्य आहे. कारण त्यामुळें स्त्रियांची धार्मिक उन्नति होते, व सर्व कुटुंब समाजा-चें होतें. याप्रमाणें महत्वाचे नियम करूनही ज्यांस त्याप्रमाणें वागावयाचें नसेल, किंवा जे वागणार नाहींत त्यांनीं आजपर्यंतच्या पापां-ल प्रायःश्चित्त घेऊन पुनः हिंदुधर्मांत जाणें ,स्त चांगलें. सभासद होतांना 'समाजाच्या मतांप्रमाणें वागणें माझें कर्तव्य मी समजतों' अशी शपथ घेऊनही कर्तव्यपराङ्मुख होणारे सभासद समाजांत राहण्यास योग्य नाहींत. अशा लोकांसाठीं हल्लींचा हिंदुधर्म आहे. समाज ओस पडला तरी हरकत नाहीं, पण असे लोक समाजांत मोडून समाजास कमीपणा न येईल अशी इतरांनीं काळजी घेतली पाहिजे. कांहीं ठिकाणीं दीक्षित ह्मणजे मतांप्रमाणें वागणारे, व अदीक्षित ह्मणजे मतांप्रमाणें वागण्याचा यत्न करणारे, असे सभासदांचे दोन वर्ग आहेत. पण अशानें कधीं सुधारणा होत नाहीं. जे धर्मसुधारणेच्या पायावर सर्व सुधारणा करणार, धर्माच्या पायावर ज्यांचें सर्व वर्तन होणार, त्यांचा सभासद होतांनाही ईश्वरावरील विश्वास इतकाच असावा काय, कीं त्यांस मताप्रमाणें वर्तन होईल कीं नाहीं, याचीही शंका असते ? ज्या-प्रमाणें मूर्तीपूजा पहिली पायरी ह्मणून पुष्क-ळांची मूर्तिपूजा मरेपर्यंत सुटत नाहीं त्याप्र-माणें या सभासदांचा अदीक्षितपणाही कधीं सुटत नाहीं, ही दुःखाची गोष्ट आहे. ब्राह्म व प्रार्थनासमाज आर्यसमाजाप्रमाणें अर्धवट सुधारणा करण्यासाठीं निघाले नाहींत. व ह्मणून सभासदांचे असे वर्ग असण्या-ची कांहीं गरज नाहीं. समाजाचीं मतें एका वेळेपुरतीं तरी ठरलेलीं आहेत, (त्यांत बदल होऊं शकतो ही निराळी गोष्ट आहे. ) व त्याप्रमाणें वागणें ज्यांस कर्तव्य वाटत असेल, अशांनीं आपल्या आचरणानें व उपदेशानें त्या मतांचा प्रसार करण्यासाठीं सभासद व्हावें हा उद्देश आहे. या कामास अर्धवट सुधारकांचा अडथळा मात्र होणार; ह्मणून अशांनीं पूर्ण तयारी असल्याशिवाय सभासद होऊंच नये. कोणच्याही सुधारणेचा प्रसार करारीपणाशिवाय होत नाहीं, हें आजपर्यंतचा जगाचा इतिहास सांगत आहे, व तुकोबासारखे साधुसंत हा इतिहास माहीत नसतांही, स्वानुभवानें सुधारणेस करारीपणा-चीच आवश्यकता आहे, हें 'नये मार्गें पाहों वाट फिरोनियां। दुसरा संगिया सहाकारी,' 'तुका ह्मणे येथें करारांचें काम। मग सुख-धाम जवळीच,' इत्यादि स्पष्ट शब्दांनीं सांगत आहेत. हा तुकोबांचा उपदेश अजून तरी सर्वांच्या अंतःकरणांत ठसेल काय ? इतर लोकांस धर्माविषयीं अनास्थे-बद्दल उपदेश करण्याच्या आधीं सामा-

जिकांतील समाजाविषयींची अनास्था जाईल काय?

ब्राह्म व प्रार्थनासमाजी बंधुहो, आतां मागील वर्षांत कांहीं काम झालें नाहीं ह्मणून शोक करूं नका, किंवा पुढील कामाच्या यशाबद्दल निराश होऊं नका. पहिल्या प्रथम समाजास नक्की स्वरूप द्या, समाजाची आचरणाची एक दिशा ठरवा; आपल्या उदात्त मतांप्रमाणें प्रत्येक गोष्टींत वागण्याचा निर्धार करा, व तुमची उन्नति, तुमचें हित करून घ्या. समाजांत प्रविष्ट होणें म्हणजे सत्य, न्याय, व दया तत्वांप्रमाणें वागून उन्नीत करणें आहे असें आपल्या आचरणानें दाखवा. ह्मणजे उपदेशाची गरज न पडतां ज्यात आपलें हित करणें असेल तो न बोलावतां समाजांत येईल, व समाजाचा प्रसार होईल. परंतु दुसरे येवोत किंवा न येवोत आपणांस जो मार्ग सत्य ह्मणून ईश्वरानें दाखविला आहे, त्या मार्गानें त्याच्यावर विश्वास ठेवून जाण्यास कधीं मागें घेऊं नका. ज्यांस सुधारणा करावयाची नसेल त्यांनीं सभासद राहूं नये असें आह्मी ह्मटलें खरें पण असें करण्याची सध्यां कोणा सभासदास गरज पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. व जरी कोणी तसा असेल तर त्यास आमची इतकी सूचना आहे कीं मागें जाण्याचे आधीं तुह्मी सभासद झालांत त्यावेळीं तरी या मतांप्रमाणें वागण्याची तुमच्यांत जी जागृति झाली होती, तिची आठवण करा! ती जागृति पुनः होऊं द्या, पुनः एकवार ईश्वरास आठवा, त्याची कास धरा व स्वतःच्या हितासाठीं आपल्या मताप्रमाणें वागण्याचा निश्चय करा तुमचा पाया बळकट करा, स्वतःचा निर्धार करून कुटुंबास सुधारणेस अनुकूल करा- ह्मणजे सर्व सुधारणांचा मार्ग सरळ व सोपा होईल. आपल्या बायकांमुलांस शिक्षण द्या ह्मणजे तीं तुमच्या हेतूच्या आड न येतां तुह्मांस मदतच करतील. **ज्याच्या इच्छेनें सर्व विश्वाची सतत उन्नति होत आहे तो दयाघन परमेश्वर आपल्या सर्व बालकांस आपल्याजवळ ओढील यांत कांहीही शंका नाहीं.**

समाप्त.

REFBK-0001516

७५७६

# विनंति

या पुस्तकाच्या ... साठीं माझ्या बऱ्याच मित्रांनीं पुस्तक तयार होण्याचे ...
जी द्रव्याची मदत केली, तीबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्र...
इंदुप्रकाशच्या मालकांनीं पुस्तक कमी खर्चांत छापून दिल्याबद्दल त्यांचेही
आभार मानतों. ही सर्व मदत व्यर्थ न जावी म्हणून हातीं घेतलेलें हें कार्य ...
मित्रांचे साहाय्यानें पुढें चालू ठेवण्याचा विचार आहे. व त्यासाठीं मदत
या पुस्तकास किंमत ठेविली आहे. ज्या सद्गृहस्थांकडे हें पुस्तक आगाऊ प...
जाईल, त्यांस इतकीच विनंति आहे कीं, त्यांस या कार्यास जी कांहीं मदत ...
असेल ती त्यांनीं 'रा. रा. द्वा. गो. वैद्य, युनिव्हर्सिटी ऑफिस, मुंबई'
पत्त्यावर पाठवावी. सर्वांकडून निदान किंमत तरी येईल अशी मला बळकट अ...
आहे. ज्यांस किंमतीपेक्षां जास्त द्रव्याची मदत करणें शक्य नसेल त्यांस आप...
मित्रांमध्यें या पुस्तकाचा प्रसार करूनही या कार्यास बरीच मदत करितां येई...
त्यांनीं आपल्या मित्रांचीं नांवें व पत्ते कळविल्यास त्यांस पुस्तक पाठविलें जाईल.

कर्ता.

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

मुंबई—प्रसिद्ध बुकसेलर्स.

इंदूर—रा. रा. क. स. केळकर, ब्राह्ममंदिराशेजारीं.

पुणें—रा. रा. वि. सि. जव्हेरे, गणेश पेठ.

हेका होईल तितका चालवायचा. सीतेला रामाची घमेंड, तेव्हां ती ह्मणाली, " छे, छे, पळणें शक्य असलें तरी मी येणार नाहीं; कारण रामाच्या बायकोस दुसऱ्यानें सोडवणें त्याच्या नांवास शोभत नाहीं. तेव्हां त्याला असें सांग कीं, मी तूं येऊन सोडविण्याची वाट पाहात आहें." वानर-राक्षसांचें व राम-रावणाचें इतकें भयंकर युद्ध यामुळें झालें! रावणानें तिला पळविली तशी हनुमानानें परत आणिली असती तर कदाचित् लढाई टळली असती. व जरी रावण संतापून लढाईस आला असता तरी लढाईच्या दृष्टीनें तें या पक्षास जास्त सोयीचें होतें; सेतू बांधण्याची गरज नव्हती, व शिवाय या पक्षास आपल्या देशांत राहून लढण्याचा फायदा मिळाला असता. या लढाईच्या गोष्टीशिवाय, आमच्या मतें दुसरा मोठा फायदा हा झाला असता कीं, सर्व युद्ध संपेपर्यंत सीता राक्षसांचे हातीं असल्यानें रामाच्या मनांत जो तिच्यासंबंधीं ग्रह हाल चालला होता, तो झाला नसता. परंतु ही गोष्ट झाली नसती तर रामायणच झालें नसतें! सारांश, कवीच्या पुढील उद्देशास सीतेच्या या दोषाची मदत होते. सीतेची ही चूकच झाली असें अशानें दिसतें कीं, राम जरी मोठा पराक्रमी असला तरी त्याच्या त्या वेळच्या स्थितीचा तिनें विचार केला नाहीं. महाभारतांत ज्या प्रमाणें उठतां बसतां अद्भुत चमत्कार वर्णिले आहेत तसे रामायणांत फारसे नाहींत. रामास जरी विष्णूच्या अर्ध्या अंशाचा अवतार ह्मटलें आहे तरी त्याच्या स्वतःच्या तोंडीं 'मनुष्याच्या पराक्रमानें जें कांहीं शक्य तें मीं केलें' असे शब्द आहेत. तेव्हां तो कांहीं तरी अद्भूत चमत्कार करून आपल्यास सोडविल अशी सीतेसही आशा नसावी. केवळ दोघां भावांशिवाय त्यांच्या लोकांपैकीं कोणी जवळ नसतांही, एवढ्या मोठ्या रामाची बायको एका अर्धवट रानटी माणसानें परत आणण्यानें रामाची अब्रू जाते इतकाच विचार तिच्या मनांत असला पाहिजे. याचेंच पुष्टीकरण पुढें असें होतें कीं, लढाई आटपल्यावर हनुमान जेव्हां पुन्हा सीतेस सर्वांचे आधीं भेटला तेव्हां त्याच्या बोलण्यांत, 'माझ्या हातून सेतू तयार झाल्यानें ही प्रतिज्ञा शेवटास गेली आहे,' असें त्यानें ह्मटलें आहे; व पुन्हा रामही सीतेस पहिल्यानें हेच सांगतो कीं, 'समुद्रांचें उल्लंघन व लंकेचें मर्दन हें हनुमानाचें काम आज सफळ झालें.' एकंदर लढाईंतील हनुमानाचें काम पाहिलें ह्मणजे त्याच्याशिवाय जय मिळणें अशक्य होतें असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं. असो.

रावण मेला व लढाई संपली. पण येथूनच सुखाचें पारडें फिरत चाललें. आतां सीतेस भेटावयाचें ह्मणून आधीं हनुमानास तिला हें जयाचें वर्तमान कळवून तिचा निरोप आणण्यास पाठविलें. येथपर्यंत रामांत झालेल्या फरकाचा उल्लेख नाहीं पण जय झाल्याचें ऐकून सीतेच्या आनंदास पार राहत नाहीं, व 'आपणांस भेटण्याची इच्छा आहे' असा तिचा निरोप ऐकतांच रामास अश्रू लोटतात, व तो ध्यानस्थ होतो. नंतर 'स्नान करून व नटवून' सीतेस आणण्यास बिभीषणास पाठविलें, व पुनः रामाची समाधि लागली. (कारण आतां डोकें फिरत चालल होतें.) स्नान केल्याशिवायच रामास भेटण्याची तिची इच्छा असतांही, बिभीषणानें 'तुझ्या नवऱ्यानें

सांगितलें आहे' असें ह्मणून नवऱ्याच्या हुकूमाची आठवण करून दिल्यानंतर ती त्याप्रमाणें सजून आली. स्नान केल्याशिवाय भेटण्यानें आजपर्यंत आपण कसे दिवस काढले हें दाखविण्याचें तिच्या मनांत असलें पाहिजे तिची पालखी जवळ आली, व ती रामापर्यंत आणण्यासाठीं बिभीषणानें रामाभोंवतीं जमलेल्या वानर व राक्षस सेनेस बाजूस करण्याचा प्रयत्न केला. रस्त्यावर खेळ करणाऱ्या गारुड्यांस आपणांस हव्या तेवढ्या जागेच्या पलीकडे मुलांमाणसांस ठेवतांना कोण त्रास पडतो, मग त्या गराड्यांतून रस्ता काढतांना थोडी गडबड झाल्यास काय नवल ? पण त्या गडबडीनें नुकत्याच अभिषेक केलेल्या बिभीषणावर ही राम रागावला, व 'पालखीची गरज नाहीं; सर्वांसमक्ष तिला पायींच आण' असें ह्मणाला. येथें कवीनें रामाच्या मनांत या वेळीं जी खळबळ चालली होती ती दाखविली आहे. सीतेनें विस्मयानें, आनंदानें, व प्रेमानें रामाकडे पाहिलें,' व राम आपलें हृद्गत याप्रमाणें बोलूं लागला:

"हे कल्याणि, संग्रामामध्यें शत्रूचा पराजय करून तुला मी जिंकून आणलें आहे. पुरुषप्रयत्नानें जें कांहीं शक्य तें हें मीं केलें आहे. आज क्रोधाची समाप्ति होऊन, शत्रूनें केलेल्या स्त्रीहरणरूपी अपमानाचीही मी फेड केली आहे. आज माझा पराक्रम लोकांस दिसला; आज माझ्या श्रमाचें सार्थक झालें; आज मीं आपली प्रतिज्ञा शेवटास नली आणि आज मी स्वतंत्र झालों. राक्षसानें तुला नेलीं हा अनर्थ दैवानें घडला, व तो मी मनुष्यपराक्रमानें नाहींसा केला." याप्रमाणें भाषण ऐकून सीता अश्रूंनीं भरून गेला, व रामाचें हृदय लोकापवादाच्या भीतीनें द्विधा झालें, असा रामाच्या अर्ध्या भाषणांत कवीचा उद्गार आहे, व यावरून त्यानें लोकांनीं ब्रही काढला नसतां केवळ रामाच्या साशंकवृत्तीसच त्याच्या कल्पनेनें लोकापवादाचें स्वरूप आलें, असें सुचविलें आहे. पुढें राम ह्मणतो—"तुझें कल्याण असो. **हा जो युद्धाचा खटाटोप मीं केला व मित्रांच्या सामर्थ्यानें ज्यांतून मी पार पडलों, तो मी तुझ्यासाठीं केला नाहीं.** अपवाद टाळण्यासाठीं, व वंशाचा कमीपणा नाहींसा करण्यासाठीं हे मीं केलें. परंतु नेत्ररोग्यास जसा दिव्यानें त्रास होतो तशी तूं तुझ्या वर्तनाबद्दल संदेह उत्पन्न झाल्यानें माझ्या दृष्टीस अति प्रतिकूल झाली आहेस. तस्मात् हे जनककन्ये, मी तुला अनुज्ञा देतों. तूं आज वाटेल तिकडे चालती हो. या दहा दिशा तुला मोकळ्या आहेत. **तुझ्याशीं मला आतां कांहीं एक कर्तव्य नाहीं.** रावणाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या व त्यानें दोषदृष्टीनें पाहिलेल्या तुझा, **कुलीन ह्मणविणारा मी** कसा स्वीकार करूं ? ज्याकरितां मीं तुला जिंकिलें तो माझा उद्देश सिद्धीस गेला आहे. आतां तुझ्या ठिकाणीं माझी आसक्ती नाहीं. तुला वाटेल तेथें तूं रहा. **मनाचा निश्चय करून ही गोष्ट मीं तुला सांगितली आहे.** हे सीते, दिव्यकांतीनें युक्त व मनोहर अशा तुझी रावण स्वगृहीं एक क्षणभरही उपेक्षा करणार नाहीं." ( युद्धकांड, सर्ग ११५ )

या शेवटच्या वाक्यांत आर्योंची शंका उघड उघड आरोपाच रूपांत दाखविली आहे सीतेच्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे रावणानें पळविण्याचें आधींचें रामाचें वर्तन व त्यानंतर इतक्या भयंकर संकटांतून सुटून